दैनिक
अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक
# राष्ट्र सह्याद्री
www.rashtrasahyadri.com

● संपादक : काकासाहेब नवले ● RNI No. MAHMAR /2019/82605 ● वर्ष ६ वे ● अंक २७८ ● शुक्रवार, १८ जुलै २०२५ ● पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 ● पाने ८ ● मूल्य रु. ४.००

## ‘जनसुरक्षा’ मतदानाला दांडी; वडेट्टीवार यांना नोटीस



**मुंबई :** जन सुरक्षा विधेयक विधिमंडळात पास होत असताना दांडी मारलेल्या काँग्रेस गटनेते विजय वडेट्टीवार यांच्या विरोधात काँग्रेस हायकमांडकडून सुरक्षा विधेयकाला विरोध का करण्यात आला नाही? अशी विचारणा करत वडेट्टीवार यांना नोटीस बजावून विचारणा करण्यात आली आहे. जन सुरक्षा विधेयकाला फक्त कम्युनिस्ट पक्षाच्या आमदार विनोद निकोले यांनीच केला होता. त्यामुळे काँग्रेसच्या भूमिकेविषयी साशंकता व्यक्त करण्यात आली. इतकेच नव्हे तर ज्या दिवशी हे महत्त्वाचे विधेयक सभागृहामध्ये मांडण्यात येत होते त्या दिवशी विजय वडेट्टीवार यांनी दांडी मारली होती. त्यामुळे पक्षाचे आमदार सुद्धा संभ्रमात होते. या सर्व पार्श्वभूमीवर काँग्रेस हायकमांडकडून वडेट्टीवार यांना नोटीस बजावण्यात आली आहे.

### झापुक | zupuk

सूर्य म्हणाला मी
प्रदूषणाच्या विळख्यात
सापडलोय
काळपट धूर,कचरा
गटार गंगेमुळे
मी काळवंडलोय
भ्रष्टाचारी जगात
माझीही मलिन
झाली स्वच्छ प्रतिमा
राज्यकर्तेही सांभाळीना
नैतिक कारभाराची
अन् घटनेची गरिमा

**नवनाथ कुताळ,**
**9422231825**

# विधानभवनाच्या आवारात
# आव्हाड-पडळकर समर्थकांमध्ये राडा





प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार जितेंद्र आव्हाड आणि आमदार गोपीचंड पडळकर यांच्यातील वाद काही थांबायला तयार नाही. आज विधानभवनात आव्हाड आणि पडळकर समर्थकांनी मोठा राडा घातला. दोघांच्याही कार्यकर्त्यांमध्ये धक्काबुक्की झाली. विधानभवनाच्या पायऱ्यांजवळ हे समर्थक भिडले. सर्वात धक्कादायक म्हणजे विधानभवनाच्या आवारात हा सारा प्रकार घडला आहे.

एकदिवसापूर्वी गोपीचंद पडळकर आणि आव्हाड यांच्यात जोरदार वाद झाला होता. हे प्रकरण शिवीगाळपर्यंत गेलं होतं. त्यानंतर आता विधानभवनात या दोघांचे कार्यकर्ते एकमेकांना भिडले आहेत. दोघांच्याही कार्यकर्तांमध्ये तुफान हाणामारी झाली, एकमेकांना शिवीगाळही करण्यात आली.

> अख्ख्या महाराष्ट्राला दिसलं की हल्ला कोणी केला, आम्हाला यापेक्षा जास्त काही पुरावा द्यायचा नाही. जर तुम्ही विधानसभेत गुंडांना प्रवेश देणार असाल, ते आमच्यावर हल्ला करणार असतील तर आमचे लोक सुरक्षित नाहीयेत. मला शिवीगाळ केली, मारण्याची धमकी दिली, हे सगळे मलाच मारण्यासाठी आले होते. विधानभवनात आमदार सुरक्षित नसतील तर कशाला राहायचं आमदार, काय गुन्हा आहे आमचा. सत्तेचा इतका मुजोरपणा, इतका माज..?
>
> **– आ. जितेंद्र आव्हाड**

यांप्रकरणी मिळालेल्या माहितीनुसार, सध्या मुंबईत पावसाळी अधिवेशन सुरु आहे. यादरम्यान गुरुवारी (१७ जुलै) दुपारच्या सुमारास गोपीचंद पडळकर आणि आव्हाड यांचे कार्यकर्ते विधानभवनाच्या पायऱ्यांजवळ होते. यावेळी त्यांच्यात धक्काबुक्की झाली, दोन्ही बाजूच्या कार्यकर्त्यांनी एकमेकांना शिवीगाळ करत मारहाण केली, धक्काबुक्की झाली. प्रकरण वाढत असल्याचं लक्षात येताच विधानभवन परिसरात उपस्थित असलेल्या सुरक्षारक्षकांनी मध्यस्थी करत हा वाद मिटवण्याचा प्रयत्न केला. दोन्ही बाजूच्या कार्यकर्त्यांना समजावण्याचा प्रयत्न करण्यात आला. जवळपास पाच ते दहा मिनिटं हा वाद सुरु होता. यावेळी कार्यकर्त्यांनी एकमेकांना मारहाण आणि शिवीगाळही केली.

## आव्हाड-पडळकर कार्यकर्त्यांच्या
# फ्री स्टाईल हाणामारीने सर्वपक्षीय आमदार अडचणीत!

* पोलिसांच्या अहवालात नियमभंगाचा मुद्दा;
* अध्यक्ष राहुल नार्वेकरांच्या कारवाईकडे लक्ष

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री




**मुंबई :** राष्ट्रवादीचे आ. जितेंद्र आव्हाड आणि भाजप आ. गोपीचंद पडळकर समर्थकांनी विधीमंडळ परिसरात मोठा राडा घातला. विधिमंडळाच्या पायऱ्यांजवळ दोघांचे समर्थक एकमेकांना भिडले. लोकशाहीचं मंदिर असलेल्या विधिमंडळात ही धक्कादायक आणि लांच्छनास्पद घटना घडली. आता या प्रकरणाची दखल विधानसभा अध्यक्षांनी घेतलेली आहे. विधिमंडळाच्या सुरक्षेची जबाबदारी असलेल्या पोलिसांनी या प्रकरणात विधानसभा अध्यक्षांकडे अहवाल दिलेला आहे. या अहवालात आमदारांकडून विधीमंडळ प्रवेशाच्या नियमावलीचा भंग केला जात असल्याचे म्हटले आहे.

फ्री स्टाईल हाणामारीनंतर दोघांच्या कार्यकर्त्यांनी एकमेकांना यथेच्छ शिवीगाळ केली. यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस शप पक्षाचे वरिष्ठ नेते जयंत पाटील, आमदार जितेंद्र आव्हाड यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. विधान भवनाच्या सुरक्षेची जबाबदारी असलेल्या पोलिसांनी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्याकडे अहवाल सादर केलेला आहे. विधिमंडळाच्या लॉबीमध्ये आमदारांसोबत केवळ शासकीय स्वीय सहायकाला परवानगी आहे. पण तरीही आमदार मंडळी त्यांच्या कार्यकर्त्यांना सोबत आणतात. विधानसभा सदस्य असलेल्या आमदारांकडून नियमांची केली जाते, **(पान ४ वर)**

### महत्वाचे...

### स्पोर्ट्स बाईक-अल्टोची धडक, बालकासह सात जणांचा मृत्यू



**नाशिक :** स्पोर्ट्स बाईक आणि अल्टोची समोरासमोर धडक होऊन अल्टो नाल्यात कोसळल्याने नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी कळवण रस्त्यावर शिवनेरी हॉटेल व संस्कृती लोनसमोर सात जणांचा मृत्यू झाला. अल्टोमधील तीन महिला तीन पुरुष व चिमुरड्या बालकांचा मृतांमध्ये समावेश आहे. मध्यरात्री हा अपघात झाला. या अपघातात स्पोर्ट्सबाईकवरील दोघेजण गंभीर जखमी असून त्यांच्यावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरु आहेत. रस्त्याच्या अंदाज न आल्याने अल्टो नाल्यात कोसळली. अपघातामधील मृतदेह दिंडोरी ग्रामीण रुग्णालयात ठेवण्यात आले आहेत. मृत हे कोशिंबे देवठाण व सारसाळे येथील असल्याचे समजते दिंडोरी पोलीस ठाण्यात अपघाताची नोंद करण्यात आली आहे.

### परळीच्या बंगल्यावरून फोन येताच तपास थांबवला, ज्ञानेश्वरी मुंडे यांचा आरोप

**बीड :** पतीच्या हत्या प्रकरणात न्याय मिळावा या मागणीसाठी परळीतील मृत महादेव मुंडे यांच्या पत्नीने विषारी द्रव प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केल्याने एकच खळबळ उडाली आहे. जिल्हा रुग्णालयातील अतिदक्षता विभागात ज्ञानेश्वरी मुंडे यांच्यावर उपचार सुरू आहेत. ज्ञानेश्वरी मुंडे यांनी परळीच्या बंगल्यावरून फोन आल्याने तपास बंद केल्याचा गंभीर आरोप केला आहे. माझी मुलं बाबांना का मारलं अशी विचारणा करत असून महिनाभरात न्याय न मिळाल्यास जीवन संपवणार असल्याचा इशारा ज्ञानेश्वरी मुंडे यांनी दिला आहे. पतीच्या हत्येच्या तपासात पोलीस अधीक्षकांसोबत सकारात्मक चर्चा झाली. मात्र केवळ तपास करतो असे उत्तर मिळते. त्यामुळे जीवन ठेवून काय उपयोग ? त्यामुळे असा निर्णय घेतल्याचे ज्ञानेश्वरी मुंडे यांनी सांगितले. या महिन्यात न्याय नाही मिळाला, तर माझं जीवन संपवणार आहे. असा गर्भित इशाराही त्यांनी दिला आहे.

# रुपाली चाकणकरांच्या नावाने महिलांची फसवणूक
## राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष भट्टड यांची हकालपट्टी



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** येथील राष्ट्रवादी अजित दादा पवार गटाचे राहुरी शहराध्यक्ष अध्यक्ष सुनील भट्टड यांनी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांचे खाजगी सहाय्यक असल्याचे सांगून महिलांशी संवाद साधत फसवणूक केल्याचा आरोप राज्य महिला आयोगाने केला आहे. राज्य महिला आयोगाने आहिल्यानगर जिल्हा पोलीस अधीक्षकांना पत्र पाठवून सुनील भट्टड यांच्यावर गुन्हा दाखल करून कारवाई करण्याचे आदेश देऊन पाच दिवसात त्याचा अहवाल सादर करण्याचे आदेश दिल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. महिला आयोगाच्या पत्राची दखल घेऊन राष्ट्रवादी अजित पवार काँग्रेसचे सरचिटणीस आमदार शिवाजीराव गर्जे यांनी पदाचा गैरवापर करून पक्षशिस्त भंग केल्यामुळे पक्षाची प्रतिमा मलीन होत असल्याचा ठपका ठेवून पक्षातून सुनील भट्टड यांची हकालपट्टी केली आहे. यापुढे पक्षाच्या नावाच्या पदाचा गैरवापर करू नये. तसे आढळल्यास योग्य ती कारवाई करण्यात येणार असल्याचे पत्र भट्टड यांना पाठवले आहे.

यासंदर्भात समजलेली माहिती अशी की, भट्टड नामक व्यक्तीच्या कार्यालयामधे २०१४ साली राष्ट्रवादीचे प्रदेश अध्यक्ष सुनील तटकरे आणि राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी भेट दिली होती. त्यामुळे भट्टड यांची अजित पवारांसह राष्ट्रवादींच्या नेत्यांशी जवळीक असल्याची चर्चा होती. मात्र नुकताच एक धक्कादायक प्रकार समोर आला असून आपण चाकणकर यांचे खाजगी सहाय्यक असल्याचे सांगून महिलांच्या कॉल रेकॉर्डिंगचे संभाषण नुकतेच आयोगाच्या हाती लागले आहे. त्यामुळेच आयोगाने याबाबत तात्काळ अहिल्यानगरचे जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयाला पत्र पाठवले आहे. त्यात म्हटले आहे की, सुनील भट्टड यांनी रूपाली चाकणकर यांचे खाजगी सहाय्यक असल्याचे खोटे सांगून लोकांची दिशाभूल व फसवणूक केली आहे. सदर माहिती एका कॉल रेकॉर्डिंगद्वारे प्राप्त झाली असून त्यात भट्टड यांनी अध्यक्षांचे नाव वापरून इतरांना फसवण्याचा प्रयत्न केल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. तसेच कॉल रेकॉर्डिंगमध्ये असेही स्पष्ट आहे की दोन महिला त्यापैकी एक श्रीमती शिरसाट **(पान ४ वर)**

# हनीट्रॅपवर सरकारने आपली भूमिका स्पष्ट करावी : दानवे


प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** राज्यातील ७२ अधिकारी आणि काही माजी मंत्री हनीट्रॅपमध्ये अडकल्याची माहिती आहे. या हनीट्रॅपच्या माध्यमातून सरकारी फाईल्स आणि गोपनीय सरकारी गोष्टी बाहेर गेल्या आहेत, अशी माहिती आहे. राज्याच्यादृष्टीने हा महत्त्वाचा विषय आहे. राज्य सरकारने याबाबत भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी अंबादास दानवे यांनी केली.

राज्यातील क्लास वन अधिकारी आणि काही माजी मंत्र्यांनी हनीट्रॅपच्या जाळ्यात अडकवून त्यांचे ब्लॅकमेलिंग करण्याचा प्रयत्न झाल्याची धक्कादायक माहिती नुकतीच समोर आली होती. राज्य सरकारने हे वृत्त फेटाळून लावले असले तरी याबाबत ठोस भूमिकाही घेतली नव्हती. त्यामुळे महायुती सरकारच्या भूमिकेबाबत संशयाचे वातावरण निर्माण झाले होते. अशातच आता विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी आणखी एक खळबळजनक आरोप केला आहे. अंबादास दानवे यांनी गुरुवारी विधान परिषदेत याबाबत भाष्य केले. या हनीट्रॅपमध्ये अडकलेल्यांमध्ये काही राजकीय लोकांचेही नाव घेतले जात आहे. वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्यांना ब्लॅकमेल करुन काही प्रशासकीय लाभ घेतल्याची शक्यता आहे. ठाणे आणि नाशिकमध्ये पोलिसांकडून याबाबत चौकशी झाली आहे. शासकीय गुप्ततेचा भाग व ब्लॅकमेलिंग मधून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो.

नाशिक दौऱ्यावर असलेल्या एका राजकीय नेत्याने अनौपचारिक गप्पांदरम्यान राज्यातील ७२ वरिष्ठ सरकारी अधिकारी आणि काही माजी मंत्री हनीट्रॅपमध्ये अडकल्याचा गौप्यस्फोट केला होता. नाशिकच्या एका पंचतारांकित हॉटेलमध्ये या सगळ्या गोष्टी घडल्याचे सांगितले जाते. नाशिकच्या मुंबई नाका पोलिस ठाण्यात याबाबत एका महिलेने तक्रार केली होती. त्यानंतर हे प्रकरण उघडकीस आले होते. त्यानुसार राज्यातील तब्बल ७२ वरिष्ठ सरकारी आणि अधिकारी हनी ट्रॅपच्या जाळ्यात अडकल्याची माहिती आहे. या अधिकारी आणि माजी मंत्र्यांची नावे सरकारकडून गोपनीय ठेवण्यात आली आहेत. **(पान ४ वर)**

# दिनो मोरियाने तोंड उघडलं तर अनेकांचा मोरया होईल
## एकनाथ शिंदेंचा ठाकरेंवर निशाणा



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** मिठी नदीतला गाळ कोण काढतोय, यांना गाळ काढायला मराठी माणूस नाही दिसला, तर दिनो मोरिया दिसला. तिथ यांना मोरे दिसला नाही. पण, दिनो मोरियाने तोंड उघडलं तर अनेकांचा मोरया होणार, असे म्हणत एकनाथ शिंदेंनी एकप्रकारे ठाकरेंना इशाराच दिला. कोविडमध्ये खिचडी चोरणारे, डेडबॉडी चोरणारे आमच्यावर आरोप करत आहेत. कुणावर भ्रष्टाचाराचे आरोप करताय?, असे सवाल करत एकनाथ शिंदेंनी सभागृहातून नाव न घेता थेट ठाकरे गटावर निशाणा साधला.

राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज पुन्हा एकदा सभागृहात मुंबई आणि विकासकामांबाबत बोलताना नाव न घेता उद्धव ठाकरेंवर जोरदार हल्लाबोल केला. काही लोकांनी अर्धवट माहितीच्या आधारे मुद्दे मांडले, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होत नाही, त्यामुळे कामं होत नाही असं सांगण्यात आलं. मात्र राज्यघटना आपण मानतो आणि त्यानुसार काम करावे लागते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका कोर्टात असल्याने घेता आल्या नाही. ‘ओबीसी आरक्षण हेही महत्त्वाचं आहे. ‘सर्वोच्च न्यायालयाने निवडणुका घेण्याचे आदेश दिले आहेत, त्यानुसार निवडणूक होईल. ओबीसी आरआरक्षणाच्या शिवाय निवडणुका नको होत्या, मात्र आता कोर्टाने आदेश दिले आहेत असे म्हणत एकनाथ शिंदेनी सभागृहात जोरदार बॅटिंग केली. तसेच, मुंबई महापालिका आणि मराठीच्या मुद्द्यावरुन ठाकरे बंधूंना टोला लगावला. तसेच, मिठी नदीच्या गाळाचा मुद्दा उपस्थित करत दिनो मोरियाला हे कंत्राट का दिलं, असा सवाल एकनाथ शिंदेंनी उपस्थित केला.

निवडणूक झाली नसली तरी कोणतही काम थांबलेल नाही. मुंबईत बदल होत आहे, हे छातीवर हात ठेवून विजयराव सांगा. ‘मुंबईकर आमच्यासाठी फर्स्ट आहेत आणि इतरांसाठी कंत्राटदार फर्स्ट आहेत. ‘मी मुख्यमंत्री झाल्यानंतर पहिल्यांदाच चहल यांना बोलावले आणि खड्ड्यांच्या संदर्भात सांगतील आणि त्यानंतर दोन फेजमध्ये सर्व रस्ते करण्याचे आदेश दिले. ‘पहिला फेज पूर्ण झाला आहे, आपण ‘काँक्रीटीकरण करत आहोत, त्यामुळे मुंबई खड्डेमुक्त होईल. मुंबई आणि एमएमआर रिजन १.५ ट्रिलियन डॉलरची क्षमता आहे. आमच्यावर ‘मुंबई तोडण्याचा आरोप होतोय पण आम्ही जोडणारे आहोत, असे एकनाथ शिंदेंनी म्हटले. मराठी माणसासाठी काय केलं असं म्हणत अनेकजण गळे काढतात. **(पान ४ वर)**

### मुंबईकर पुन्हा मुंबईत येईल

मुंबईबाहेर फेकलेला मुंबईकर पुन्हा मुंबईत येईल, क्लस्टरच्या माध्यमातून आपण अनेक योजना आणत आहोत. कोळी वाड्याच्याबाबत देखील आपण निर्णय घेतलाय, बदल घडवण्याचे काम आपण करतोय. धारावी हा जगातला सर्वात मोठा प्रकल्प आहे, आपण धारावीच्या विकासासाठी जमीन देतोय. पूर्वीच्या सरकारने निर्णय फक्त पात्र लोकांसाठी घेतला होता. पण आम्ही पात्र आणि अपात्र लोकांसाठी निर्णय घेतला आहे. रेल्वेच्या जागेत प्लॅन सुरु झाला, असेही एकनाथ शिंदेंनी म्हटले.

# पावसाची ओढ; शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**धाराशिव :** बहुतांश भागात गेल्या महिनाभरापासून पावसाने दडी मारली आहे, त्यामुळे शेतकरी हवालदिल झाले आहेत. जिल्ह्यातील काही भागात मृगाच्या प्रारंभी थोड्याफार प्रमाणात पाऊस झाला. या पावसाच्या भरवश्यावर अनेक शेतकऱ्यांनी पेरण्या उरकल्या. मात्र, त्यानंतर अद्याप पाऊस झालेला नाही. सध्या तर उन्हाचा चटका वाढला आहे. त्यामुळे शेतकरी चिंतेत आहेत. सध्या पिकांना पाण्याची नितांत गरज आहे. पाऊस नसल्याने अनेक भागात पिके कोमेजून जात आहेत तर काही भागात कोवळ्या पिकांनी माना टाकल्या आहेत.

जिल्ह्यात आतापर्यंत सरासरी १०१.८ मिलिमीटर पाऊस झाला आहे. गतवर्षी या कालावधीत झालेल्या पावसाच्या तुलनेत १८८ मिमी पावसाची तूट आहे. मराठवाड्यात लातूर जिल्ह्यासारखी पावसाची स्थिती धाराशिव, बीड आणि हिंगोली जिल्ह्यातही आहे. मराठवाड्यातील इतर चार जिल्ह्यात काही प्रमाणात पाऊस झाल्या असल्याने येथील स्थिती काही प्रमाणात बरी आहे.

सध्या सोयाबीनच्या पिकाला पाण्याची नितांत गरज आहे. पुढील आठ दिवसात पाऊस झाला नाही तर लातूर जिल्ह्यातील साडेचार लाख हेक्टरवरील सोयाबीनचे पीक धोक्यात येण्याची शक्यता आहे. म्हणजेच पर्यायाने शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट ओढावण्याची भीती आहे. एका एकर सोयाबीन लागवडीसाठी शेतकऱ्यांना दहा ते बारा हजार रुपये खर्च करावा लागतो. दुबार पेरणी करायची झाल्यास तेवढाच खर्च पुन्हा करण्याची वेळ शेतकऱ्यावर येणार आहे.

हवामान विभागाने सर्व दूर पावसाचा इशारा दिला असला तरी मराठवाड्यात परभणी वगळता उर्वरित भागात गेल्या दहा-बारा दिवसांपासून पावसाचा खंड आहे . काही भागात पावसाच्या हलक्या सरी होत्या . बहुतांश ठिकाणी ढगाळ वातावरण आहे .मात्र पावसाचा पत्ता नसल्यामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे .अजून काही दिवस अशीच स्थिती राहिली तर पेरण्या वाया जाऊ शकतात अशी भीती व्यक्त होत आहे.

प्रादेशिक हवामान केंद्रानुसार, छत्रपती संभाजीनगर, परभणी व हिंगोली जिल्ह्यात तुरळक ठिकाणी वादळी वाऱ्यासह हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची तर काही ठिकाणी वादळी वारा,



विजांचा कडकडाट व वाऱ्यांचा वेग अधिक राहण्याची शक्यता आहे. आज (१७ जुलै) नांदेड, लातूर, धाराशिव जिल्ह्यात यलो अलर्ट देण्यात आलाय. हिंगोली, परभणी, जालना, छत्रपती संभाजीनगर, बीडमध्ये हलक्या पावसचा इशारा आहे. १८ जुलै रोजी हिंगोली, परभणी व नांदेड जिल्हयाला यलो अलर्ट देण्यात आलाय. उर्वरित भागात हलक्या पावसाची शक्यता आहे.

## संपादकीय

# क्रूर दांभिकतेचे नवनवीन आविष्कार

ठाणे जिल्ह्यातील शहापूरमधील शाळेतील नुकतीच मुलींबाबत जी घटना घडली, ती फारच धक्कादायक आहे. एकीकडे मुंबईलगतच्या ठाणे जिल्ह्यात ही घटना घडल्याचा धक्का आहेच; परंतु त्याहीपेक्षा जास्त, २०२५ या वर्षात इतक्या घातक मानसिकतेने मुलींच्या शरीराकडे पाहिले जातेय, हा मोठा धक्का. घडले काय होते, तर बाथरूममध्ये रक्ताचे डाग दिसले. इतक्या साध्या गोष्टीचे अवडंबर माजवत, शाळेतील मुलींचे कपडे उतरवत तपासणी करणे, म्हणजे एकतर तुमच्या मनात मासिक पाळीबद्दल किती टोकाची नकारात्मक भावना आहे, हे तर दर्शवतेच; तर दुसरीकडे शाळेतील मुलींचे कपडे उतरवत तपासणी करण्याचा अधिकार हा शाळेला कसा काय मिळाला? जी शाळा लेकरांसाठी एक सुरक्षित जागा असणे अपेक्षित आहे, ती शाळाच अशा प्रकारे आपल्या सत्तेचा चुकीचा वापर करून, लेकरांची शारीरिक सुरक्षितता पायदळी तुडवत, त्यांचे मानसिक खच्चीकरण करते, तेव्हा अशा शाळेबद्दल बोलावे तरी काय? ज्या मुलींसोबत ही घटना घडली, त्यांच्या मनावर किती दूरगामी परिणाम झाले असतील, याची कल्पना करणेही दु:खदायक आहे.

आजकाल सर्रास बोलते जाते, की आता समाज पुढारला आहे, मासिक पाळीचा विटाळ वगैरे मानला जात नाही. आणखी एक घातक समजूत म्हणजे 'ही मागास मनोवृत्ती फक्त ग्रामीण भागात, 'अडाणी' लोकांत दिसून येते. शहरात असे काही आता शिल्लक नाही. त्यामुळे मासिक पाळीबद्दल जनजागृती खेड्यांत जाऊन करावी.' अशा घातक समजुतीं कशा दूर कराव्यात, हे सर्वच सजग लोकांसमोर उभे राहिलेले मोठे प्रश्नचिन्ह आहे. कारण एखादी समस्या आहे म्हणून स्वीकारली तर त्यावर उपाययोजना करता येते. संवाद साधून सामाजिक बदलाच्या दिशेने प्रयत्न करता येतात. परंतु, जर समस्याच नाकारली तर साध्या संवादाच्या शक्यताच नष्ट होतात.

उच्चशिक्षित लोकांमध्ये आणखी एक नवीन फंडा पहायला मिळतो. प्रत्येक गैरसमजाची कारणीमीमांसा केली आहे, असे भासवत, त्याचे विघातक पैलू सरळ नाकारायचे. उदाहरणार्थ पाळीच्या विटाळाबद्दल, 'स्त्रीला आराम मिळावा म्हणून तिच्या आरोग्याच्या दृष्टीने तिला बाजूला बसवले जाते,' असे म्हटले की सर्वांना ते कानाला गोड वाटून, आपोआप नकारात्मक बाजूकडे डोळेझाक केली जाते. परंतु, अर्थातच हे वास्तव नाही. पाळीचा विटाळ हा कुठल्याही थरापर्यंत पोहोचून, स्त्रीसाठी विविध प्रकारे धोकादायक ठरू शकतो, हे आपण शहापूरच्या प्रकरणात पाहिलेच. आदिवासी भागात 'कुर्मा घर' ही पद्धत आहे. पाळी आली की आदिवासी स्त्रीला घराजवळच्या झोपडीत राहायला पाठवायचे. जनावरांच्या गोठ्यापेक्षाही वाईट असणाऱ्या या झोपड्या. गडचिरोलीतील 'स्पर्श' या सामाजिक संस्थेने २०११मध्ये २३३ कुर्मा घरांचे सर्वेक्षण केले तेव्हा लक्षात आले की स्त्रीला असे बाजूला केल्यामुळे, सर्पदंश, वन्य प्राण्यांचा हल्ला ते एखादा आजाराचे उपचार न मिळणे, असे प्रकार घडून २८ मुलींचा मृत्यू झाला होता. यात अर्थातच कुमारवयीन मुली, तरुणींचा समावेश होता.

पुढे आणखी व्यवस्थित, सखोल सर्वेक्षण करत, या संस्थेने जिल्हा प्रशासनाकडे अहवाल सोपवला. कार्यवाही करायची मागणी केली. 'स्पर्श' ही संस्था आता आदिवासी स्त्रियांसोबत विविध प्रकारे काम करत आहे. तसेच 'समाजबंध' या संस्थेमार्फतही मासिक पाळीबद्दलच्या जनजागृतीचा भाग म्हणून, कुर्मा घर या प्रथेबद्दल आदिवासी भागात संवाद साधला जात आहे. निदान अशा काही भागांत, काही चांगल्या संस्था काम करत आहेत म्हणून एक सकारात्मक बदल घडताना दिसतो. परंतु, आणखी अशा असंख्य मुली, स्त्रिया आहेत, ज्यांच्यापर्यंत काहीही माहिती, सुधारणा, योजना पोहचत नाहीत. त्यांच्यासाठी आपण काय करणार आहोत? आणि जो शहरी भाग, जिथे इंटरनेटपासून 'स्विगी'पर्यंत सारे काही पोहोचले आहे, तिथेही शहापूरसारखे प्रसंग घडतात, तेव्हा दोष कोणाला द्यायचा?

जोपर्यंत समाज म्हणून आपण या साऱ्या प्रकाराची जबाबदारी घेत नाही तोपर्यंत सर्वांगीण बदल घडून येण्याची शक्यता खूप धूसर आहे. लिंगभाव, लिंगभेद हे मुळातून समजून घेणे आणि आपल्या रोजच्या वागण्यात बदल घडवून आणणे निकडीचे बनले आहे. प्रश्न फक्त मासिक पाळीतील विटाळाचा आणि मासिक पाळीबद्दलच्या गैरसमजाचा नाही. तर स्त्रीच्या देहाकडे आपण स्वत: कसे पाहतो, आजूबाजूचा समाज स्त्रीकडे कसा पाहतो, वेगवेगळ्या व्यवस्था कशा पाहतात आणि भांडवलशाही व्यवस्था कशी पाहते, हे सारे विचारात घेणे गरजेचे आहे.

ज्या शिक्षण व्यवस्थेने समाजाला शहाणे करून सोडले पाहिजे, उगवत्या पिढीला तिचे हक्क, अधिकार शिकवले पाहिजेत, तीच शिक्षणव्यवस्था सत्ताकेंद्र बनून, क्रूरपणे वागते आणि वयात येणाऱ्या मुलींचा किळसवाण्या पद्धतीने अपमान करते, तेव्हा तरी समाजाचे डोळे उघडायला हवेत. बाकी व्यवस्था, राजकारण, प्रशासन, आरोग्य, न्याय, रोजगार, खासगी संस्था इथेही आपल्याला याच क्रूरतेचे प्रतिबिंब उमटलेले दिसेल. बाईचे शरीर इतके सहज उपलब्ध असते, की त्याची वेगवेगळ्या प्रकारे पायमल्ली करायची आपल्याला सवय झाली आहे. मग कुठे बलात्कार होतात, किंवा कुठे गर्भवती बाई मरते, कोणी राजकारणी उलटसुलट टिप्पणी करतात, बायकांच्या, खरे तर आई बहिणींच्या शरीरावरून शिव्या दिल्या जातात तेव्हाही आपल्याला फारसे काही वाटत नाही. या 'रोजच्या गोष्टी' या सदरात हे सगळे मोडते आणि आपण वर्तमानपत्राची घडी करून बाजूला ठेवून देतो.

आरोग्यव्यवस्था ही खरे तर स्त्रीसाठी सर्वांत सुरक्षित जागा हवी; पण आरोग्य व्यवस्थासुद्धा बाजारू मूल्यांशी हातमिळवणी करत, स्त्रीच्या शोषणात सहभागी होते. इथे ग्रामीण, शहरी, सरकारी, खासगी, सगळीच क्षेत्रे आली. मग 'पीसीओडी'सारखा आजार असो किंवा मेनोपॉज. एकीकडे लाज, शरमेचा बागुलबुवा करत, माहिती देणे टाळायचे. तर दुसरीकडे भीती दाखवून, महागड्या गोळ्या, उपचार खपवायचे असा दुहेरी छळ स्त्रियांच्या आजाराबाबत दिसतो. यात फक्त डॉक्टरांना दोष देऊन उपयोग नाही, कारण डॉक्टरसुद्धा याच समाजातून आलेले असतात. जसा समाज असेल, तसेच सगळे व्यावसायिक निपजणार. त्यात सरकारसुद्धा खासगीकरणाला प्रोत्साहन देत, आर्थिक शोषणात आपला सहभाग नोंदवते. गावागावात पसरलेले 'टेस्ट ट्यूब बेबी सेंटर्स' ही तर आणखी भीतीदायक बाब आहे. प्रचंड आर्थिक गुंतवणूक असलेली ही सेंटर्स चालवायला, रुग्ण हवेत, म्हणून सरसकट वंध्यत्वाची भीती दाखवून, भावनिक आवाहने करून व्यवसाय सुरू आहेत.

या सगळ्या समस्यांना एकच एक सरळ उत्तर नसून, त्यावर अनेक प्रकारे उत्तरे शोधायला हवीत. मासिक पाळीतील विटाळ या एकाच मुद्द्यावर चर्चा नको व्हायला. त्यात इतर गोष्टींवर बोलायला हवे. मग तो शैक्षणिक विटाळ असेल, अथवा राजकीय विटाळ, आर्थिक विटाळ, सांस्कृतिक, सामाजिक, वैचारिक, भावनिक, धार्मिक, अशा सर्वच लिंगभेदाबद्दल बोलले जायला हवे. पुण्यातील गर्भवती महिलेच्या मृत्यूपासून ते बीडमधील गर्भपिशवी काढल्या गेलेल्या ऊसतोडणी मजूर महिलांबद्दल, कोलकता, दिल्ली या शहरांतील निर्घृण बलात्कार हत्याकांडांपासून ते लहानशा खेड्यात जातीयतेतून केले जाणारे निर्घृण बलात्कार... अशा सर्वच मुद्द्यांवर, जात, धर्म, वर्ग, लिंग हा परस्परसंबंध समजून घेत, सारासार चर्चा घडून यायला हवी. अन्यथा समाजाच्या क्रूर दांभिकतेचे नवनवीन आविष्कार आपल्याला हताशपणे पाहत राहावे लागतील.

# गंगागिरी महाराज सप्ताहसाठी प्रशासकीय पातळीवर सर्व सहकार्य करू

## तहसीलदार वाघ यांची ग्वाही

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**माळवाडगाव :** योगीराज सदगुरू गंगागिरी महाराज यांचा १७८वा अखंड हरिनाम सप्ताह शनिदेवगाव येथे होणार आहे. गोदावरी हद्दीवर दोन तालुके, जिल्हे वेगवेगळे असले तरी महाराष्ट्र शासन अन् आपण भक्तगण एकच आहोत. प्रशासकीय पातळीवर सर्व विभागांचे सर्वोतोपरी सहकार्य राहील अशी, ग्वाही श्रीरामपूरचे तहसीलदार मिलिंदकुमार वाघ यांनी सप्ताहस्थळी विविध विभागांच्या प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या बैठकीत दिली.

शनिदेवगाव, बाजाठान, चेंडूफळ, हमरापूर, अवलगांव, कमालपूर, भामाठाण या गावच्या सप्तक्रोशित ३० जुलै ते ६ऑगस्टदरम्यान संपन्न होणाऱ्या १७८व्या सप्ताहाची तयारी अंतिम टप्प्याकडे आहे. वैजापूर-श्रीरामपूर तालुका हद्दीवर हा सप्ताह असल्याने दोन्ही तालुक्यातील प्रशासकीय अधिकारी बैठका घेण्याचे सत्र सुरू झाले आहे.

लाखो भाविक भक्तांची वाहने कमालपूर येथे पार्किंग करण्यात येऊन भाविकांना सप्ताहस्थळी बंधाऱ्याहून पायी सोडण्यात येणार आहे. श्रीरामपूर बाजूचे रस्ते, पोलीस बंदोबस्त, एसटी वाहतूक सेवा यासाठी वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली सप्ताहस्थळी बैठक घेण्यात आली. ते पुढे म्हणाले की, वेगवेगळे तालुके, अधिकारी, कर्मचारी वेगवेगळे असे मनात आणू नका. वर्षानुवर्षे शेकडो वर्षांची ही बेटाची परंपरा सुरू असून चोहीबाजुने येणारे सर्व भाविक भक्तगण एकच आहोत. कुठलीही उणीव, संकट आले तर तत्पर कळवा, असे आवाहन त्यांनी केले.पोलीस निरीक्षक अरूण धनवडे म्हणाले की, मला या सप्ताहातील भाविक भकतांच्या गर्दीचे कुतुहल लागले आहे. हा सप्ताह पाहण्याचे भाग्य मिळत



असताना कर्तव्याची अन् बंदोबस्ताची जबाबदारीही योग्य रितीने सांभाळणार आहोत. अरूंद बधारा पुलामुळे अधिकाधीक बंदोबस्तात वाढ करू. मात्र तरूणांनी सप्ताह काळात महिला, मुलींची छेडछाड करू नये. मोबाईलवर चुकीच्या कमेंट माहिती टाकू नये.हल्ली जातीय तेढ निर्माण करणारे चुकीचे मेसेज पडताळणी न करता तातडीने पुढे सोडले जातात. या गोष्टी कटाक्षाने टाळण्याचे आवाहन केले. याप्रसंगी मधुकर महाराज, गणेश मुरकुटे, सचिन मुरकुटे पत्रकार भाऊसाहेब काळे यांनी मनोगत व्यक्त केले. कमेटी उपाध्यक्ष हरिशरणगिरी महाराज यांनी आभार मानले.

# हुमणी किडीच्या व्यवस्थापनावर देवसडे येथे चर्चासत्र

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कुकाणा :** नेवासा तालुक्यातील देवसडे येथे ग्रामीण कृषि जनजागृती व कृषि औद्योगिक कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत ऊस पिकातील हुमणी किडीचे एकात्मिक व्यवस्थापन विषयावर शेतकरी चर्चासत्र झाले.

विषयतज्ञ प्रा. नरेंद्र दहातोंडे, प्रा. राहुल गडाख, प्रा. श्रीकृष्ण हुरुळे यांनी मागदर्शन केले. प्रा. डॉ. अतुल दरंदले यांनी प्रास्ताविक केले. विषय विशेषज्ञ प्रा. राहुल गडाख यांनी कपाशी पिकातील उत्पादन वाढीसाठी तंत्रज्ञान, एकात्मिक अन्नद्रव्ये व्यवस्थापन याविषयी माहिती दिली. प्रा. नरेंद्र दहातोंडे यांनी ऊस पिकातील हुमणी किडीचे एकात्मिक व्यवस्थापन तसेच प्रा. हुरुळे यांनी ऊस व पपई पिकांवरील रोगांच्या संबंधी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देऊन एकात्मिक रोग व्यवस्थापन याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. शेतकऱ्यांनी त्यांचे विविध अनुभव मांडले तसेच विविध प्रश्नांची उत्तरे तज्ञांमार्फत जाणवून घेतली. शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष कपाशी व ऊस पिकांना भेटी देऊन सद्यस्थितीमध्ये करावयाच्या उपायोजना याविषयी चर्चा करण्यात आली.

सरपंच दत्तात्रय काळे, ग्रामसेवक भाऊसाहेब पोळ, शेतकरी सोपानराव घोडेचोर, राजेंद्र उगले, गंगाधर फटांगरे, बबनराव पिसोटे, नवनाथ घोडेचोर व ग्रामस्थ उपस्थित होते. चर्चा सत्राचे आयोजन कृषिदूत अनमोल गरड, वरद खरात, ओम देवगावकर, गौरव गांजे, अजय बहिरम व साहिल खोब्रागडे यांनी केले. कृषि महाविद्यालय सोनईचे प्राचार्य डॉ. हरी मोरे, उपप्राचार्य प्रा. सुनील बोरुडे व कार्यक्रम अधिकारी डॉ. संतोष चौगुले यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम घेण्यात आला.



# कोपरगावमध्ये प्रथमच शारदा एक्सप्रेस खो-खो लीग

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव :** सोमैया विद्याविहार संचलित श्री शारदा इंग्लिश मीडियम स्कूलच्यावतीने २६ जुलै रोजी पहिली ङ्गशारदा एक्सप्रेस खो-खो लीगफ स्पर्धा आयोजित करण्यात येत आहे. जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना खेळाची गोडी लावण्यासाठी व कौशल्य वाढवण्यासाठी ही स्पर्धा एक आगळीवेगळी संधी ठरणार आहे. या विशेष लीगमध्ये जिल्ह्यातील १२ संघांना सहभाग घेता येणार आहे. प्रत्येक संघात ६ मुले व ३ मुली असा समावेश असणार असून, ही स्पर्धा इयत्ता ६ वी ते १० वी मधील विद्यार्थ्यांसाठी आहे. लिंगसमता आणि सांघिक एकता यावर आधारित ही अभिनव संकल्पना शारदा स्कूलने राबवली आहे. स्पर्धा साखळी पद्धतीने खेळवण्यात येईल.

प्रत्येक सामन्यानंतर एका उत्कृष्ट खेळाडूला ङ्गसामनावीरफ पुरस्काराने गौरवण्यात येईल. हा पुरस्कार कै. महेंद्र अशोकराव नगरकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिला जाणार आहे. या लीगमध्ये अंतिम विजेत्या संघाला २१०० रोख रक्कम आणि भव्य चषक देण्यात येणार असून, हा पुरस्कार श्संकेत दिलीपराव पारखे यांच्याकडून दिला जाणार आहे. संघ नोंदणीसाठी इच्छुकांनी खो-खो प्रशिक्षक गणेश वाघ व गणेश मोरे यांच्याशी संपर्क साधावा. उपक्रमाचे मार्गदर्शन प्राचार्य के. एल. वाकचौरे करत असून, ज्येष्ठ क्रीडा शिक्षक डॉ. धनंजय देवकर यांच्या अधिपत्याखाली लीगचे आयोजन करण्यात येत आहे. ही स्पर्धा विद्यार्थ्यांच्या शारीरिक विकासाबरोबरच सामूहिकतेचे मूल्य, स्पर्धात्मकता आणि स्वतंत्रता यांचा अनुभव देणारी ठरणार आहे.

# भूमाफियांचे काळे कारनामे आ.क्षीरसागरांनी सभागृहात उघड केले

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बीड :** नगरपालिका प्रशासन, नगर रचना विभाग आणि रजिस्ट्री कार्यालय येथील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना हाताशी धरून भ्रष्टाचार करत भूमाफियांनी अक्षरशः धुमाकूळ घातला आहे. शहरातील प्लेग्राउंड असो की मंदिर अथवा गार्डन किंवा महिला स्वच्छतागृह या सगळ्यांसाठी आरक्षित असलेल्या भूखंडावर प्लॉटिंग करून या भूमाफियांनी कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडवत अब्जावधींचा घोटाळा केला आहे. यामध्ये सर्वसामान्य नागरिक आणि शासनाची मोठी फसवणूक झाली आहे. आमदार संदीप क्षीरसागर यांनी या भूमाफियांचे कारनामे पुराव्यासह सभागृहात मांडले असून पुढील दोन महिन्यात याबाबत कारवाई करून संबंधित भूमाफिया यांच्यासोबतच अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल असे आश्वासन नगरविकास राज्यमंत्री यांनी दिले आहे.

शहराचे नागरिकीकरण वाढल्यानंतर जालना रोड असो की नगर रोड अथवा बार्शी रोड या भागामध्ये मोठ्या प्रमाणात प्लॉटिंग निर्माण झाले आणि बंगले, अपार्टमेंट, रो हाऊस तयार करणारी एक भूमाफी यांची टोळी बीडमध्ये सक्रिय झाली. बीड शहरात प्लॉटिंग करताना काही मंडळींनी नगरपालिका प्रशासन, नगररचना विभाग आणि दस्तनोंदणी कार्यालय येथील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना हाताशी धरून ओपन स्पेस विक्री करत कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार केल्याची चर्चा होती. लहान मुलांच्या खेळण्यासाठीचे आरक्षित असलेले ग्राउंड असो किंवा गार्डन, मंदिर, सुलभ शौचालय यासाठी लेआउट मंजूर करताना जी जागा आरक्षित ठेवली आहे. तीच जागा सर्वसामान्य प्लॉटधारकांना विक्री करून भूमाफियांनी कोट्यवधी रुपये कमावले चर्चा होती. यासंदर्भात मागील सहा सात महिन्यापासून पाठपुरावा करणारे आमदार क्षीरसागर यांनी लक्षवेधी सूचनेद्वरे शासनाचे आणि संबंधित नगर विकासमंत्र्यांचे लक्ष वेधले.

# जनतेच्या कल्याणासाठी राजकारण केले : बाळासाहेब थोरात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** १९८५ साली सर्वात कमी वयाचा आमदार म्हणून मी निवडून आलो. मागील ४० वर्ष राजकारणात राहिलो. पराभव हा अनपेक्षितच होता. इतकी मोठी संधी तालुक्यातीलँए जनतेने मला दिली १८ वर्ष मंत्रिमंडळात राहिलो. काँग्रेस पक्षाने राष्ट्रीय पातळीवरही मला मोठी संधी दिली. मतदार संघातही मी चांगली विकास कामे केली. पराभवाचे फार दुःख धरले नाही लोकांची कामे सुरूच आहेतस असे प्रतिपादन माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी एका कार्यक्रमात केले.

**पक्षाचे तत्त्वज्ञान अडचणीत**

**मी चळवळीतून आलो आहे. आजही चुकीच्या गोष्टी विरोधात रस्त्यावर उतरण्याची माझी तयारी आहे. काँग्रेस हा पक्ष अडचणीत नसून पक्षाचे तत्त्वज्ञान अडचणीत आहे. आज जरी पक्ष कठीण काळातून जात असला तरी भविष्यात परिवर्तन नक्की होणार आहे. भारतीय जनता पक्ष वेगवेगळे फंडे वापरून निवडणूक जिंकत आहे. आत्ताच मंजूर झालेले जनसुरक्षा बिल हे लोकशाही विरोधात आहे. जनतेने हे ओळखायला हवे. यासाठी आम्हाला जनतेत जावे लागेल.**

विधानसभा निवडणुकीत पक्षाची विचारधारा लोकांना समजून सांगण्यात आम्ही कमी पडलो, असे सांगून ते म्हणाले की, स्व. यशवंतराव चव्हाण यांनी कृषी औद्योगिकीकरणाचा पाया घातला. आणि तो पुढील नेत्यांनी सुरू ठेवला. १९६५ रोजी जी देशाची परिस्थिती होती ती काँग्रेस पक्षाने १९९० मध्ये बदलली. देश विविध घटकांच्या बाबतीत स्वयंपूर्ण केला. विविध सहकारी संस्थांची उभारणी करण्यात आली. त्या प्रामाणिकपणे चालवण्यात आल्या. मात्र आता सध्या सहकारी संस्थांना सरकारकडून पाहिजे ती मदत मिळत नाही. आता मात्र प्रत्येक गोष्ट राजकारणासाठी होत आहे. स्वतःला वाचवण्यासाठी किंवा सत्तेसाठी काहींचे पक्ष परिवर्तन सुरू आहे.लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला चांगले यश मिळाले. मात्र विधानसभेचा निकाल आश्चर्यकारक होता. ही वस्तुस्थिती आहे. भाजपला ९० टक्के जागा मिळाल्या. याचाच अर्थ या निकालात काहीतरी अनियमितता आहे. तीन महिन्यात मतदार वाढले कसे, हे मात्र अनैसर्गिक आहे. निवडणूक आयोगाला हाताशी धरून ही कामे करण्यात आली याची पुराव्यासह माहिती पृथ्वीराज चव्हाण यांच्याकडे आहे.

# निसर्गाचे वरदान लाभलेल्या फोफसंडीत मूलभूत सुविधांचा अभाव : ॲड. रमेश बनसोडे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**घुलेवाडी :** अकोले तालुक्यातील अतिदुर्गम गाव असलेल्या फोफसंडीत निसर्गाचा आविष्कार पाहायला मिळतो. घाट रस्ताल सह्याद्रीच्या डोंगर दऱ्यात लपलेले हे गाव आहे.डोंगरावरून फेसाळत खाली येणारे विविध आकाराचे धबधबे, वाऱ्याच्या वेगाने हवेत उडणारे धबधब्यातील पाणी व मध्येच धुक्याचे आगमन मन प्रसन्न करून जाते. ब्रिटिश अधिकारी फोफ साहेबांच्या नावाने परिचित असलेले हे फोफसंडी गाव ! निसर्गाचे वरदान लाभलेल्या या गावात मात्र मूलभूत सोयींचा पत्ता नसल्याने येथील आदिवासींचे जिणे मुश्किल होत आहे

येथील भौगोलिक परिस्थिती मुळे सूर्यप्रकाश उशिरा येतो आणि लवकर डोंगराच्या आड तो लुप्त होतो. त्यामुळे तेथे दिवसाचा कालावधी इतर ठिकाणापेक्षा कमी असतो. फोफसंडी येथील स्थानिक नागरिकांना भेटलो आणि त्यांच्याशी संवाद साधला. फोफसंडी गावापासून जवळच एक दोन किमी अंतरावर डोंगर चढून गेल्यावर एका गुहेत वळे आडनावाचे कुटुंब वास्तव्यास आहे. त्या गुहेत त्याचा परिवार तसेच शेळ्या, कोंबड्या, काही जनावरं आहेत. वळे आजींनी सांगितले की, आम्ही गेल्या चार पिढ्यांपासून या गावात राहतो. गावात बारा वाड्या, तसेच आवाडे, कोंडरे, भगत, पिचड, तातले, गोरे, उंबरे, गवार, मेमाणे, भांगरे, वळे व भाद्रिके अशी आडनावाची लोक इथे राहतात. जनावरे पाळणे, पावसाळ्यात भात, नागली, वटई आदी पिके घेऊन इतर आठ महिने रोजंदारीसाठी पुणे जिल्ह्यातील कोपरे, मांडवे, ओतूर, बनकर फाटा, तसेच ठाणे येथे जावे लागते. कधी कधी गावात आठ आठ दिवस वीज नसते. आली तर तीपण सिंगल फेज. थ्रीफेज वीज नसल्याने पिण्याचे पाणी डोक्यावर आणावे लागते. पावसाळ्यात धुक्यामुळे सूर्य उशीरा उगवतो व लवकर मावळतो. पाऊस अधिक असल्याने पिके वाहून जातात. आले तर रानडुक्करं खातात. त्यामुळे अडचणीचा सामना करावा लागतो. वनखाते मदत करत नाही. गावात ७५ टक्के वनजमिनी असल्याने वनखाते जनावरे चारू देत नाही. होळी, गणपती, दिवाळी सणाला, मजुरी मिळाली तरच सण साजरे होतात. फोफसंडीमध्ये आदिवासी समाजाचे वास्तव्य असून त्यातील काही कुटुंब आजही गुहेत राहतात.

गावाचा इतिहास

ब्रिटिश अधिकारी फोफ याचे हे आवडते गाव. स्वातंत्र्यपूर्व कालखंडात तो दर रविवारी या गावात येत असे. म्हणून गावाला फोफसंडी नाव मिळाले. सहा सात वर्षापर्यंत त्या इंग्रज अधिकाऱ्याचा बंगला सुरक्षित होता. मांडवी नदीच्या उगमस्थानी हे गाव असून ही नदी पुणे जिल्ह्यात प्रवाहित होते. येथे दर्याबाईचे मंदिर असून मांडव्यगण ऋषींनी



येथे गुहेत तपश्चर्या केली होती.

पाहण्यासारखी ठिकाणे

कुंजीरगड, घारीचा, भद्र्याचा, कवड्याचा, चौंडीचा, माऊल्याचा व धुळगडीचा धबधबा, फडईचा, रांजणीचा व बाळूबाईचा डोंगर, दर्याबाई, राणुबाई, कळमजाई मंदिर, दौड्याची, गहिण्याची, चारण व घोड गडद, मानखांदा व गायदरा, खिंड, खळीची टेकडी, वारल्याचा कडा, नळीचे, पाखरांचे पाणी, उंबारले आदि ठिकाणे पाहण्यासारखी आहेत.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb BaBasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, Emal ID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# संगमनेरचा सहकार पॅटर्न राज्यासाठी मार्गदर्शक : चंद्रशेखर बारी

## आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त सहकार दिंडी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : सहकारातून गोरगरिबांची खरी प्रगती झाली आहे. माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली संगमनेर तालुक्यातील दूध संघ व इतर सहकारी संस्था या राज्यातील व देशातील सहकार्यासाठी मार्गदर्शक ठरणाऱ्या असून संगमनेरचा सहकार पॅटर्न हा सर्वत्र अनुकरणीय असल्याचे गौरवोद्गार सहकारी संस्थेचे विभागीय उपनिबंधक चंद्रशेखर बारी यांनी काढले.

विभागीय उपनिबंधक सहकारी संस्था (दुग्ध) नाशिक, सहाय्यक निबंधक सहकारी संस्था अहिल्यानगर आणि संगमनेर तालुका सहकारी दूध उत्पादक संगमनेर यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय सहकार वर्षा निमित्ताने सहकार दिंडी व सहकार परिसंवादात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी रणजीतसिंह देशमुख होते. मा. आमदार डॉ. सुधीर तांबे, पांडुरंग घुले, शंकरराव खेमनर, सुधाकर जोशी,




संपतराव डोंगरे, आर.बी. राहणे, विलास वरपे, संतोष मांडेकर, विलास कवडे, गोरख नवले, मारुती कवडे, विक्रमराजे थोरात, बापूसाहेब गिरी, प्रा. बाबा खरात, शेखर जाधव, डॉ.सुजित खिलारी, जगन्नाथ घुगरकर,जी. एस. शिंदे, शिवाजी खुळे उपस्थित होते.यावेळी राजहंस दूध संघ ते सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांचे स्मृतिस्थळ व अमृतवाहिनी बँक यादरम्यान सहकारातील कार्यकर्ते, पदाधिकारी यांनी सहकार दिंडी काढली. यावेळी स्वातंत्र्यसेनानी सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांना अभिवादन केल्यानंतर या दिंडीमध्ये बोलताना डॉ. तांबे म्हणाले की, माजीमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली संगमनेरचा सहकार हा दिशादर्शक आहे. सहकारांमध्ये भाऊसाहेब थोरात यांनी रुजवलेली तत्वे ही आदर्शवत असून देशाने ती अनुकरली पाहिजे. सहकार टिकला तर शेतकरी टिकणार आहे. बारी म्हणाले की, युनोने सहकाराची दखल घेतली असून हे वर्ष आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष म्हणून आपण साजरे करत आहोत. जगामध्ये भारत हा दूध उत्पादनामध्ये प्रथम क्रमांकाचा असून अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये ४० लाख लिटर दूध निर्मिती होते. सहकारामध्ये युवकांना मोठी संधी असून सहकारातील संस्थांनी मार्केटिंग बरोबरच सेवा वाढवल्याने सहकाराकडे जास्तीत जास्त नागरिक आकर्षित होणार आहे. समृद्धतेची ही सहकार चळवळ अधिक बळकट करण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करावे.प्रास्ताविक कार्यकारी संचालक डॉ. सुजित खिलारे यांनी केले. सूत्रसंचालन नामदेव कहांडळ व सुरेश जोंधळे यांनी केले तर विलास कवडे यांनी आभार मानले. यावेळी दूध उत्पादक, शेतकरी, अधिकारी, कर्मचारी संख्येने उपस्थित होते.

### शेतकरी समृद्ध झाला

देशमुख म्हणाले की, संगमनेर तालुका सहकारी दूध उत्पादक संघाने १५०० लिटर दूध संकलनापासून सुरुवात केली असून आज सुमारे ४ लाख लिटर दूध संकलन केले जात आहे. तालुक्यामध्ये २०० डेऱ्या कार्यरत असून सुमारे ५५० कोटींची उलाढाल होत आहे. दरमहा साधारण पन्नास कोटी रुपये दूध उत्पादनातून तालुक्यात येत असून यामुळे शेतकऱ्यांना ६०० कोटी वार्षिक मिळत आहे. माजीमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली संघाने शेतकऱ्यांना आर्थिक समृद्ध केले असून आगामी काळामध्ये खाजगीकरणाची मोठी स्पर्धा आहे.

# कनगर सोसायटीत धावली सहमती एक्सप्रेस

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : कनगर सहकारी सोसायटीची अध्यक्ष-उपाध्यक्षपदाची निवडणूक बिनविरोध पार पडली. मागील महिन्यात अध्यक्षांवर अविश्वास प्रस्ताव दाखल होऊन १२ विरुद्ध १ मताने मंजूर झाला होता. बैठकीत १२ सदस्य व भाजपा-राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी एकत्र येऊन फोडाफोडीचे राजकारण न करता दोन्ही पक्षांनी एक-एक वर्ष अध्यक्ष-उपाध्यक्षपद घेऊन गावाच्या विकासासाठी एकी दाखविण्याचा निर्णय घेतला. चिठ्ठीतून अध्यक्षपदी राष्ट्रवादीचे आण्णासाहेब शेटे तर उपाध्यक्षपदी भाजपाचे सुभाष नालकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली.



यावेळी सदस्य अनिल घाडगे, भाऊसाहेब खाटेकर, प्रकाश नालकर, भाऊसाहेब घाडगे, शंकर जाधव, आण्णासाहेब गाढे, कला मुसमाडे, कुसुम घाडगे, अन्सार शेख, तुषार गाढे उपस्थित होते.निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून सहाय्यक निबंधक रावसाहेब खेडेकर यांनी पाहिले. सचिव साबळे व दिलीप माळवदे यांनी त्यांना मदत केली. नूतन पदाधिकाऱ्यांचे ना. राधाकृष्ण विखे पाटील, आमदार शिवाजी कर्डिले सुजय विखे पाटील, बाजार समिती व डॉ तनपुरे कारखान्याचे अध्यक्ष अरुण तनपुरे, सरपंच सर्जे राव घाडगे, १९ गाव पाणीपुरवठा योजनेचे अध्यक्ष सुयोग नालकर, नवनाथ मुसमाडे, बाळासाहेब गाढे, संदीप घाडगे, गोरखनाथ नालकर, वसंत घाडगे, भाऊसाहेब आडभाई, रघुनाथ नालकर, बाबासाहेब गाढे यांनी अभिनंदन केले आहे

# कामिका एकादशी यात्रोत्सवाची जय्यत तयारी सुरू : म्हस्के महाराज

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : लाखो वारकऱ्यांचे श्रद्धास्थान, ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे रचनास्थान व संत ज्ञानेश्वर महाराजांची कर्मभूमी असलेल्या तीर्थक्षेत्र नेवासा येथील संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊलींची यात्रा उत्सव आषाढी वद्य कामिका एकादशीला सोमवारी (दि.२१) साजरा होत असून यानिमित्ताने संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानसह प्रशासकीय पातळीवर यात्रेची जय्यत तयारी सुरू झाली असल्याची माहिती संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे विश्वस्त वेदांताचार्य देविदास महाराज म्हस्के यांनी दिली.

पंढरपूर आषाढी पायी वारी करणाऱ्या वारकऱ्यांची वारी माऊलींच्या दर्शनाने कामिका वद्य एकादशीला पूर्ण होते अशी लाखो वारकऱ्यांची भावना आहे.माऊलींच्या दर्शनासाठी येणाऱ्या लाखो भाविकांची गर्दी लक्षात घेता देवस्थानच्यावतीने नियोजन बैठका घेऊन त्यादृष्टीने नियोजन करण्यात येणार असल्याचे सांगून म्हस्के महाराज म्हणाले की, रस्ते साफसफाई, फिरते शौचालये, दुकानदारांसाठी बसण्याची व्यवस्था, दर्शन बारी व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, वाहनांसाठी पार्किंग व्यवस्थाआदी महत्वपूर्ण बाबींवर प्रशासकीय अधिकारी व संस्थान विश्वस्त व सेवेकरी यांच्या उपस्थितीत नियोजन करण्यात येणार आहे. यात्रेच्या दिवशी पहाटे ४ ते ५ यावेळेत यजमानांच्या हस्ते माऊलींचे मूर्तीमंत रूप असलेल्या पैस खांबाचे पूजन करण्यात येईल. भाविकांची गर्दी लक्षात घेता बाहेरील प्रवेशद्वार व मुख्य प्रवेशद्वाराजवळ दोन दर्शन बारींची व्यवस्था करण्यात येणार आहे. रस्त्यांची व परिसराची स्वच्छता करण्याचे काम नगरपंचायमार्फत करण्यात येणार आहे. तशा सूचनाही देण्यात आल्या आहेत. उत्सवाच्या यशस्वीतेसाठी प्रशासन, देवस्थान, संत ज्ञानेश्वर महाराज भक्त मंडळ, तरुण मंडळाचे पदाधिकारी सेवेकरी हे आतापासूनच सज्ज झाले आहेत.

# गायकवाड यांच्यावरील हल्ल्याचा विविध संघटनांकडून निषेध

## प्रशासनाला निवेदन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांच्यावर अक्कलकोट येथे झालेल्या भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ श्संभाजी ब्रिगेडसह विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी तहसीलदार कार्यालयात जाऊन हल्लेखोरांवर कठोर कारवाई करण्याचे निवेदन दिले.

निवेदनात म्हटले आहे की, गायकवाड यांच्यावरील हल्ल्याचा सूत्रधार दीपक काटेची



गुन्हेगारी पार्श्वभूमीचा असून त्याच्यावर गुन्हे दाखल आहेत. .संभाजी बिग्रेड संघटना शाहू-फुले-आंबेडकर विचारधारा मानणारी आहे. यांच्यावर केलेला हल्ला विचारधारेवर आहे. यामुळे चळवळीतील कार्यकर्त्यांच्या भावना तीव्र झालेल्या आहे. गायकवाड यांना पोलीस संरक्षण द्यावे, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

निवेदन देताना संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष संतोष भागडे, तालुकाध्यक्ष ऋषीकेश मोरगे, शहराध्यक्ष संजय बोंबले, मराठा सेवा संघाचे तालुकाध्यक्ष डॉ अरविंद बडाख, नागेश सावंत, बाबासाहेब भांड, अखंड मराठा समाजाचे शहराध्यक्ष सुरेश कांगुणे, संजय गांगड, कुणबी मराठा महासंघाचे दत्तात्रय जाधव, राजेंद्र मोरगे, संभाजी ब्रिगेडचे उत्तर जिल्हाध्यक्ष शिवाजी पवार, छावाचे जिल्हाध्यक्ष नितीन पटारे, विद्रोही सांस्कृतिक चळवळीचे जिल्हाध्यक्ष अशोकराव दिवे, राष्ट्रवादी काँग्रेस श्रीरामपूर शहराध्यक्ष लकी सेठी, काँग्रेस पक्ष शहराध्यक्ष आण्णासाहेब डावखर, आदिवासी प्रबोधन सेवा संघ अध्यक्ष ज्ञानेश्वर भंगड, प्रसाद खरात, गोकुळ गायकवाड, शरद नवाळे, बबन नगे, श्रीकृष्ण बडाख, रियाज खान पठाण, ॲड समीन बागवान, सुधा तावडे, मनोज होंड़े, प्रवीण लबडे, डॉ सलीम शेख, जीवन सुरूडे, पंडीतरांव बोंबले, व्ही जी गायधने, गणेश राशीनकर उपस्थित होते.

# बीएड विद्यार्थ्यांच्या पाठीशी शासनाने उभे रहावे : आ. अमोल खताळ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : बी.एड. महाविद्यालयांकडून नियोजित वेळेत मूल्यांकन अहवाल सादर न झाल्याबाबत विधानसभेत आवाज उठवताना आ. अमोल खताळ म्हणाले की, अहवाल सादर करण्याची अंतिम मुदत पार पडूनही अनेक महाविद्यालयांनी अद्यापही अहवाल सादर केलेला नाही. हे अत्यंत गंभीर असून विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी हे नुकसानदायक ठरू शकते. अशा बीएड कॉलेजवर शासनाने कारवाई करून विद्यार्थ्यांच्या पाठीमागे भक्कम उभे राहावे, अशी मागणी खताळ यांनी विधानसभेत केली.

राज्यातील बीएड महाविद्यालयांनी अहवाल सादर करण्यासाठी आवश्यक असलेल्या ऑनलाइन प्रणालीमध्ये काही तांत्रिक अडचणी, अहवाल सादर करण्याच्या प्रक्रियेबद्दल गैरसमज, महाविद्यालयांमध्ये पुरेसा कर्मचारी वर्ग नसणे, यामुळे अहवाल तयार करणे आणि सादर करणे कठीण होऊ शकते. ज्यामुळे महाविद्यालयांना अहवाल सादर करणे शक्य झाले नसेल. या अडचणी दूर करणे राज्य सरकारची जबाबदारी नाही काय?

काही महाविद्यालयांना अहवाल सादर करण्याच्या प्रक्रियेबद्दल पुरेसे ज्ञान नसेल किंवा गैरसमज असतील, ज्यामुळे ते अहवाल सादर करण्यास दिरंगाई करत असतील. काही महाविद्यालयांना अहवाल सादर करण्यासाठी आवश्यक शुल्क भरण्यात अडचणी येत असतील, ज्यामुळे ते अहवाल सादर करत नसतील. माझा सरकारला प्रश्न आहे की, या सर्व बाबी तपासण्याची आवश्यकता का भासली नाही? आणि हा विद्यार्थ्यांच्या भविष्याचा प्रश्न असल्याने बीएड महा विद्यालयांची मान्यता रद्द करण्याचा निर्णय मागे घेण्या साठी एनसीटीईकडे महाराष्ट्र शासन पत्र व्यवहार करणार आहे काय? या निमित्ताने कंत्राटी प्राध्यापकांचे असणारे प्रलंबित प्रश्न सरकार मार्गी लावणार काय? असे एकामागे एक अनेक प्रश्न आ. खताळ यांनी विचारात या प्रश्नाकडे विधानसभेचे लक्ष वेधले.

# विठ्ठल-रुखमाईची भास्करगिरी बाबांच्या हस्ते पूजा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : पंढरपूर येथील पंढरीच्या विठुरायासह रुक्मिणी मातेची प्रक्षाळ पूजा मंदिर समितीचे सदस्य अहिल्यानगर जिल्हयातील नेवासा तालुक्यातील देवगड येथील श्री गुरूदेव दत्त पिठाचे प्रमुख महंत भास्करगिरी महाराज यांच्या हस्ते बुधवारी (दि.१६) करण्यात आली. यावेळी आयुर्वेदिक काढयाचा नैवेद्य दाखवून देवाचा शीणवटा काढण्यात आला.

आषाढी यात्रेला भाविकांची होणारी गर्दी लक्षात घेता विठ्ठलाचा पलंग काढून भाविकांना २४ तास दर्शन उपलब्ध करून देण्यात आले होते. देवाचा शीणवटा व थकवा घालविण्यासाठी आयुर्वेदिक काढा विठ्ठलाला नैवेद्य म्हणून रात्री शेजारतीच्या वेळी दाखविण्यात आला. तसेच प्रक्षाळ पूजा करून देवाचे राजोपचार सुरू करण्यात आले आहे. २७ जून रोजी श्रींचा पलंग परंपरेनुसार



काढण्यात आला होता व श्री विठ्ठलास लोड व रुक्मिणी मातेस तक्या देण्यात आला होता. त्यामुळे काकडा आरती, पोशाख, धुपारती, शेजारती इत्यादी राजोपचार प्रक्षाळ पूजेपर्यंत बंद ठेवून भाविकांना जास्तीतजास्त वेळ दर्शन उपलब्ध करून देण्यात आले होते.

बुधवारी विठ्ठलाची व रुक्मिणी मातेची प्रक्षाळ पूजा भास्करगिरीजी बाबा व प्रकाश जवंजाळ यांच्या हस्ते झाली. पूजेच्या सुरुवातीला व्यवस्थापक मनोज श्रोत्री व लेखाधिकारी मुकेश अनेचा यांच्या हस्ते श्रींस पहिले स्नान घालण्यात आले. तसेच विठ्ठलाला अलंकार परिधान करण्यात आले. आजपासून श्री विठ्ठलास व श्री रुक्मिणी मातेस पहाटे होणारी काकडा आरती, नित्यपूजा, महानैवेद्य, पोषाख, धुपारती व शेजारती इथपर्यंतचे सर्व राजोपचार परंपरेनुसार सुरू करण्यात येत आहेत. यावेळी मंदिराचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, सदस्या शकुंतला नडगिरे, संभाजी शिंदे, ज्ञानेश्वर महाराज देशमुख जळगावकर, व्यवस्थापक मनोज श्रोत्री, लेखाधिकारी मुकेश अनेचा, विभाग प्रमुख संजय कोकीळ, देवगडचे सेवेकरी संदीप साबळे यांच्यासह पौरोहित्य करणारे ब्रम्हवृंद मंडळी व कर्मचारी उपस्थित होते.

# सात्रळ महाविद्यालयात युवा कौशल्य दिन उत्साहात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**झरेकाठी** : लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या सात्रळ येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात जागतिक युवा कौशल्य दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. प्रमुख अतिथी म्हणून प्राचार्य डॉ. एस. एन. शिंगोटे उपस्थित होते. प्रास्ताविक कौशल्य विकास कक्ष प्रमुख प्रा. एच. एल. दिवेकर यांनी केले. प्राचार्य डॉ. शिंगोटे म्हणाले की,तांत्रिक कौशल्याबरोबरच संवाद कौशल्य, समस्या सोडविण्याची क्षमता आणि नेतृत्वगुण यांचा विकासही अत्यंत आवश्यक आहे. अध्यक्षस्थानी उपप्राचार्या डॉ. जयश्री सिनगर होत्या. यावेळी प्राणीशास्त्र विभागाचे डॉ. आर. एस. तांबे यांनी मनोगत व्यक्त केले. आभार प्रा. ए. एन. खैरे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी कौशल्य विकास समितीचे सदस्य प्रा. तुषार कडसकर यांच बहुमोल सहकार्य लाभले.

# जमिनी परत मिळण्यासाठी आकारी पडितांचे राज्यपालांना साकडे

## मंत्री विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली घेतली भेट

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**माळवाडगाव** : (खंडकरी शेतकऱ्यांप्रमाणेच आकारी पडित शेतकऱ्यांच्या शेती महामंडळाच्या हरेगाव मळ्यातील जमिनी शेतकऱ्यांना परत मिळाव्यात यासाठी स्वाक्षरी करून मान्यता देण्याची विनंती आकारी पडीत वारसदार शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाने ना.राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यपाल डॉ. सी. पी राधाकृष्णन् यांना केली. मंत्री विखे पाटील यांच्या नेतृत्वाखाली शेतक-यांच्या शिष्टमंडळाने राजभवन येथे त्यांची भेट घेतली. शिष्टमंडळाने राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांच्या बराबेर सविस्तर चर्चा केली.

या जमीनी शेतकऱ्यांना पुन्हा मिळाव्यात यासाठी तत्कालिन महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या



पाठपुराव्यातून महायुती सरकारने विधानसभा निवडणुकीपूर्वी मंत्रिमंडळात निर्णय घेऊन, या संदर्भातील कायद्याच्या सुधारणेला २३ सप्टेंबर २०२४ रोजी मान्यता दिली होती. मंत्रिमंडळाच्या मान्यतेनंतर कायद्यातील सुधारणेचा अध्यादेश राज्यपालांच्या मान्यतेसाठी पाठविण्यात आला होता. परंतु १५ ऑक्टोंबर २०२४ पासून विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागल्यामुळे या अध्यादेशाला मान्यता मिळू शकलेली नव्हती.

यासंदर्भात विखे पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडेही सातत्याने पाठपुरावा सुरु ठेवला होता. त्याचाच एक भाग म्हणून शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाने राज्यपालांची भेट घेवून मान्यता देण्याची विनंती केली.

श्रीरामपूर तालुक्यातील ९ गावांमधील ७ हजार ३७७ एकर जमीन इंग्रज शासनाने ताब्यात घेऊन १९३४ साली या गावातील ताब्यात घेतलेल्या क्षेत्राला महसूल गावांचा दर्जा दिला होता. सन २०१२ साली इंग्रज सरकारने ताब्यात घेतलेल्या जमिनी खंडकरी शेतकऱ्यांना परत करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. आकारी पडीत जमिनीसंदर्भात वेळोवेळी सादर करण्यात आलेले प्रस्ताव १९१८ रोजी राजपत्रात असलेल्या तरतुदीमुळे फेटाळण्यात येत होते. हीच बाब विचारात घेऊन खंडकरी शेतकऱ्यांप्रमाणे हरेगाव मळ्यातील शेतकऱ्यांना जमीन वाटप करता येईल किंवा कसे याबाबत राज्याचे महाभियोक्ता यांचे अभिप्राय घेऊन महायुती सरकारने न्यायालयातसुध्दा वेळोवेळी आपली बाजू मांडली होती. आज राज्यपाल यांची भेट घेऊन शिष्टमंडळाने त्यांना जमीन वाटपासाठी मान्यता द्यावी अशी विनंती केली आहे

यावेळी विखे पाटील यांच्या समवेत शेतकरी संघटनेचे नेते ॲड.अजित काळे, याचिकाकर्ते गिरीधर आसने, भाजपचे तालुकाध्यक्ष बाबासाहेब चिडे, डॉ शंकरराव मुठे, भाऊसाहेब बांद्रे, गोविंद वाघ, बाळासाहेब बकाल, शरद आसने, संपतराव मुठे, डॉ. दादासाहेब आदिक, सचिन वेताळ, सोपान नाईक, सुनील आसने, बबनराव नाईक, बाबासाहेब वेताळ आदीसह प्रशासकीय अधिकारी, सचिव उपस्थित होते.

# द • ख • ल

## शिरसगाव ते पुणतांबा पायी दिंडीचे सोमवारी प्रस्थान

**शिरसगाव** : श्रीरामपूर तालुक्यातील शिरसगाव येथून सोमवारी (२१ जुलै) श्रीक्षेत्र शिरसगाव ते श्रीक्षेत्र पुणतांबा आषाढी एकादशीनिमित्त सकाळी सात वाजता पायी दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. दिंडीचे प्रस्थान विठ्ठल मंदिर, महादेव मंदिर, साईबाबा मंदिर शिरसगाव येथून होणार आहे. या सोहळ्याचा आनंद घ्यावा व सहभागी व्हावे, असे आवाहन विठ्ठल मंदिर, महादेव मंदिर ट्रस्ट, समस्त भजनी मंडळ, महिला भजनी मंडळ, ग्रामस्थ, साई प्रतिष्ठान, श्री नर्मदेश्वर महादेव मंदिर ट्रस्ट आदींनी केले .

## हिंदू एकताचा आज मेळावा

**श्रीरामपूर** : हिंदू एकता आंदोलन पक्षाचा उद्या (शुक्रवार) पुणे येथे मेळावा होत आहे. मेळाव्यामध्ये पक्षाची नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात येणार असून. स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढविण्याच्या विषयावर विचारविनिमय करण्यात येणार आहे. नवीन युवकांना कार्यकारिणीमध्ये देवून समाजसेवेची संधी देण्यात येणार आहे. कार्यकर्त्यांना निवडणुकांसंदर्भात मार्गदर्शन करण्यात येणार आहे. हा मेळावा श्रेयस सिद्धी बँक्वेट हॉल (पुणे) येथे होणार आहे. मेळाव्यात राष्ट्रीय अध्यक्ष रामसिंग बावरी, प्रदेशाध्यक्ष सुदर्शन शितोळे, प्रदेश सरचिटणीस दीपक ढवळे, सांगली जिल्हाध्यक्ष दत्तात्रय शेळके, अमित सूर्यवंशी मार्गदर्शन करतील मेळाव्याचे आयोजक पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष संतोष जगताप, पुणे जिल्हाध्यक्ष श्रीकांत कापसे, शहराध्यक्ष रवी संघवी आहेत. मेळाव्यास उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजकांनी केले आहे.

## शिनाई देवस्थानमध्ये गुरुपूजन



**नेवासा** : गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने तालुक्यातील भानसहिवरा येथील तीर्थक्षेत्र शिनाई जागृत देवस्थान येथे उत्तराधिकारी बालब्रम्हचारी आवेराज महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली भाविकांनी देवस्थानचे प्रमुख श्री श्री श्री १०८ महंत गुरुवर्य श्री आराध्य बाबाजींचे गुरूपूजन करून गुरुपौर्णिमा उत्सवात सहभाग नोंदवला. गुरुपौर्णिमा विविध धार्मिक कार्यक्रमांनी साजरी करण्यात आली. शिनाई देवस्थान येथे दिवसभरात हजारो भाविक भक्तांनी शिनाई मातेसह श्री श्री १०८ महंत गुरुवर्य श्री आराध्य बाबाजी व उत्तराधिकारी ज्योतिषाचार्य बालब्रम्हचारी महंत आवेराज महाराज यांचे दर्शन घेऊन संतपूजन केले. याप्रसंगी शिनाई मातेसह भगवान दत्तात्रय, श्रीकृष्ण भगवान यांच्या मूर्तीस विधिवत पूजेने महाअभिषेक घालून महाआरती करण्यात आली. गुरुवर्य बाबाजींना शिनाई भक्त परिवाराने एकत्रित येत सोन्याची अंगठी बाबांना अर्पण केली.गुरुपूजन प्रसंगी पंचायत समितीचे माजी उपसभापती किशोर जोजार, संतसेवक जनार्दन पटारे, सुशील जैन, अशोक भणगे, आत्माराम घोरपडे, बाबासाहेब भणगे, बबनराव भणगे, ज्ञानेश्वर पवार, प्रितम साळुंके, रावसाहेब पटारे, माऊली क्षीरसागर, बाळासाहेब पेहरे, भाऊसाहेब बनकर, कानिफनाथ गोडसे, विलास मोहिते, गणेश जाधव, अविनाश ढवाण, समाधान गुजर, नंदु जाधव आदी उपस्थित होते. बाबासाहेब भणगे यांच्यावतीने महाप्रसाद देण्यात आला.

## हयातीच्या दाखल्यासाठी ॲपचा वापर करावा

**शिरसगाव** : विशेष सहाय्य कार्यक्रमामंतर्गत राज्य पुरस्कृत संजय गांधी निराधारअनुदान योजना व श्रावण बाळ राज्य निवृत्तीवेतन योजना व केंद्र पुरस्कृत इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी वृद्धापकाळ निवृत्ती वेतन योजना या योजना राबविण्यात येतात. केंद्र शासनाने विशेष सहाय्य योजनेतील लाभार्थ्यांच्या हयात दाखल्याबाबत ॲप विकसित केले आहे. याॲपद्वारे लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांचे हयातीचे प्रमाणपत्र ऑनलाईन करावयाचे असून प्रमाणपत्र पोर्टलवर अपडेट होणार आहे. अधिक माहितीसाठी तहसील कार्यालय, संजय गांधी निराधार योजना कार्यालय, नायब तहसीलदार दत्तात्रय शेकटकर यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन तहसीलदार मिलिंदकुमार वाघ यांनी केले आहे.

## वाळू वाहतुकीमुळे रस्ता व नागरिकांना धोका

**श्रीरामपूर** : शहरातील वॉर्ड नं. ६, कांदा मार्केट, कौसल्यानगर, खिलारी वस्ती आदी परिसरातून वाळू, डबर, मुरूम आदी जड वाहनांची वाहतूक रात्रंदिवस सुरू असल्यामुळे नगरपालिकेने तयार केलेल्या डांबरी रस्त्यास मोठे खड्डे पडले आहेत. पायी चालणाऱ्या नागरीकांना भरधाव वेगात धावणारे वाळू, खडी, मुरूम वाहनापासून धोका निर्माण झाला आहे.खडी, मुरूम, वाळू, डबर या जड वाहनांची वाहतूक बंद करावी व ही वाहने मुख्य रस्त्याने वाहतूक करण्यास भाग पाडावे, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते राजेंद्र पानसरे यांची पोलिस विभागाकडे केली आहे. वरील जड वाहने ही विजय हॉटेलपासून निघून अप्पर पोलिस अधीक्षक यांच्या निवा स्थानासमोरून जोराने जातात. खिलारी वस्तीकडील रस्त्याने लक्ष्मी त्र्यंबक कार्यालयाकडून वाळू आणण्यासाठी जातात व वाळू भरून पुनश्च या रस्त्याने बेलापूर रोडकडे जातात. वाळू वाहतुकीचा परवाना ट्रकधारकांकडे असेल तर त्यांनी मुख्य रस्त्याने भरलेली वाहने नेणे आवश्यक आहे. परंतु ते छोट्या रस्त्याने धावतात.कांदा मार्केट, खिलारी वस्ती, शेळके आय हॉस्पिटल, कौसल्यानगर परिसरात सकाळ व संध्याकाळच्या वेळेत जेष्ठ नागरीक, महिला, पुरूष दररोज वॉकींगसाठी जात असतात. या परिसरातून वाळूची वाहने जोराने धावतात. त्यामुळे ज्येष्ठांचे अपघात होण्याची शक्यता आहे. पोलिसांनी या वाहनांवर कारवाई करणे गरजेचे आहे. अप्पर पोलिस अधीक्षक निवासस्थानकाजवळ बंदोबस्तासाठी पोलिस असतात. त्यांच्यासमोरून वरील जड वाहने धावत असतानाही पोलिस कर्मचारी कोणतीही कारवाई करीत नाही. वाहनाची कागदपत्रे, वाहन चालकाचे लायसन्स व वाहतुकीचे परवाने आहेत किंवा नाहीत याची तपासणी करून जड वाहतुकीस रस्त्याने जाण्यास मनाई करून मुख्य रस्त्याने वाहतूक करण्याची सूचना करावी, अशी मागणी पानसरे यांनी केली आहे.

## पान १ वरुन

### फ्री स्टाईल हाणामारीने सर्वपक्षीय आमदार अडचणीत!

असं पोलिसांनी विधानसभा अध्यक्षांना पाठवलेल्या अहवालात नमूद केलं आहे.सर्वपक्षीय आमदार त्यांच्या कार्यकर्त्यांना घेऊन विधिमंडळात येतात. बऱ्याचदा आमदारांच्या कार्यकर्त्यांकडे पासही नसतात. परवाना नसताना ते अनेक ठिकाणी फिरत असतात. विधिमंडळात त्यांचा अगदी मुक्त संचार असतो. आमदारांच्या कार्यकर्त्यांचं विधिमंडळात फोटोसेशन चालतं, अशा महत्त्वाच्या बाबी पोलिसांनी त्यांच्या अहवालात नमूद केल्या आहेत. आता या प्रकरणात विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर काय कारवाई करतात, याकडे लक्ष लागलं आहे. विधिमंडळाच्या लॉबीत आमदार आणि त्यांच्या सोबत शासकीय स्वीय सहायकाला परवानगी आहे. पण सर्वपक्षीय आमदार नियम धाब्यावर बसवत असल्याचं समोर आलं. आज घडलेला धक्काबुक्की, मारामारीचा प्रकार पाहिल्यास यापुढे नियम अगदी काटेकोरपणे पाळण्याची सूचना दिल्या जाऊ शकतात. त्यामुळे सगळ्याच आमदारांच्या अतिउत्साही कार्यकर्त्यांना चाप बसू शकतो.

### रुपाली चाकणकरांच्या नावाने महिलांची फसवणूक

स्वतःला जळगाव येथील महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष असल्याचे सांगून इतरांची फसवणूक करत आहे. सुनील भट्टड व या दोन महिलांचा आयोगाशी कुठलाही अधिकृत संबंध नाही. त्यांची कुठल्याही पदावर नियुक्ती करण्यात आलेले नाही. अशा चुकींच्या कृतीमुळे आयोगाची व अध्यक्षांची प्रतिमा मलीन होत असून यामध्ये सर्वसामान्यांची फसवणूक होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सदर घडलेल्या प्रकरणी तात्काळ चौकशी करून गुन्हा दाखल करून कारवाई करण्यात यावी व त्याचा अहवाल पाच दिवसात देण्यात यावा असे या पत्रात म्हटले आहे. भट्टड यांच्यावर गुन्हा दाखल होऊन पक्षातून त्यांची हकालपट्टी होणार काय, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### हनीट्रॅपवर सरकारने आपली भूमिका स्पष्ट करावी : दानवे

ठाणे गुन्हे शाखेकडे एकूण तीन तक्रारी आल्या असल्याची माहिती सूत्रांनी दिलेली आहे. या तीनही तक्रारींची गोपनीय चौकशी सध्या पोलिसांकडून सुरू आहे. नाशिकमधील एक वरिष्ठ अधिकारी, नवी मुंबईतील एक व्यक्ती आणि ठाण्यातील एका बड्या व्यक्तीने या तक्रारी केल्याचे समजते. या तिन्ही तक्रारींमध्ये गंभीर स्वरुपांचे आरोप असून उच्चस्तरीय गोपनीय चौकशी सुरू आहे. या प्रकरणाचा तपास करताना ओळख सार्वजनिक करु नये, असे तक्रारदारांचे मत असल्याने अधिकाऱ्यांची नावे गोपनीय ठेवून अशा प्रकरणाचा तपास केला जात असल्याची माहिती सूत्रांनी दिली. ठाणे गुन्हे शाखेकडे तीन तक्रारी प्राप्त झाल्या असल्या तरी अद्याप गुन्हा दाखल झालेला नसल्याची माहितीही सूत्रांनी दिली.

जे प्रशासकीय अधिकारी हे हनीट्रॅपमध्ये अडकले जातात त्यांच्या तक्रारी आमच्याकडे येतात. या प्रकरणाचा तपास करताना आमची ओळख ही सार्वजनिक करू नका असे तक्रारदारांनी सांगितले आहे. त्यामुळे अधिकाऱ्यांची नावे गोपनीय ठेवून अशा प्रकरणांचा तपास केला जात आहे.

### दिनो मोरियाने तोंड उघडलं तर अनेकांचा मोरया होईल

मात्र तो बाहेर का फेकला गेला याचं आत्मपरिक्षण करण्याची गरज आहे. कोणाच्या काळात हे बाहेर गेले, 'पत्राचाळीमध्ये कोणी माया गोळा केली? संक्रमण शिबिरात खुराड्यासारख ठेवण्यात आल ते मराठी माणस नाही का? असा सवाल एकनाथ शिंदेंनी उपस्थित केला. मुंबईतील रमाबाई नगरमध्ये भाडं दिल जात नव्हतं, मी स्वत: चेक वाटून आलो. 'सर्व प्रकल्प जेव्हीत करायचे असा निर्णय आम्ही घेतला. 'गिरणी कामगार यांच्या संदर्भात ही बैठक झाल. 'ज्यादा इन्सेटिंव देऊन त्यातून निर्माण होणारी घर गिरणी कामगारांना देणार आहोत. १ लाख लोकांचा आम्ही पहिल्यांदा सर्व्हे केला, 'किती पात्र लोक आहेत याची नोंद केल्याचे एकनाथ शिंदेंनी सांगितले.

सिबिल स्कोअरची अट घालून शेतकऱ्यांना पिक कर्ज नाकारणाऱ्या

## बँक विरोधात गुन्हे दाखल करा : मागणी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**गंगापूर :** राष्ट्रीयकृत बँकेकडून शेतकऱ्यांना पीक कर्जासाठी सिबिल स्कोअर ची अट घालून शेतकऱ्यांची अडवणूक करणाऱ्या बँक अधिकाऱ्यांच्या विरोधात शासनाच्या आदेशाप्रमाणे गुन्हे दाखल करावे अशी मागणी श्री स्वामी विवेकानंद प्रतिष्ठानचे अध्यक्ष वाल्मिक शिरसाठ यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

गंगापूर येथील तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सध्या शेतीच्या खरीप हंगामाचा काळ सुरू असून शेतकऱ्यांना खते बी बियाणे व शेतीची मशागत यासाठी पीक कर्जाची गरज आहे. मात्र शेतकरी बँकेत गेल्यास राष्ट्रीयकृत बँकेचे अधिकारी शेतकऱ्यांना सिबिल स्कोरची अट घालून कर्ज प्रकरणे नाकारुन शेतकऱ्यांना अपमानास्पद वागणूक देतात. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १९ मे २०२५ रोजी घेतलेल्या राज्यस्तरीय बँकर्स समितीच्या बैठकीत कुठलेही बँकेचे अधिकारी शेतकऱ्यांच्या पीक कर्जासाठी सिबिल स्कोअरची अट दाखवून अडवणूक करीत असेल तर त्यांच्याविरुद्ध गुन्हे दाखल करावे असे स्पष्ट आदेश देण्यात आले असताना तसेच सहकार विभागाचे आयुक्त अनिल कवडे यांनी देखील राज्यस्तरीय बँकर्स समितीला लेखी सूचना पाठवून राष्ट्रीयकृत बँकांनी शेतकऱ्यांच्या कर्ज प्रकरणासाठी सिबिलची अट लावू नये असे आदेश दिले होते. तरी देखील गंगापूर तालुक्यातील अनेक बँकांचे अधिकारी शेतकऱ्यांना कर्ज देण्यासाठी सिबिल स्कोअर ची अट दाखवून टाळाटाळ करीत आहे याबाबत सर्व बँकेच्या अधिकाऱ्यांची एकत्रित बैठक घेऊन कुठल्याही शेतकऱ्याला सिबिल स्कोर ची सक्ती करू नये याबाबतच्या सक्त सूचना द्याव्यात तसेच शेतकऱ्यांना सिबिल मागणी करणाऱ्या बँकेबाबत पुराव्यासहलिखित तक्रार केल्यास संबंधित बँकेच्या अधिकाऱ्याविरुद्ध तात्काळ गुन्हे दाखल करण्याचे आदेश द्यावेत या बैठकीसाठी शेतकऱ्यांच्या प्रतिनिधीला उपस्थित राहणे बाबत पूर्व सूचना द्याव्या आठ दिवसाच्या आत कार्यवाही न केल्यास तहसील कार्यालयासमोर आंदोलन छेडण्याचा इशारा वाल्मिक शिरसाठ यांनी निवेदनाद्वारे दिला आहे निवेदनावर सिरसाट यांची स्वाक्षरी आहेत.

## कामिका एकादशीनिमित्त नेवासा शहरातील वाहतुकीत बदल

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** तीर्थक्षेत्र नेवासा येथे सोमवार दि.२१ जुलै रोजी संत श्री ज्ञानेश्वर माऊलींची यात्रा आषाढी वद्य कामिका एकादशीच्या दिवशी भरत आहे. या यात्रेनिमित्त जिल्हा पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांच्या आदेशानुसार नेवासा शहरातील वाहतुकीमध्ये बदल करण्यात आला आहे. त्यानुसार वाहन चालकांनी आपली वाहने वळवावित व नियमांचे पालन करावे असे आवाहन नेवासा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक धनंजय जाधव यांनी केले आहे.

सोमवारी दि.२१ जुलै रोजी यात्रेनिमित्त मार्गात झालेला बदल पुढीलप्रमाणे नेवासा फाटा ते श्रीरामपुरकडे जाणारे वाहनांकरीता मार्ग नेवासा फाटा- प्रवरासंगम- सिद्धेश्वर मंदिर- वाशिम टोका- गोधेगाव- भालगांव- नेवासा बु. - टाकळीभान- श्रीरामपुर असा असेल तर श्रीरामपुर ते नेवासा फाटा ते शेवगावकडे जाणारे वाहनांकरीता मार्ग

श्रीरामपुर- टाकळीभान- नेवासा बुद्रुक- भालगाव- गोधेगाव- वाशिम टोका- सिध्देश्वर मंदिर-प्रवरासंगम- नेवासा फाटा- शेवगाव असा यादिवशी रहाणार असून

वरील आदेश शासकीय वाहने, म्बुलन्स, फायर ब्रिगेड व स्थानिक प्रशासनाने अत्यावश्यक कारणास्तव परवानगी दिलेल्या वाहनांना लागु राहणार नाही असे स्पष्ट करण्यात आले आहे.

संत ज्ञानेश्वर माऊलींच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांच्या वाहनांसाठी पार्किंग व्यवस्था करण्यात आली असून ती पुढीलप्रमाणे नेवासा फाट्याकडून येणाऱ्या वाहना करता कृषी उत्पन्न बाजार समिती (मार्केट कमिटीचे) ग्राउंड तर श्रीरामपूरकडून नेवासा येथे येणाऱ्या वाहनांसाठी नेवासा बुद्रुक येथील जिल्हा परिषद शाळा

तर राहुरी खूपटीकडून येणाऱ्या वाहनांसाठी खूपटी रोड वरील ईदगाह मैदान अशी व्यवस्था करण्यात आली आहे. केवळ दुचाकी वाहनांसाठी नेवासा शहरातील एस.टी. स्टँड प्रांगण व पंचायत समिती मैदान आणी या बाजूलाच असलेली जिल्हा परिषद प्राथमिक शाळा अशी व्यवस्था करण्यात आली असून दि.२१ जुलै रोजी या दिवशी स्थानिक रहिवाशांनी चार चाकी वाहनांचा उपयोग टाळावा व पोलीस प्रशासनास सहकार्य करावे असे आवाहन पोलीस निरीक्षक धनंजय जाधव यांनी केले आहे

## विद्यार्थ्यांनी नितीमुल्याचे अनुकरण करणे गरजेचे : खासदार वाकचौरे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कोपरगाव :** आयुष्याच्या वाटा समृद्ध करण्यासाठी जीवनात शिक्षणाचे अनन्यसाधारण महत्व आहे. प्रत्येक पालकांची इच्छा असते की, आपला पाल्य शिक्षण घेवून जीवनात यशस्वी व्हावा. आपल्या पालकांचे हे स्वप्न साकार करण्यासाठी विद्यार्थ्यांनी आपली ज्ञानाची मर्यादा वाढविली पाहिजे. त्यासाठी वाचन संस्कृती जोपासून मोबाईल व टीव्हीपासून दूर राहिले पाहिजे, गुरु व वडीलधाऱ्यांचा आदर ठेवला पाहिजे. या नीतीमूल्यांचे आचरण करा तुम्ही जीवनात यशस्वी झाल्याशिवाय राहणार नाही असा मुलमंत्र खा.भाऊसाहेब वाकचौरे यांनी केले आहे

कोपरगाव तालुक्यातील शैक्षणिक व सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या

व्हॉईस ऑफ मिडिया संघटनेचे वतीने तालुक्यातील दहावी बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळ्याचे आयोजन आत्मा मालिक इंटरनॅशनल स्कूल येथील सभागृहात करण्यात आले होते यावेळी ओम गुरुदेव माऊली यांच्या प्रतिमेचे दीप प्रज्वलन करून सुरुवात करण्यात आली याप्रसंगी खासदार भाऊसाहेब वाकचौरे शिक्षण, महर्षी डॉ. नानजीभाई ठक्कर (ठाणावाला) वास्तुविशारद ज्ञानेशानंद शास्त्री महाराज, लोणी खुर्द च्या लोकनियुक्त सरपंच प्रभावती घोगरे ,आत्मा



मालिक इंटरनॅशनल स्कूलचे शिक्षण विभागाचे प्रमुख सुधाकर मलिक,उद्योजक कुलदीप देशमुख(पुणे) ,उद्योजक श्रीकांत शहाणे , व्हाइस ऑफ मिडियाचे जिल्हाध्यक्ष गोरक्षनाथ मदने पत्रकार विश्वास आरोटे, समाजभूषण डॉ. तानाजी लामखडे, प्रशांत टेके ,मनीष जाधव, सिद्धार्थ मेहेरखांब, प्रल्हाद मेहरे, रवींद्र भालेराव ,नामदेव कोळपे यावेळी उपस्थित होते.

प्रशांत टेके यांनी संस्थेच्या प्रकल्पाची उद्दिष्टे, प्रकल्प कार्यवाही, प्रकल्पातील विविध सहशालेय उपक्रम याविषयी माहिती दिली.पुढे बोलताना नानजीभाई ठक्कर म्हणाले गुरुकुल विभागामुळे गुणवत्तेचा वाढलेला आलेख तसेच गुरुकुल विभागांतर्गत सुरू असलेल्या स्पर्धा परीक्षा व त्याचे यश हे गुरुकुल प्रकल्प MPSC, UPSC परीक्षेचा पाया आहे. आत्मा मलिक संस्था ही शासनाची प्रयोगशाळा असल्याचे सांगितले सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुमित दरेकर यांनी तर आभार डॉ तानाजी लामखडे यांनी केले विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सकारात्मक दृष्टिकोनामुळे यश प्राप्ती होते जीवन जगत असताना आणि विद्यार्थीदशेत शिक्षण घेत असतांना प्रत्येकाला प्रयत्न, निष्ठा आणि सकारात्मकता यांच्या बळावर यश नक्कीच मिळवता येते. प्रामाणिकपणा आणि कष्टाच्या जोरावर आपण सहज गगनभरारी घेऊ शकतो विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यांच्या ह्या विचारांनी विद्यार्थ्यांच्या मनात नवीन ऊर्जा निर्माण झाली.

**– डॉ नानजभाई ठक्कर**
**शिक्षण महर्षी**

## निधन वार्ता..

### साखरबाई राऊत



**वडाळा महादेव :** येथील साखरबाई अशोकराव राऊत (वय ६८) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्याच्या पश्चात पती, मुले, मुलगी, सुना, नातवंडे जावई असा मोठा परिवार आहे. येथील सामाजिक कार्यकर्ते अशोकराव राऊत यांच्या त्या पत्नी तर अनिल राऊत गणेश राऊत उज्वला शेलार यांच्या त्या मातोश्री होत.

### मोहनराव गवळी



**श्रीरामपूर :** येथील नगरपालिकेतील बांधकाम विभागातील मु'य अभियंता सुर्यकांत गवळी व महावितरणचे ऑपरेटर संतोष गवळी यांचे वडील मोहनराव भिमाजी गवळी (वय ८४) यांचे बुधवार, दि. १६ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, ३ मुले, २ मुली, सुना, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. ते सुरभी सलूनचे मालक संजय व गोकुळ गवळी यांचे चुलते होते.

## संत ज्ञानेश्वर महाराजांच्या यात्रेच्या पार्श्वभूमीवर अधिकाऱ्यांची नियोजन बैठक

**नेवासा :** संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज यांची कर्मभूमी व ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे रचनास्थान असलेल्या तीर्थक्षेत्र नेवासा येथील संत ज्ञानेश्वर महाराज मंदिराच्या सभागृहात कामिका एकादशी निमित्ताने सोमवारी भरणाऱ्या यात्रेच्या पार्श्वभूमीवर प्रशासकीय अधिकारी तसेच संत ज्ञानेश्वर महाराज मंदिर विश्वस्त मंडळ यांच्या प्रमुख उपस्थितीत दि.१७ रोजी गुरुवार सायंकाळी ५ वाजता नियोजन बैठक घेण्यात आली या बैठकीत विविध विषयांवर चर्चा होऊन त्यादृष्टीने उपाययोजना करण्यात आली.

संत ज्ञानेश्वर महाराज मंदिर देवस्थानच्या सभागृहात झालेल्या बैठकीच्या प्रसंगी देवस्थानचे मार्गदर्शक व विश्वस्त वेदांताचार्य हभप देविदास महाराज म्हस्के, संस्थानचे अध्यक्ष पांडुरंग अभंग, तहसीलदार सजंय बिराजदार,पोलीस उपनिरीक्षक मनोज आहेर, यासह नगरपंचायत, महावितरण, पंचायत समिती,सार्वजनिक बांधकाम, विभागाचे प्रमुख व मंदिर विश्वस्त रामभाऊ जगताप,कैलास जाधव, समर्पण फाउंडेशनचे डॉ. करणसिंह घुले,डॉ.संजय सुकाळकर, जनसपंर्क अधिकारी आशिष कावरे यावेळी उपस्थित होते.

माऊलींच्या होणाऱ्या यात्रेच्या निमित्ताने बारी व्यवस्था,दुकानदारांसाठी जागेची व्यवस्था,नेवासे शहरातील पार्किंग व्यवस्था, रस्ते, लाईट, पाणी, याबाबत नियोजन व्हावे अशी सूचना यावेळी अध्यक्ष व विश्वस्त मंडळ यांनी अधिकारी व पदाधिकारी यांनी यावेळी बोलताना केल्या.

तहसीलदार बिराजदार म्हणाले, यात्रेसाठी प्रशासनाच्या वतीने योग्य ते नियोजन केले जाईल, त्यासाठी प्रशासकीय यंत्रणा सतर्क करण्यात येईल. भाविकांना वाहनांचा अडथळा होणार नाही. यासाठी शहरातील मोकळ्या जागेत पार्किंगची व्यवस्था पोलीस विभागाकडून केली जाईल असे सांगितले.

नगरपंचायतच यांना देखील येणाऱ्या वारकऱ्यांच्या सेवेसाठी स्वच्छता कक्ष,फिरते शौचालये तसेच पिण्याचे पाणी मंदिर परिसर अशी सुविधा मंदिर दर्शन मार्गावर करावी अशी सूचना देण्यात आल्या. या बैठक प्रसंगी बांधकाम विभाग,आरोग्य विभाग ,वीज वितरण कंपनी,पोलीस स्टेशन,कर्मचारी यांच्यासह विविध खात्याचे अधिकारी पदाधिकारी उपस्थित होते. समर्पण फाउंडेशन चे डॉ करणसिंह घुले यांनी उपस्थित विविध खात्याचे अधिकारी पदाधिकारी माऊली भक्तांचे आभार मानले.रवी जमधडे यांनी सूत्रसंचालन केले.

## नशिबाची परिक्षा

**शुक्रवार दि. १८ जुलै २०२५**

**मिलनम डे**

| उदय-अस्त | | | सिंगल ५-१-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १४०<br>२३०<br>३८० | ५-२ | १५०<br>१२८<br>११० | जोड<br>५६-१२-३०-७४-२३ |

**कल्याण**

| उदय-अस्त | | | सिंगल ९-४-५ मजबुत |
|---|---|---|---|
| १४६<br>४४३<br>११९ | १-२ | १५६<br>१२९<br>११० | जोड<br>२३-१०-४५-७८-३२ |

**मुंबैम (मेन)**

| उदय-अस्त | | | सिंगल ४-७-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १७०<br>२६०<br>४४० | ८-० | १९०<br>२८०<br>००० | जोड<br>८५-३०-१४-६२-०९ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## तडजोड न करता थेट फायनान्स कंपनीने घेतला घराचा ताबा

**अहिल्यानगर :** कर्जाची रक्कम थकल्याने तडजोड न करता थेट एका मागासवर्गीय कुटुंबीयांच्या घराचा ताबा घेऊन त्यांना बेघर करणाऱ्या सावेडी येथील त्या फायनान्स कंपनीवर गुन्हा दाखल करण्याची मागणी सह्याद्री छावा संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. या मागणीचे निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गीते यांना देण्यात आले. यावेळी छावा संघटनेचे जिल्हाध्यक्ष विनोद साळवे, धडक कामगार संघटनेचे श्रीधर शेलार, सहादू दोंदे, आम आदमी पार्टीच्या महिला जिल्हाध्यक्षा विद्या शिंदे, उमेद सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष अनिल साळवे, सचिव सचिन साळवी, तक्रारदार विजय लोंढे, अंबादास जाधव, राहुल सोनकांबळे, रवी सातपुते आदी उपस्थित होते.

सह्याद्री छावा संघटनेच्या वतीने दिलेल्या निवेदनात म्हंटले आहे की, विजय लोंढे यांनी सन २०१७ मध्ये सावेडी येथील एका फायनान्स कडून १४ लाख ४७ हजार रुपयाचे कर्ज घेतले होते. सदर फ्लॅट हा अपूर्ण असताना त्या फायनान्स कंपनीने कर्जाची पूर्ण रक्कम बिल्डर यांच्या ताब्यात दिली. यामुळे संपूर्ण कर्जाचा हप्ता सुरु झाला. पंतप्रधान आवास योजनेचा लाभ मिळण्यासाठी वेळोवेळी अर्ज करुन देखील जाणीवपूर्वक योजनेचा लाभ मिळवून दिला नाही. ज्या बँकेत पगार जमा होते, त्या बँकेतून हप्ता कट करण्यात यावा! असे वेळोवेळी सूचना करुनही जाणीवपूर्वक जुन्या खात्यामधूनच हप्ता घेण्यासाठी चेक टाकत राहिले.

## मनपा आरोग्य अधिकारी यांना माजी नगरसेवकाकडून धक्काबुक्की

अहिल्यानगर : मनपाचे आरोग्य अधिकारी डो सतीश राजूरकर यांना माजी नगरसेवकाकडून धक्काबुक्की आणि शिवीगाळ करण्यात आली याच्या निषेधार्थ उद्या मनपा कर्मचारी युनियनच्या वतीने मनपा प्रभाग कार्यालय बंद ठेवण्यात येणार असून सकाळी साडे १० वाजता मुख्य प्रशासकीय इमारत येथे सर्व अधिकारी कर्मचारी यांनी उपस्थित राहावे असे आवाहन युनियनचे अध्यक्ष जितेंद्र सारसर, बाबासाहेब मुदगल, सचिव आनंद वायकर यांनी केले, तसेच या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचे काम सुरु आहे

## श्री क्षेत्र ताहराबादला पांडुरंग उत्सवाची जय्यत तयारी सुरू


प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** प्रतीपंढरी समजल्या जाणाऱ्या राहुरी तालुक्यातील श्रीक्षेत्र ताहाराबाद येथील श्री संत कवी महिपती महाराजांच्या समाधी मंदिराच्या प्रांगणात दि.१९ जुलै ते २५ जुलै पर्यंत साजऱ्या होणाऱ्या 'पांडुरंग महोत्सवा'ची जय्यत तयारी सुरू झाली आहे.

प्राचीन परंपरेनुसार श्रीक्षेत्र पंढरपूर येथून 'मूळ 'लावून पंढरीच्या विठोबाला अगत्याने ताहाराबाद क्षेत्री आणण्यासाठी व आषाढीवारीसाठी गेलेले वारकरी आता प्रतीपंढरीकडे परतीच्या मार्गावर आहेत. महिपतींच्या पायी दिंडी सोहळ्याचे व पांडुरंगाचे आषाढ वद्य नवमीला ताहाराबाद क्षेत्रात आगमन होणार आहे. श्री संत कवी महिपती महाराजांच्या 'चित्ती धरीली वासना, सिद्धी न्यावी नारायणा'! ह्या ओवीनुसार साक्षात पंढरीचा पांडुरंग महिपती महाराजांच्या भेटीसाठी सालाबादप्रमाणे श्रीक्षेत्र ताहाराबादला येणार म्हणून पंचक्रोशीत भक्तीभावाचे तरंग उठले आहेत. ह्या पायी दिंडी सोहळ्याच्या स्वागतासाठी परिसरातील भाविक सज्ज झाले आहेत.

आषाढ वद्य नवमीला ताहाराबाद क्षेत्रात पांडुरंगाचे आगमन होताच आषाढ वद्य दशमीला सालाबादप्रमाणे वैकुंठवासी ब्रह्मलीन नाना महाराज वनकुटेकर (सोबळेवाडी) पायी दिंडी सोहळा ताहाराबाद क्षेत्री हजर होतो. ह्या सोहळ्याला मानाचे स्थान आहे. रविवार दि.२० जुलै रोजी ताहाराबाद क्षेत्री महाअभिषेक, भिक्षा कार्यक्रम, काकड आरती, नैवेद्य, हरिपाठ व दिंड्यांचे स्वागत आदीं कार्यक्रम होतील. तर शुक्रवार दि.२५ जुलै रोजी पहाटे ६ वा. 'पाऊलघडी'च्या कार्यक्रमाने 'पांडुरंग महोत्सवा'ची सांगता होणार आहे.

'पांडुरंग महोत्सव' कालावधीत भाविकांची मांदियाळी भरणार आहे. त्या दृष्टीने देवस्थान,ग्रामपंचायत व प्रशासन सज्ज झाले आहे.देवस्थान व ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने परिसरात स्वच्छता मोहीम चालू आहे.मंदिर परिसरात व गावात विद्युत काम युद्धपातळीवर चालू आहे.



पोलीस प्रशासन, कुरणवाडी पाणीपुरवठा, महावितरण, परिवहन महामंडळ, आरोग्य विभाग व इतर विभाग सज्ज झाले आहे.

ह्या सोहळ्याचा लाभ घेण्याचे आवाहन देवस्थानचे मठाधिपती अर्जुन महाराज तनपुरे, नाना महाराज गागरे, बाळकृष्ण महाराज कांबळे, बाबासाहेब महाराज वाळुंज, देवस्थानचे अध्यक्ष राजेंद्र साबळे, उपाध्यक्ष अविनाश कांबळे, ज्येष्ठ विश्वस्त माजी खा. प्रसाद तनपुरे, आसाराम ढूस, दादासाहेब इंगळे, डॉ. सुखदेव हारदे, शिवाजी कोळसे, मच्छिंद्र कोहकडे, रमेश नालकर,सुरसिंग पवार, अशोक देशमुख, दत्तात्रय जगताप, शिवाजी बंगाळ, ड. अशोक किनकर, सुभाष शिरसाठ, ज्ञानेश्वर कोळसे,सतीश क्षीरसागर, बापूसाहेब गागरे, श्रीकृष्ण कांबळे, संजय कांबळे, सुशीला वराळे, सुशीला मुसमाडे, सुगंधाबाई बानकर, लक्ष्मीबाई सोनवणे, लीलावती सोळंकी, सचिव बाळासाहेब मुसमाडे, व्यवस्थापक सर्जेराव हारदे, लोकनियुक्त सरपंच निवृत्ती घनदाट, उपसरपंच जालिंदर मुंढे, माजी सरपंच नारायण झावरे,उपसरपंच पप्पू माळवदे, सेवा संस्थेचे अध्यक्ष अशोक झावरे, उपाध्यक्ष हिराबाई जगताप, माजी अध्यक्ष सीताराम झावरे, पोलीस पाटील किरण उदावंत, शरद किनकर, बापू जगताप, बाळासाहेब बेलकर आदींसह भाविकांनी केले आहे.

दरवर्षी प्रशासन विभागात सार्वजनिक बांधकाम विभागाचा हलगर्जीपणा नेहमीच दिसून येतोय. ताहाराबादच्या चोहो बाजूच्या रस्त्यांची दयनीय अवस्था झालेली आहे. रस्त्यांवर मोठ-मोठे खड्डे पडलेले आहेत. साईट पट्ट्या व्यवस्थित नाही, बाभळीची झाडे रस्त्यावर आलेली आहेत. त्यामुळे वारकऱ्यांचे अतोनात हाल होतात. त्यामुळे बांधकाम विभागाने वेळेत लक्ष देणे गरजेचे आहे.

**Change of Name**

My old name is **Nawab Alaudin Shaikh** my new name is **Navababi allauddin Shaikh** address ward no .7 dalvi wasti shrirampur both the person are same.as per gadget no. M-25127878)

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat |
|---|---|---|---|---|---|---|
| 14/04/2025 to 19/04/2025 | 257 40 389 | 270 96 268 | 169 62 570 | 169 62 570 | 489 15 168 | 359 76 240 |
| 28/04/2025 to 03/05/2025 | 789 43 256 | 128 14 167 | 345 25 168 | 150 69 180 | 136 05 159 | 127 00 569 |
| 05/05/2025 to 10/05/2025 | 135 98 116 | 479 04 112 | 136 03 148 | 123 62 138 | 158 47 269 | 257 45 258 |
| 12/05/2025 to 17/05/2025 | 233 82 336 | 569 00 389 | 278 74 590 | 288 83 157 | 389 08 468 | 690 57 160 |
| 19/05/2025 to 24/05/2025 | 900 99 360 | 190 00 145 | 167 47 340 | 237 21 137 | 179 72 129 | 390 26 367 |
| 26/05/2025 to 31/05/2025 | 148 30 145 | 259 61 128 | 470 16 457 | 125 81 678 | 790 65 690 | 247 38 170 |
| 02/06/2025 to 07/06/2025 | 229 34 455 | 899 62 138 | 778 21 470 | 244 02 336 | 255 23 247 | 110 24 248 |
| 09/06/2025 to 14/06/2025 | 579 11 335 | 990 89 568 | 356 40 578 | 160 76 790 | 158 44 167 | 133 75 159 |
| 16/06/2025 to 21/06/2025 | 578 07 115 | 220 42 138 | 446 48 125 | 148 33 599 | 278 72 390 | 689 34 770 |

✻ वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये ✻

# कोपरगाव व्हॉईस ऑफ मीडियातर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव** – आंतरराष्ट्रीय पत्रकार संघटना व्हॉईस ऑफ मीडियाच्या कोपरगाव तालुका कार्यकारिणीतर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा आत्मा मालिक इंटरनॅशनल स्कूल येथे मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात तालुक्यातील इयत्ता १०वी व १२वीच्या परीक्षांमध्ये प्रथम क्रमांक प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांचा तसेच कोपरगाव कार्यकारिणी सदस्यांच्या गुणवंत पाल्यांचा सत्कार या दिमाखदार सोहळ्यात करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने आणि ओम गुरुदेव जंगली महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यानंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांना गौरवचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. विद्यार्थी आणि पालकांनीही या गौरव सोहळ्यात मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तालुका अध्यक्ष प्रशांत टेके यांनी केले, तर सूत्रसंचालन उपाध्यक्ष सुमित दरेकर यांनी केले.तसेच कार्यक्रमासाठी उपस्थित असलेल्या विद्यार्थी विद्यार्थिनी पालक व अन्य मान्यवर आणि प्रमुख अतिथी यांचे आभार जिल्हा कार्यकारिणी सदस्य डॉ. तान्हाजी लामखडे मामांनी मानले. या वेळी अध्यक्षस्थानी शिक्षणमहर्षी नानजीभाई ठक्कर हे होते. खासदार भाऊसाहेब वाकचौरे, कृषी भूषण पुरस्कारप्राप्त प्रभावतीताई घोगरे, ज्ञानेशानंद महाराज शास्त्री, कुलदिप फाउंडेशनचे कुलदिप देशमुख, सद्गुरु उद्योग समूहाचे श्रीकांत शहाणे, आत्मा मालिकचे सुनील पोकळे, व्हॉईस ऑफ मीडियाचे जिल्हाध्यक्ष गोरक्षनाथ मदने, सचिव अमोल मतकर आदी मान्यवर उपस्थित होते. खासदार वाकचौरे म्हणाले, ‘‘व्हॉईस ऑफ मीडियाने हा उपक्रम राबवून समाजापुढे एक प्रेरणादायी आदर्श घालून दिला आहे.‘‘ या संघटनेच्या पत्रकारांची समाजाप्रती असलेली सद्भावना निश्चितच भविष्यात विद्यार्थी घडविण्याचे महान कार्य दिशादर्शक असेल. नानजीभाई ठक्कर यांनी आपल्या भाषणात सांगितले की, ‘‘शिक्षण हे वाघिणीचे दूध असून, त्याचे प्राशन करणारा गुणवंत होतोच. शिक्षणातून डॉक्टर, अभियंते, शिक्षक, पत्रकार, उद्योजक, शेतकरी अशा समाजोपयोगी व्यक्तिमत्त्वांचे घडण होते. व्हाईस ऑफ मीडिया कोपरगाव कार्यकारिणीने या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव करून त्यांना भविष्य काळात यशस्वी होण्यासाठी खुप मोठी प्रेरणा देणारे कार्य केलेले आहे. महाराष्ट्र शासन कृषी भूषण पुरस्कार सन्मानित प्रभावतीताई घोगरे यांनी भाषणात सांगितले की



जेव्हा आपल्या पाल्याला सन्मान प्राप्त होतो तेव्हा आई वडीलांचा आनंद गगनात मावेनासा होतो. तसेच अशा गुणगौरवाने विद्यार्थ्यांना ही यशोशिखरावर पोहोचण्यासाठी मोठ्या प्रमाणावर प्रेरणा मिळते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी तालुका अध्यक्ष प्रशांत टेके, अहिल्यानगर जिल्हा कार्यकारिणी सदस्य डॉ.तान्हाजी लामखडे मामा,उपाध्यक्ष सुमित दरेकर, सचिव बापू घुमरे, खजिनदार नामदेव कोळपे, संघटक प्रल्हाद मेहेरे, शहराध्यक्ष महेश सिनारे, सहसंघटक दिनेश जोशी, सह संघटक रविंद्र भालेराव आणि इतर पदाधिकारी व सदस्यांनी अथक परिश्रम घेतले.

## द • ख • ल

# प्रज्वल शिंदे यांना मास्टर ऑफ आर्किटेक्चर पदवी प्रदान

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**लिंपणगाव :** मढेवडगाव येथील शेतकरी कुटुंबातील चिरंजीव प्रज्वल सुनील शिंदे यांनी ऑस्ट्रेलिया मधील न्यू कॅस्टल युनिव्हर्सिटी मधून मास्टर ऑफ आर्किटेक्चरची पदवी संपादन केली आहे. प्रज्वल शिंदे हे मढेवडगाव येथील शेतकरी कुटुंबातील होतकरू तरुण असून त्यांनी



अगोदर इंदिरा कॉलेज वाकड पुणे येथून बी.ई. आर्किटेक्ट पर्यंत शिक्षण पूर्ण केले . परंतु चुलते सहकार महर्ष शिवाजीराव नागवडे सहकारी साखर कारखान्याचे माजी व्हा. चेअरमन कै. जिजाबापू शिंदे यांच्या प्रेरणेने आणि चुलती प्रतीक पेट्रोल पंपाच्या संचालिका नयनतारा शिंदे व उच्च शिक्षण घेऊन लंडन स्थित असलेले चुलत बंधू प्रतीक पोपटराव शिंदे तसेच मामा चंद्रशेखर विजयराव शितोळे यांच्या भक्कम पाठबळावर उच्च शिक्षण घेण्याचे ध्येय उराशी बाळगून प्रज्वल शिंदे यांनी ऑस्ट्रेलिया येथील न्यू कॅस्टर युनिव्हर्सिटी मध्ये प्रवेश घेतला व प्रथम श्रेणीत मास्टर ऑफ आर्किटेक्चर ची पदवी संपादन केली .

बुधवार दि.१६ रोजी न्यू कॅस्टल विद्यापीठाच्या सभागृहात शानदार सोहळ्यात पदवीदान समारंभ पार पडला. सदर प्रसंगी प्रज्वलचे मामा चंद्रशेखर शितोळे श्रीमती नयनतारा शिंदे, मावशी अश्विनीताई, आई राणी शिंदे तसेच ऑस्ट्रेलिया येथे स्थायिक झालेले काष्टी येथील दत्तात्रय शिंदे व त्यांच्या परिवारातील सदस्य उपस्थित होते. प्रज्वल शिंदे यांच्या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# वक्फ बोर्डाकडील शेख महंमद बाबा दर्गाह ट्रस्टची नोंदणी रद्द करा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा:** श्रीगोंद्याचे ग्रामदैवत सद्गुरु संत श्री शेख महंमद महाराज समाधी मंदिर जीर्णोद्धर कामात अडथळा ठरणाऱ्या वक्फ बोर्डाकडील शेख महंमद बाबा दर्गाह ट्रस्टची नोंदणी रद्द करण्यासाठी गुरुवार दि. २४ जुलै पासून सद्गुरु संत श्री शेख महंमद महाराज समाधी मंदिर निर्माण कृती समितीच्या वतीने महाराजांचे मंदिरात उपोषण करण्यात येणार असल्याची माहिती घनश्याम शेलार यांनी दिली आहे . राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतिक असणारे सद्गुरू संत शेख महंमद महाराज हे श्रीगोंदा शहराचे व तालुक्याचे ग्रामदैवत असून संत शेख महमद महाराजांनी भागवत सांप्रदायाचा स्वीकार करत जीवनभर प्रसार व प्रचार केला त्यांनी पंढरीच्या वाऱ्या केल्या संपूर्ण जीवन वारकरी संप्रदाय पद्धतीने जगले आणि ३२७ वर्षांपूर्वी त्यांनी सपत्नीक संजीवन समाधी घेतली अशा प्रकारे सपत्नीक संजीवन समाधी घेणारे हे एकमेव संत आहे त्यामुळे संत शेख महंमद महाराजांचे समाधी मंदिर व्हावं ही शहरातील व तालुक्यातील त्यांच्यावर श्रद्धा असणाऱ्या भावीक भक्तांची तीव्र इच्छा आहे. आणि त्यासाठी गेल्या अनेक वर्षांपासून प्रयत्न देखील सुरू आहेत, मात्र सन १९५३ मध्ये श्री शेख महंमद बुवा देवस्थान अशी धर्मदायकताकडे नोंद असणाऱ्या देवस्थान च्या नावात व घटनेत बदल करत या देवस्थानची बेकायदेशीररित्या वक्फ बोर्डाकडे नोंदणी केली गेली असल्याने वक्फ कायद्याप्रमाणे नोंद झालेले न्यासांतर्गत दर्गाह किंवा मज्जिद असू शकतात मंदिर असू शकत नाही त्यामुळे मंदिर जिर्णोदरात अडथळा निर्माण झालेला आहे मंदिर जीर्णोद्धरासाठी १७ एप्रिल २५ रोजी बंडातात्या कराडकर ,ह भ प माणिक महाराज मोरे व ह भ प जब्बार महाराज शेख यांच्या नेतृत्वाखाली वारकरी संप्रदायाचा भव्य मोर्चा काढण्यात आलेला होता या आंदोलनाला पाठिंबा म्हणून व्यापारी वर्गाने उस्फुर्तपणे दोन दिवस शहरातील सर्व व्यापारी दालने बंद ठेवली होती तर दिनांक २८ एप्रिल पर्यंत धरणे आंदोलन व दिनांक २८ एप्रिल २५ रोजी अन्नत्याग आंदोलन अशा स्वरूपाचे आंदोलने झाले प्रशासनाने याविषयी तोडगा काढण्यासाठी मुदत मागून आंदोलन स्थगित करण्याची विनंती केली होती त्यांच्या विनंती प्रमाणे एक महिन्यासाठी आंदोलन स्थगित केलेले होते मात्र तीन महिने उलटून सुद्धा प्रशासन किंवा शासन पातळीवरती कोणताही हालचाल अथवा निर्णय झाला नसल्याने सद्गुरु संत श्री शेख महंमद महाराज समाधी मंदिर निर्माण कृती समितीची स्थापना झाली असून या समितीच्या माध्यमातून प्रत्येक गुरुवारी उपोषण करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे त्याची सुरुवात गुरुवार दिनांक २४ जुलै पासून होणार असल्याचे देखील शेलार यांनी सांगितले आहे.

# पावसाने ओढ दिल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**पुणतांबा :** परिसरात अद्यापही खरीप पिकांना जीवदान मिळेल असा पुरेसा पाऊस न पडल्यामुळे शेतकरी वर्गाची चिंता वाढली आहे परिसरात १२जून रोजी सरासरी दोन इंच पाऊस पडला होता त्यानंतर १९जून रोजी सरासरी अंदाजे अर्धा इंच पावसाची नोंद झाली होती. मात्र १२ जून नंतर १७ जूलै पर्यंत दमदार पावसाने हजेरी न लावल्यामुळे शेतकरी वर्गाचे तोंडचे पाणी पळाले आहे. पुरेशा पावसाअभावी थोडेफार विहिर बागायत असणाऱ्या शेतकरी वर्गाने तातडीने तुषार सिंचन सुरु केले आहे. जूलै महिन्याच्या तिसऱ्या आठवडयापर्यंत पुरेसा पाऊस न झाल्यामुळे विहीरींच्या पाण्याच्या पातळीत दिवसे दिवस लक्षणीय घट होत आहे. गोदावरी नदी दुथडी भरून वाहत असली तरी नदी काठचा भाग वगळता इतर ठिकाणी पावसाची निंतात गरज आहे. गोदावरी डाव्या कालव्याला ओव्हरफ्लोचे पाणी सोडण्यात आलेले आहे तसेच गोदावरी उजव्या कालव्याला सुध्दा तातडीने ओव्हरफ्लो चे पाणी सोडून पुणताबा परिसरातील गणेशबंधारे गाव तळी सिमेंट बंधारे तालडीने भरून द्यावेत. अशी मागणी येथील दादा सांबारे संदीप गुंजाळ राजेंद्र जाधव सह अनेक शेतकरी वर्गाने पाटबांधारे खात्याच्या राहाता विभागाकडे केली आहे.

# रविवारी अहिल्यानगर मोबाईल रिटेलर्स असोसिएशनच्यावतीने महा रक्तदान शिबिर

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** रक्तदानाची ही चळवळ समाजात खोलवर रुजविण्यासाठी आणि गरजू रुग्णांना मोठ्या प्रमाणावर रक्त उपलब्ध करून देण्यासाठी अहिल्यानगर मोबाईल रिटेलर्स असोसिएशनच्या वतीने जिल्हास्तरीय महा रक्तदान शिबिराचे आयोजन रविवार, २० जुलै रोजी सकाळी ७ते रात्री ९या वेळेत नंदनवन लॉन्स, न्यू टिळक रोड, अहिल्यानगर येथे करण्यात आले आहे. हे शिबिर कै. भावेशभाई सोलंकी (सेक्रेटरी, ऑल इंडिया मोबाईल रिटेलर्स असोसिएशन) यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित करण्यात येत आहे. यंदा या उपक्रमाचे चौथे वर्ष असून, याला संग्रामभैय्या जगताप सोशल फाउंडेशन, ख डींश नगर, आणि ऑल इंडिया मोबाईल रिटेलर्स असोसिएशन यांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे.जिल्ह्यातील १० प्रमुख रक्तपेढ्यांची पथके पूर्ण तयारीसह रक्तसंकलनासाठी सज्ज आहेत. यावेळी आ. संग्राम जगताप म्हणाले, रक्तदान ही काळाची गरज आहे. एक पिशवी रक्त एखाद्या रुग्णासाठी आयुष्य देऊ शकते. २०२४ मध्ये विक्रमी रक्तसंकलन करणाऱ्या

MEGA
BLOOD
DONATION
CAMP 2025

या उपक्रमाचा यंदाचा उद्देश अधिक व्यापक आहे. यंदा फक्त अहिल्यानगरपुरते मर्यादित न राहता, तालुका पातळीवरही तब्बल १२ तालुक्यांमध्ये महा रक्तदान शिबिरांचे आयोजन अचठअ च्या माध्यमातून करण्यात आले आहे, ही खरोखरच गौरवाची बाब आहे. नरेंद्र फिरोदिया यांनी सांगितले, अन्नदान श्रेष्ठ, पण रक्तदान सर्वश्रेष्ठ! हे केवळ दान नसून माणुसकीचा खरा अर्थ आहे. समाजासाठी आणि गरजूंकरता आपण सगळ्यांनी मिळून हे पवित्र कार्य हाती घेतले पाहिजे. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कोअर कमिटी सदस्य अमित बुरा, रितेश सोनीमंडलेचा, साजीद खान, प्रितम तोडकर, राकेश सोनीमंडलेचा, हिराशेठ खुबचंदानी, मनोज बरलोटा, संतोष बलदोटा, गोरख पडोळे, मनिष चोपडा आणि अतुल रच्चा आदी कोअर कमिटी सदस्यांनी विशेष मेहनत घेतली आहे. हा उपक्रम केवळ रक्तदान नाही, तर माणुसकीला जोडणारा एक सशक्त दुवा आहे. त्यामुळे जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी होऊन या ऐतिहासिक शिबिराचा भाग व्हावा, असे आवाहन अखचठअ महाराष्ट्राचे अध्यक्ष अजितशेठ जगताप आणि अचठअ अहिल्यानगरचे अध्यक्ष अजित पवार यांनी केले आहे. रक्तदान करा – जीवनदान द्या!

# नुकसानीची सरसकट भरपाई तातडीने द्या : आ. विठ्ठलराव लंघे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** वादळी वाऱ्यामुळे घरांच्या आणि शेत पिकांच्या झालेल्या नुकसानीची सरसकट तातडीने भरपाई शेतकऱ्यांना द्या अशी मागणी नेवासा मतदार संघाचेआमदार विठ्ठलराव लंघे –पाटील यांनी विधानसभेत बोलतांना केली स्वतंत्र नेवासा विधानसभा मतदार संघाचे शिवसेना आमदार विठ्ठलराव लंघे – पाटील यांनी गुरुवार (दि.१७) रोजी पावसाळी आधिवेशनात औचित्याचा मुद्दा उपस्थित करुन ते म्हणाले की माझ्या नेवासा मतदार संघात मे २०२५ मध्ये झालेल्या अवकाळी पाऊसाने शेती पिकांचे प्रचंड नुकसान होवून गोरगरीबांच्या घरांची सोसाट्याच्या वाऱ्याने प्रचंड दाणादान होवून पडझड झालेली आहे





तर अवकाळी पाऊसाने नेवासा तालुक्यात कांदा,केळी,सोयाबीन आणि बाजरी या मुख्य पिकांचे प्रचंड नुकसान झालेले आहे त्यामुळे या नैसर्गिक आपत्तीत नुकसान झालेल्या माझ्या मतदार संघातील शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदतीचा लाभ सरसकट व तात्काळ मिळावा अशी प्रभावी मागणी आमदार विठ्ठलराव लंघे – पाटील यांनी गुरुवारी औचित्याचा मुद्दा उपस्थित करुन विधानसभेच्या सभापतींकडे केली आहे त्यामुळे आता पुन्हा एकदा शेतकऱ्याच्या नुकसान भरपाईची आशा पल्लवित झाली आहे.

यावेळी आमदार विठ्ठलराव लंघे – पाटील यांनी विधानसभेच्या सभापतींचे विशेष लक्ष वेधतांना ते म्हणाले की,माझा नेवासा तालुका हा ग्रामीण स्वरूपाचा भाग असून सुमारे ८० टक्के लोकसंख्या ही शेतीवर अवलंबून आहे आणि माहे मे आणि जून २०२५ दरम्यान अचानक झालेल्या वादळी वाऱ्याने शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होवून घरांची पडझड झालेली आहे असा मुद्देसुद प्रश्न सभापतींकडे उपस्थित केल्यामुळे शेतकऱ्यांच्या आशा सरकारच्या भूमिकेडे लागून आहेत.

# बहुजन समता पार्टीने शिक्षणक्षेत्राकडेही लक्ष केंद्रीत करावे: प्रा. बाळासाहेब बळे





**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**लिंपणगाव:** अन्यायआणिअत्याचाराविरोधातील चळवळीत सक्रिय असलेल्या बहुजन समता पार्टीने आता शिक्षण क्षेत्राकडेही विशेष लक्ष केंद्रीत करणे गरजेचे आहे, असे मत जेष्ठ बहुजन विचारवंत प्रा. बाळासाहेब बळे यांनी व्यक्त केले. श्रीगोंद्यात बहुजन समता पार्टीच्या संपर्क कार्यालयाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. प्रा. बळे पुढे म्हणाले की, ‘‘वसंतराव सकट यांनी आतापर्यंत अथक परिश्रमातून बहुजन चळवळीला उभारी दिली असून अन्याय व अत्याचाराविरोधात सतत संघर्ष केला आहे. मात्र आता शिक्षण क्षेत्रातही लक्ष देणे तितकेच महत्त्वाचे झाले आहे. सध्या शिक्षण क्षेत्रात राजकारण शिरले असून त्यामुळे विद्यार्थ्यांच्या बालवयावर नकारात्मक परिणाम होत आहे.‘‘ या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले पत्रकार शिवाजी साळुंखे यांनी ‘‘आम्ही या पुढील वाटचालीत सदैव पक्षासोबत राहू‘‘ असे आश्वासन दिले. या प्रसंगी बहुजन समता पार्टीचे वसंतराव सकट आणि शिवाजी बुलाखे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, ‘‘आम्ही सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर लढा देत राहू आणि त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी कटिबद्ध राहू.‘‘ कार्यक्रमास पप्पू घोडके, कुणाल शिरवळे, आशिष जगधणे, आरती शिरवळे, राहुल आडेकर, अमोल ससाणे, नितीन लोंढे, बाळू अरणे, गणेश केंदळे, सोनू शिंदे, सचिन झिटे, वागस्कर आदी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. राहुल शिंदे यांनी केले, तर आभार प्रदर्शन शिवाजी बुलाखे यांनी मानले.

# श्रीगोंदयात अजूनही हजारो लाभार्थ्यांची ई-केवायसी अपूर्णच

**दादा सोनवणे | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** येथील पुरवठाविभागाकडून रेशनिंग कार्ड धारकांना ई–केवायसीची प्रक्रिया पूर्ण करणे अनिवार्य करण्यात आले आहे. प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी पुरवठा विभागाकडून वेळोवेळी मुदतवाढ दिल्यानंतरही श्रीगोंद्यात हजारो लाभार्थ्यांची ई–केवायसी अपूर्णच असल्यामुळे येत्या काही दिवसात अनेकांना धान्यासह इतर लाभापासून वंचित राहावे लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. श्रीगोंदा तालुक्यातील एकूण लाभार्थ्यांपैकी ८२ टक्के लाभार्थ्यांची केवायसी पूर्ण झाली असून अजूनही हजारो लाभार्थ्यांची केवायसी झाली नसल्याने त्यांना रेशनिंग दुकानातून मिळणाऱ्या धान्यांपासून वंचित राहावे लागणार आहे. श्रीगोंदा तालुक्यांमधील १२५ रेशनिंग दुकानांमधून अंत्योदय आणि प्राधान्य कुटुंब योजनांच्या माध्यमातून तालुक्यात सुमारे ११ हजार क्विंटल धान्य लाभार्थ्यांना वितरित केले जात आहे. तालुक्यातील १८ टक्के लाभार्थ्यांची केवायसी अपूर्ण आहे. केवायसी न केलेले लाभार्थी ठरणार बोगस ?पुरवठा विभागाकडून वेळोवेळी केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्याचे आवाहन रेशनिंग कार्ड धारकांना करण्यात आले होते. श्रीगोंदा तालुक्यात एकूण २ लाख २ हजार ४४७ लाभार्थ्यांपैकी ३७ हजार ४४७ लाभार्थ्यांनी ई–केवायसी प्रक्रिया पूर्ण केलेली नाही. रेशनिंग कार्डधारकांना ई केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी ३० जून २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. पण अजून मुदत उलटूनही केवायसी न केलेल्या कार्डधारकांचे धान्य आगामी बंद होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.श्रीगोंदा तालुक्यात केवायसीचे ३७हजार ४४७ लाभार्थ्यांची केवायसी होणे अद्याप बाकी आहे. वेळोवेळी मुदतवाढ देऊनह मोठ्या संख्येने लाभार्थ्यांनी आपली ई–केवायसी केलेली नसल्याने पुरवठा विभागा कडून उपलब्ध करून देण्यात आलेल्या आकडेवारी वरून समोर आले आहे.जरी मुदत संपली असली तरीही अजूनही केवायसी करणे चालूच आहे त्यामुळे राहिलेल्या नागरिकांनी तात्काळ केवायसी करवून घ्यावी असे आवाहन पुरवठा विभागाकडून करण्यात आले आहे.केवायसी ची मुदत संपली तरीही काम सुरु ई–केवायसी करण्याची मुदत संपल्याने ई–केवायसी न केलेल्या लाभार्थ्यांबाबतचा निर्णय शासन स्तरावरून होण्याची शक्यता आहे.प्रलंबित ई–केवायसी बाबतच्या दुकाननिहाय याद्या दुकानदारांना देण्यात आल्या आहेत. धान्याचा लाभ घेणाऱ्या रेशनिंग कार्ड धारकांना ई–केवायसी बाबतचे तपशील रेशनिंग दुकानात तपासून घेतल्या नंतर प्रक्रिया पूर्ण करून घ्यावी. केवायसी नसलेल्या लाभार्थ्यां बाबत शासन स्तरावरून निर्णय होईल. तरीही अजूनपर्यंत केवायसी चालू असून ती करून घ्यावी असेही पुरवठा विभागाकडुन सांगितले जात आहे

# बेलवंडीचा आदिवासी तरुण बनला उद्योजक; शासनाच्या मदतीने उभारले उसाचे गुऱ्हाळ

## मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष आज देणार भेट

**दादा सोनवणे | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** तालुक्यातील आदिवासी समाज्याने पारंपरिक उदयगाला फाटा देत कारखानदारीकडे वाटचाल करत शबरी आदिवासी विकास महामंडळ नाशिक यांचेकडून कर्ज घेऊन गूळ उद्योग उभारला असून हा उद्योग सामाज्यासाठी एक आदर्श ठरला असल्यामुळे या प्रकल्पाला मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष यांच्यासह विविध अधिकारी पदाधिकारी भेट देणार आहेत श्रीगोंदा तालुक्यातील बेलवंडी येथील आदिवासी समाज्यातील लोकांना समाज्यात पाहण्याचा दृष्टिकोन आता बदलणे गरजेचे आहे असे म्हणणे काही वागे ठरणार नाही .श्रीगोंदा तालुक्यातील बेलवंडी येथील आदिवासी समाज्यातील अजित भोसले नावाच्या नवशिक्षित तरुणाने शिक्षण घेतल्यावर आपल्या समाज्यावार असलेले ब्रिटिशकालीन शिक्के पुसण्यासाठी तसेच आपण सामाज्याचे काहीतरी देणे लागतो या भूमिकेतून सामाज्यासाठी विशेष काहीतरी करण्याची योजना आखली योजना तयार झाल्यावर आर्थिक अडचण निर्माण झाल्यावर त्यांना शबरी आर्थिक विकास महामंडळाची माहिती मिळाली त्यानुसार कागदपत्रांची पूर्तता करत शबरी आदिवासी विकास महामंडळ नाशिक यांचेकडून ५० टक्के सबसिडी तुन १ कोटी रुपयांचे कर्ज घेऊन त्यातून गूळ उद्योग सुरु केला आहे त्यामुळे परिसरातील अनेक आदिवासी समाज्यातील शिक्षित तरुणांना रोजगार मिळाला असून ते कायदेशीर मार्गाने रोजीरोटी कमवत आहेत तसेच अनेक प्रकल्प करण्याचा मानस असल्याचे त्यांनी बोलताना सांगितले या प्रकल्पाला उद्या सायंकाळी ४ चे दरम्यान मागासवर्गीय आयोगाचे राज्याचे अध्यक्ष गोरक्ष लोखंडे हे भेट देणार आहेत अहिल्यानगर जिल्हाधिकारी पंकज आशिया,जिल्हा परिषद मुख्याधिकारी अधीकारी आनंद भंडारी पोलीस



अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्यासह तहसीलदार गटविकास अधीकारी पोलीस निरीक्षक आदी मान्यवर गुल प्रकल्पाला भेट देणार असून हा प्रकल्प युवा शिक्षित लोकांसाठी एक वेगळा आदर्श असल्याची माहिती अजित भोसले यांनी माध्यमांना दिली आहे.

# पारगाव सुद्रिक येथे अतिक्रमणाविरोधात विशेष ग्रामसभा, अतिक्रमणमुक्त गावासाठी ठराव मंजूर



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**लिंपणगाव :** पारगाव सुद्रिक येथे अतिक्रमणाच्या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले. सरपंच सुरेखा दत्तात्रय हिरवे व उपसरपंच सारिका राहुल दानवे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या ग्रामसभेत अतिक्रमणमुक्त गावासाठी ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.

या ग्रामसभेला गावातील सर्व सदस्यांसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. शहाजी हिरवे, शशिकांत एरंडे, मंगेश घोडके, माऊली हिरवे, बाळासाहेब जगताप, संदीप दानवे, पत्रकार सुरेश हिरवे, माऊली मोटे, शिवाजी खेतमाळीस, सावता हिरवे, तुळशीराम जगताप आदींनी या ठरावास एकमुखी पाठिंबा दर्शविला.

अतिक्रमणाविरोधातील या कृतीसाठी ग्रामसेवक भाऊसाहेब घोरपडे यांचे विशेष सहकार्य लाभले. सरपंच सुरेखा हिरवे यांनी आपल्या भाषणाच्या शेवटी सांगितले की, ‘‘या मोहिमेमध्ये एकाही गरीबावर अन्याय होणार नाही, मात्र अतिक्रमणास निश्चितच आळा बसवला जाईल.‘‘

या ग्रामसभेस खेतमाळीस वाडी तसेच पारगाव सुद्रिक येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी पोलीस पाटील व पोलीस कर्मचारी मनोज साखरे व भागवत यांचेही विशेष सहकार्य लाभले. ग्रामस्थांच्या एकजुटीने पारगाव सुद्रिक अतिक्रमणमुक्त करण्याचा निर्धार या ग्रामसभेमध्ये दिसून आला.

द•ख•ल

# सह्याद्री हॉस्पिटलची जागा विकता येणार नाही किंवा भाड्याने देता येणार नाही

## ६४00 कोटींचा व्यवहार अडचणीत

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** येथील मोठी रुग्णालय साखळी असलेलं सह्याद्री हॉस्पिटल्सची विक्री हा सध्या राज्याच्या वैद्यकीय क्षेत्रातील चर्चेचा विषय आहे. भारतातील आघाडीची रुग्णालय साखळी असलेल्या मणिपाल हॉस्पिटल्सने ही खरेदी केली आहे. हा संपूर्ण व्यवहार ६,४०० कोटी रुपयांना झाल्याची माहिती आहे.

देशातील वैद्यकीय क्षेत्रातील मोठ्या व्यवहारांपैकी एक असलेला हा व्यवहार आता अडचणीत सापडलाय. पुणे महानगरपालिकेने कोकण मित्र मंडळ मेडिकल ट्रस्ट म्हणजेच सह्याद्री हॉस्पिटलला याबाबत नोटीस पाठवली आहे.

सह्याद्री हॉस्पिटलने मणिपाल हॉस्पिटलसोबत जो करारनामा केलाय त्याबाबतचे सर्व पत्र आणि जागेबाबतची काही पत्र असल्यास आणि महापालिका आयुक्तांची परवानगीची प्रत हे देण्यास बंधनकारक आहे. त्यासोबतच ५६ लाख ३५ हजार २०० रुपयांचे प्रीमियम पुढील ७ दिवसांमध्ये देणे बंधनकारक असल्याचं या नोटीशीमध्ये स्पष्ट करण्यात आले आहे. त्या जागेसंदर्भात काही व्यवहार असतील तर ते महापालिका आयुक्तांच्या परवानगी शिवाय होऊ शकणार नाहीत, असंही या नोटीसीमध्ये स्पष्ट करण्यात आले.

पुणे महानगरपालिकेच्या मालमत्ता व व्यवस्थापन कार्यालयाने कोकण मित्र मंडळ मेडिकल ट्रस्टला एक पत्र पाठवले आहे. या पत्राचा विषय पुणे पेठ, एरंडवणे येथील फायनल प्लॉट नंबर ३० (ऋळपरश्र झश्रीं छे. ३०) येथील जागेच्या भाडेपट्ट्याबाबत आहे. हा प्लॉट नंबर ३०, जो १९७६ चौरस मीटर (१९७६ ीं. ीं.) क्षेत्राचा आहे, तो कोकण मित्र मंडळ मेडिकल ट्रस्टला ९९ वर्षांच्या कालावधीसाठी भाडेपट्ट्याने देण्यात आला आहे. यासाठी ट्रस्टने ५३,३५,२०० रुपये (खछ ५,३३५,२००) प्रीमियम आणि प्रति वर्ग मीटर (शिॲ ीं. ीं.) १ रुपया (खछ १) असे भाडे भरणे आवश्यक आहे. पुणे महानगरपालिका आणि कोकण मित्र मंडळ मेडिकल ट्रस्ट यांच्यात २७ फेब्रुवारी १९९८ रोजी एक भाडेकरार रजिस्टर करण्यात आला होता आणि तो दोन्ही पक्षांवर बंधनकारक आहे.

या करारानुसार, भाडेपट्ट्याने दिलेली जागा किंवा तिचा कोणताही भाग तसेच या जागेवर बांधण्यात येणाऱ्या इमारतीचा कोणताही भाग इतर कोणत्याही व्यक्ती किंवा संस्थेला भाड्याने, पोटभाड्याने किंवा अन्य कोणत्याही प्रकारे देता येणार नाही. मात्र, हॉस्पिटल योग्य रीतीने चालवण्यासाठी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी योग्य संस्था किंवा कंपनीसोबत




करारनामा करण्यास सवलत राहील असे नमूद आहे. तसेच, ही जागा इतर कोणालाही गहाण, दान , बक्षीस, इजमेंट किंवा इतर कोणत्याही जडजोखमीत गुंतवता येणार नाही. जर हॉस्पिटलच्या इमारतीच्या बांधकामासाठी जमीन राष्ट्रीयीकृत बँक , सहकारी बँककिंवा अन्य कोणत्याही वित्त संस्थेकडे गहाण ठेवावयाची असेल, तर त्यासाठी महापालिका आयुक्तांची परवानगी घेणे आवश्यक आहे.

# लोन मेळाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद

**वैजापूर :** येथील लोन मेळाव्यात चांगला प्रतिसाद मिळाला आसून सोमवार ते शुक्रवार असे वर्षभर लोन सुविधा उपलब्ध करण्यात




आली आहे. अशी माहिती अधिकारी यासीन शेख यांनी दिली. लोन मेळाव्यात ग्राहकांची उपस्थिती मोठी होती. संस्थाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. प्रशांत भालेराव यानी ग्राहकांच्या मागनी नुसार महाराट्रांत सर्वत्र शाखाच्या ठिकानी लोन मेलाव्यात आयोजन केले आहे. त्यास गरजू ग्राहका कडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. ग्राहकासाठी पर्सनल लोन सुविधा उपलब्ध आहे. तसेच होम लोन, कार लोन, मोर्गेज लोन, आदी विविध प्रकारचे लोन ही तात्काल श्री रेणुका मल्टीस्टेटच्या शाखानुशार सोमवार ते शनिवार उपलब्ध करण्यात आले आहेत. आजच्या लोन मेळाव्यात अधिकारी यासीन शेख त्यांनी मार्गदर्शन केले.

# श्रीक्षेत्र कोळपेवाडी ते श्रीक्षेत्र पुणतांबा पायी दिंडी सोहळा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी :** सालाबाद प्रमाणे याहीवर्षी भगवान सिद्धेश्वराच्या कृपाआशीर्वादाने व भागवताचार्य प.पु.गोवर्धन महाराज सुरेगाव आश्रम यांच्या मार्गदर्शनाखाली याहीवर्षी समस्त कोळपेवाडी, शहाजापूर, माहेगाव देशमुख, कोळगाव थडीच्या व पंचक्रोशीतील वारकरी मंडळाच्या सहकार्याने श्री क्षेत्र कोळपेवाडी ते श्री क्षेत्र पुणतांबा पायी दिंडी सोहळयाचे आयोजन करण्यात आले आहे. हरिनामाचा गजर, टाळ-मृदंगाची साद, आणि भक्तीने ओतप्रोत भरलेली अंत:करणअशा पवित्र वातावरणात श्री क्षेत्र कोळपेवाडी येथून शनिवार दिनांक १९ जुलै रोजी पायी दिंडी सोहळ्यास शुभप्रस्थान होणार असल्याची माहिती दिंडी चालक ह.भ.प. आण्णा महाराज कोळपे यांनी सांगितली आहे.

या पायी दिंडीच्या पालखीचे प्रस्थान शनीवार (दि.१९) रोजी सकाळी ८.०० वाजता प्रमुख मान्यवरांच्या हस्ते विधिवत पूजन करून दिंडी पुणतांबा गावाच्या दिशेने प्रस्थान करणार आहे. या दिंडीत सहभागी होणा-या वारक-यांसाठी दिंडीच्या प्रवास मार्गावर ठिकठीकाणी चहा, नाष्टा व भोजनाचे आयोजन भाविकांच्या वतीने करण्यात आले आहे. या पायी दिंडीमध्ये दरवर्षी पंचक्रोशीतील महिला व पुरुष सहभागी होत असून दिंडीचे हे ११ वे वर्ष आहे.

# जिल्हा परिषदेच्या शाळेत विद्यार्थ्यांना वहयांचे वाटप

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पुणतांबा :** संजीवनी उद्योग समूहाचे बिपीनराव कोल्हे युवा नेते विवेक कोल्हे तसेच सौ. रेणुका कोल्हे यांच्या वाढदिवसानिमित पुणतांबा परिसरातील चांगदेव नगर व आठरावाडी येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत विद्यार्थ्यांना वहयाचे वाटप करण्यात आहे. यावेळी दादा सांबारे, पोपट पेटकर, बलराज धनवटे, वामन शिरसाठ दोन्ही शाळेतील मुख्याध्यापक तसेच शिक्षकवृंद उपस्थित होते.



# चिलेखनवाडी बनणार रोड मॉडेल व्हिलेज

## विशेष ग्रामसभेत ठराव मंजूर : सरपंच भाऊसाहेब सावंत

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** नेवासा-गाव नकाशा प्रमाणे असलेले शेतीचे रस्ते गावशिवरस्ते अतिक्रमणमुक्त करणे व मोफत मोजणी करून खुले करणे तसेच शासनाच्या मदतीने रस्ते पक्के बनविणे व चिलेखनवाडी गाव नेवासा तालुक्यातील पहिले रोड मॉडेल व्हिलेज बनविण्याचा ठराव विशेष ग्रामसभेत एकमताने मंजूर करण्यात आला असल्याची माहिती लोकनियुक्त सरपंच भाऊसाहेब सावंत यांनी दिली

नेवासा तालुक्यातील चिलेखनवाडी येथे रोड मॉडेल व्हिलेज संबंधात पहिली विशेष ग्रामसभा दिनांक १७ जुलै २०२५ रोजी संपन्न झाली रोड मॉडेल व्हिलेज ही संकल्पना महाराष्ट्र राज्य शेत व शिवपाणंद रस्ते चळवळीचे प्रणेते व अध्यक्ष श्री शरदराव पवळे यांच्या संकल्पनेतून पुढे आली आहे त्या संबंधातील माहिती महाराष्ट्र राज्य शेत व शिव पानंद रस्ता चळवळीचे उपाध्यक्ष श्री नाथाभाऊ शिंदे पाटील यांनी विषद करून या अंतर्गत गावच्या चारही शिवरस्त्यांचे मोफत मोजणी व अतिक्रमण काढण्यासाठी तहसीलदार नेवासा व तहसीलदार मार्फत भूमी अभिलेख नेवासा यांचेकडून करून घेण्यासाठी पत्र व्यवहार करावा

त्यासाठी ही चळवळ संपूर्ण पाठपुरावा करणार आहे .असे स्पष्ट केले शेतीसाठी रस्ता हा शेतकऱ्यांचा श्वास आहे त्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन प्रयत्न करणे आवश्यक आहे .असे स्पष्ट केले . अध्यक्षस्थानी पोलिस पाटील मंगलताई सावंत या होत्या .प्रास्ताविक सरपंच श्री भाऊसाहेब सावंत यांनी केले अतिक्रमित रस्त्यासंबंधी असलेली प्रकरणे निपटारा करण्यासाठी चळवळीच्या माध्यमातून आपणही सक्रिय होणार आहोत असे यावेळी त्यांनी सांगितले ग्रामअधिकारी बाळासाहेब काळे यांनी अंजेडाचे वाचन केले .

या सभेचे वेळी माजी सभापती अशोक मंडलिक ' माजी शिक्षणाधिकारी बी .डी .पुरी , महसूल अधिकारी प्रियंका चव्हाण , उपसरपंच नाथा गुंजाळ , देविदास सावंत , निवृत्त मंडल अधिकारी रमेश सावंत , नेवासा तालुका शेत पाणंद रस्ते व शिवरस्ते चळवळीचे कार्यकर्ते बाळासाहेब थोरात (माका ) बाबासाहेब शिरसाठ ( भेंडा ), राजेंद्र गरड (कुकाणा ) , सोमाभाऊ माकोणे (अंमळनेर ) रामभाऊ पवार (अंमळनेर ) तसेच ग्रामस्थ विठ्ठल पवार , शेषराव भातंबरे , काशिनाथ गोसावी , पाणीवापर सोसायटीचे चेअरमन दत्तात्रय भातंबरे , सोसायटीचे माजी चेअरमन भाऊसाहेब सावंत ग्रामपंचायत सदस्य सुहास गायकवाड , सुमंत कांबळे , चंद्रकांत पाडळे , आण्णा सुराशे , असाराम भोसले ,मुख्याध्यापक सुरेश सानप ,डॉ अनिल गायकवाड , भगवान अडवणे , अन्सार शेख , सुरेश कांबळे , सुनील गायकवाड , किरण गर्जे , मच्छिंद्र सावंत , पांडुरंग मुरकुटे , रवि कांबळे , सिद्धार्थ खंडागळे , एकलव्य टायगर फोर्सचे उपाध्यक्ष राम पवार , मधुकर काटे , शिमोण कांबळे , सुभाष वासेकर , अमोल वासेकर , गोरक्षनाथ गुंजाळ संजय गुंजाळ , रावसाहेब सावंत , जालिंदर गायकवाड ' , माजी सरंपच सुशिल कांबळे , बाळासाहेब दळवी , दिपक नटवणे , साहेबराव गव्हाणे कैलास गायकवाड छबू आहेर गावातील बहुसंख्य शेतकरी व शेत रस्ता पीडित शेतकरी उपस्थित होते.

# आत्मा मालिकच्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती परीक्षेत उज्वल कामगिरी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव :** महाराष्ट्र राज्य परीक्षा मंडळ, पुणे यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या शैक्षणिक वर्ष २०२४-२५ च्या पूर्व उच्च प्राथमिक (इयत्ता ५ वी) व पूर्व माध्यमिक (इयत्ता ८ वी) शिष्यवृत्ती परीक्षांचे निकाल नुकतेच जाहीर झाले आहेत. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी आत्मा मालिक इंग्लिश मीडियम गुरुकुल व ज्युनिअर कॉलेजच्या सात विद्यार्थ्यांनी गुणवत्तेची परंपरा कायम ठेवत गुणवत्ता यादीत आपली नावे कोरले आहेत.

या यशस्वी कामगिरीसाठी प्राचार्य माणिक जाधव, मीनाक्षी काकडे, नितीन सोनवणे, विभाग प्रमुख दिनेश शिरसागर, दर्शना ठाकूर, भाऊसाहेब जावळे, भारती ताठे तसेच भुजाडे चित्रा , मन्सूरी रुक्सार , तांबे सारिका , शिंदे दिपा, वाणी योगेश, औताडे अपर्णा, आरती मुळीक, आहेर निकिता ,चव्हाण अंजली, पाटील आरती, उदावंत राणी, गुढघे कोमल, वाजे नारायण, बारहाते कावेरी, सोफिया शेख सय्यद, गाढवे किरण यांचे विशेष योगदान राहिले आहे.

# शिवाजीराव आनंदराव संधान यांच्या स्मृतिदिनानिमित्त शालेय साहित्य वाटप

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव :** कै. शिवाजीराव आनंदराव संधान यांच्या स्मृतिदिनानिमित्त कोपरगाव ज्येष्ठ नागरिक सेवा मंच व ज्येष्ठ महिला समिती यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ.सी.एम. मेहता कन्या विद्या मंदिर येथील विद्यार्थिनींना शालेय साहित्याचे मोफत वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये नवा उत्साह निर्माण झाला असून सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या संस्थांच्या कार्याचे उपस्थितांनी भरभरून कौतुक केले.या वेळी कै.दगडू महाराज उपाध्ये यांच्याही स्मरणार्थ देखील साहित्य वाटप करण्यात आले.



कार्यक्रमामध्ये अमृत संजीवनीचे चेअरमन पराग संधान यांनी उपस्थित राहून आपल्या वडिलांच्या स्मृतिदिनानिमित्त सामाजिक उपक्रम राबविल्याबद्दल समाधान व्यक्त केले. आपणही रयतचे विद्यार्थी असल्याने कमवा आणि शिका सारख्या योजना जडणघडण होण्यासाठी मोलाच्या ठरल्या. स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद या प्रमाणे विद्यार्थिनींच्या आयुष्यात बदल घडण्यासाठी यथाशक्ती मदत करत राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.यावेळी ज्येष्ठ नागरिक मंचाच्या अध्यक्षा सुधाभाभी ठोळे, जेष्ठ नागरिक मंचचे विजय बंब, उत्तमभाई शाह, श्वेताताई कोठारी, मधुबालाताई उपाध्ये, कमलाताई उपाध्ये, डॉ. विलास आचारी, ज्येष्ठ महिला समितीच्या अध्यक्षा रजनीताई गुजराथी, सोनमताई कोठारी, पुष्पाताई कोठारी यांची उपस्थिती लाभली. या प्रसंगी डॉ. सी. एम. मेहता कन्या विद्या मंदिर येथील प्राचार्या धनक, सर्व शिक्षकवृंद आणि विद्यार्थीनींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. विद्यार्थिनींनी शालेय साहित्य मिळाल्याबद्दल आनंद व्यक्त केला आणि आयोजकांचे आभार मानले.

# श्री ज्ञानेश्वर विद्यालयातील विद्यार्थ्यांना शैल फाउंडेशनकडून शैक्षणिक मदत




**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**आळंदी :** ''कोणताही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये'' या उदात्त हेतूने कार्यरत असलेल्या शैल फाउंडेशन या सामाजिक संस्थेच्या वतीने श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेच्या विविध प्रशालेतील गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व परीक्षा फी अशा प्रकारची एकूण अंदाजे एक लाख रुपयांची मदत करण्यात आली. या उपक्रमातून शेतकरी, शेतमजूर, कामगार, वारकरी संप्रदायातील तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांना थेट लाभ मिळाला. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना शालेय पिशव्या, वह्या, पुस्तके आणि परीक्षा शुल्क यासाठी आवश्यक ती शैक्षणिक मदत दिली गेली. शैक्षणिक गरज ओळखून शैल फाउंडेशनने दिलेला हा मदतीचा हात, विद्यार्थ्यांच्या शिक्षणातील अडथळे दूर करत त्यांना उज्वल भविष्यासाठी नवी उमेद देणारा ठरला. कार्यक्रमात शैल फाउंडेशनचे विश्वस्त दिलीप टिकले, बँकिंग तज्ञ मिलिंद आंबेकर, समाजसेविका वृंदा आंबेकर, नुपूर टिकले यांची प्रमुख उपस्थिती होती. याशिवाय संस्थेचे अध्यक्ष सुरेश वडगावकर, प्राचार्य सूर्यकांत मुंगसे, मुख्याध्यापक प्रदीप काळे, विद्यार्थी सहायक समिती प्रमुख विठ्ठलदास गुट्टे, प्रज्ञा यादव, समन्वयक सूर्यकांत खुडे, प्रकाश भागवत यांसह अनेक शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.प्रास्ताविक करताना प्राचार्य सूर्यकांत मुंगसे यांनी दातृत्वाची महत्ता विषद करताना सांगितले की, ही केवळ मदत नसून विद्यार्थ्यांमध्ये एक संस्कार रोवणारा उपक्रम आहे. शैल फाउंडेशनकडून मिळणारी शैक्षणिक मदत ही आमच्यासाठी प्रेरणादायी आहे. विद्यार्थ्यांनीही याचा आदर्श ठेवत भविष्यात समाजासाठी योगदान द्यावे.संस्थेचे अध्यक्ष सुरेश वडगावकर यांनी शैल फाउंडेशनच्या गेल्या १४ वर्षांच्या सातत्यपूर्ण सहकार्याबद्दल विशेष आभार मानले. त्यांनी सांगितले की, संस्थेच्या या कार्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना शिक्षणात सातत्य ठेवता आले आहे. कार्यक्रमाचे आयोजन व सूत्रसंचालन सूर्यकांत खुडे यांनी केले, तर विठ्ठलदास गुट्टे यांनी उपस्थितांचे आभार मानले. माऊलींच्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# जाधववाडी येथील फरार चंदन तस्करास उच्च न्यायालयातही दणका

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**आळेफाटा :** दि.०६ मे रोजी जाधववाडी (ता. जुन्नर) येथुन चंदन लाकडाची अवैध वाहतुक होणार असलेबाबत गोपनीय माहिती मिळाल्यानुसार वनपरिक्षेत्र ओतुर पथकाने धाड टाकली असता चंदन लाकडाची अवैध वाहतुक सुरु असल्याचे आढळून आल्याने येथील लहु सोमनाथ धुळे रा. मु.जाधववाडी पो.बोरी बु. याचे विरुद्ध भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम ४१ (२ बी), ४२ व ६९ तसेच महाराष्ट्र वननियमावली २०१४ चे नियम ३१, ३२, ५३ व ८२ अन्वये वनपरिमंडळ खोडद रा.गु.क्र ०३/२०२५ नोंद करण्यात आला आहे. सदर प्रकरणी जुन्नर सहाय्यक वनसंरक्षक अमृत शिंदे व ओतूर वनपरिक्षेत्र अधिकारी यांचे नेतृत्वातील पथकाने दि. ०६ मे रोजी मिळालेल्या गोपनिय माहितीनुसार सदर ठिकाणी नियोजित सापळा रचला असता रात्री ८.०० वा च्या सुमारास संशयित इसम नामे लहु सोमनाथ धुळे हा त्याच्या घरातुन पांढऱ्या रंगाच्या चारचाकी गाडीने बाहेर पडला असता त्यास घरासमोरच अटकाव करत गाडीची तपासणी करत असताना लहु धुळे हा अंधाराचा फायदा घेऊन घटनास्थळावरुन गाडीची चावी घेऊन फरार झाला. सदर ठिकाणी झालेल्या झटापटीत वनअधिकाऱ्यांनी त्याचेकडील मोबाईल हिसकावून घेतला. त्यानंतर घटनास्थळी पंचासमक्ष गाडीची तपासणी केली असता गाडीमध्ये चंदन लाकडाच्या तुकड्यांनी भरलेल्या ८ गोण्या एकुण वजन २०१.०५७ किलो ग्रॅम, १ डिजीटल वजन काटा, गलोल व ॲपल कंपनीचा मोबाईल फोन आणि अवैध वाहतुकीसाठी वापरलेली उठएढअ चारचाकी गाडी असा एकुण रुपये




१५,००,९५० किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

त्यानंतर वनविभागाने वेगवेगळी पथके नेमून फरार आरोपी लहु सोमनाथ धुळे याचा शोध घेतला परंतु लहु धुळे हा हुलकावणी देत निसटला. त्यानंतर दि. ०५ जून २०२५ रोजी फरार आरोपी लहु धुळे याने भारतीय नागरिक सुरक्षा अधिनियम २०२३ चे कलम ४८२ नुसार मा. अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय, जुन्नर येथे अटक पूर्व जामीन अर्ज दाखल केला परंतु दाखल गुन्ह्याचे गांभीर्य विचारात घेऊन मा. न्यायालयाने दि. ०६ जुन २०२५ रोजीच्या आदेशांन्वये सदर जामीन अर्ज फेटाळला. त्यानंतर फरार आरोपी लहु धुळे याने मा. उच्च न्यायालय मुंबई येथे धाव घेत दि.११ जुलै २०२५ रोजी पुन्हा अटक पूर्व जामीन अर्ज दाखल केला असता न्यायालयाने दि.१५ जुलै रोजी सुनावनी नेमली सदर सुनावनीस ओतूर वनपरिक्षेत्र अधिकारी लहु ठोकळ यांनी तपास अधिकारी म्हणुन उपस्थित राहुन सहाय्यक सरकारी अभियोक्ता साळगावकर यांना गुन्हयाचे गांभीर्य तसेच सर्व हकिकत सांगितले नंतर साळगावकर यांनी वनविभागाच्यावतीने प्रभाविपणे बाजु मांडली असता उच्च न्यायालयाने या प्रकरणी फरार आरोपी लहु सोमनाथ धुळे याचा दाखल गुन्ह्यातील सहभाग, त्याने तपास कामात सहकार्य न करणे तसेच चंदन तस्कराचे संघटित जाळे असल्याचे व सदर अवैध व्यापारामुळे मौल्यवान निसर्गाचे अतोनात नुकसान होत असल्याने त्याचे संवर्धनास बाधा निर्माण होत असल्याचे निरिक्षण नोंदवून सदर फरार आरोपी तसेच अन्य सहभागी आरोपीचा शोध घेणे आवश्यक असल्याने सदर जामीन अर्ज मा. न्यायालयाने दि. १५ जुलै २०२५ रोजी फेटाळल्याने चंदन अवैध व्यापारामध्ये असणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. यावेळी वनपरिक्षेत्र अधिकारी ओतुर लहु ठोकळ म्हणाले, 'चंदन लाकडाच्या अवैध व्यापाराकरिता निर्बंध असुन ते भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम ४१ (२ बी), ४२ व ६९ तसेच महाराष्ट्र वननियमावली २०१४ चे नियम ३१, ३२, ५३ व ८२ चे उल्लघन असुन त्यांचे उल्लंघनाकरिता दोन वर्षा पर्यतच्या कारावासाची तसेच द्रव्यदंडाचीही तरतुद करण्यात आली आहे. जुन्नर वनविभागामधील चंदन तस्करांची पाळेमुळे खणून काढुन त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात येईल'. सदर कारवाई आशिष ठाकरे वनसंरक्षक (प्रा.) वनवृत्त पुणे, प्रशांत खाडे उपवनसंरक्षक वनविभाग जुन्नर यांचे मार्गदर्शनाखाली सहाय्यक वनसंरक्षक अमृत शिंदे, स्मिता राजहंस व वनपरिक्षेत्र अधिकारी लहु ठोकळ यांच्या नेतृत्वाखाली वनपरिक्षेत्र ओतुरचे कर्मचारी तपास करीत आहे.

# दिव्यांगांना कृत्रिम अवयवांचे मोफत वाटप

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** दिव्यांग बांधवांचे जीवन अधिक स्वावलंबी व सुसज्ज करण्याच्या उद्देशाने गुरुवार (दि.१७) रोजी नेवासा फाटा येथील ग्रामीण रुग्णालयात कृत्रिम अवयव वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला दिव्यांग बांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला या शिबिराच्या अध्यक्षस्थानी सौ.रत्नमाला विठ्ठलराव लंघे -पाटील या होत्या.दिव्यांगांना आधार देवून स्वावलंबी बनविण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या आमदार लंघे यांचे झाले कौतुक यावेळी करण्यात आले. या उपक्रमाचे आयोजन पदमश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशन संचलित जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण कार्यालय व जिल्हा परिषद, अहमदनगर तसेच जिल्हा रुग्णालय भारतीय कृत्रिम अंग निर्माण निगम (एलिम्को), कानपूर, व एस. आर. ट्रस्ट, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबवण्यात आलेला होता. नेवासा तालुक्यातील विविध गावांतील अस्थिव्यंग लाभार्थ्यांना कृत्रिम हात,पाय व कॅलिपर्स यांचे मोजमाप घेऊन तात्काळ मोफत वितरण करण्यात आले. सकाळी १० ते सायं. ५ या वेळेत पार पडलेल्या या शिबिरात मोठ्या संख्येने दिव्यांग बांधवांनी सहभाग घेतला. या शिबिराचे उदघाटन आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या धर्म पत्नी सौ.रत्नमालाताई लंघे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी झालेल्या शिबीर प्रसंगी जिल्हा परिषद सदस्या डॉ तेजश्रीताई लंघे,भाजपचे तालुकाध्यक्ष प्रतापदादा चिंधे, मार्केट कमिटी माजी सभापती शंकरराव लोखंडे, भाजपचे युवा नेते ऋषिकेश शेटे, मनोज पारखे, भाजपा महिला आघाडीच्या अमृताताई नळकांडे, डॉ.मनीषा वाघ, भारती बेंद्रे, शिवसेना महिला आघाडीच्या अध्यक्षा शोभा आलवणे,सौ.भारती कर्डक,वैद्यकीय अधीक्षक डॉ.काटे,आरोग्य अधिकारी डॉ.दीपक डिंबर,डॉ. मोहसिन बागवान, डॉ.अविनाश काळे,हरिभाऊ जगताप, बाळासाहेब पिसाळ,सतीश शिरसागर आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली.



दखल

# डांगे आयुक्त आहेत की भ्रष्टाचाऱ्यांचे प्रवक्ते ?:काळे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर महानगरपालिकेतील ७७६ रस्त्यांच्या कामांमध्ये तब्बल ३५० ते ४०० कोटींच्या भ्रष्टाचाराचा आरोप असतानाही आयुक्त यशवंत डांगे हे भ्रष्ट अधिकाऱ्यांचे, ठेकेदारांचे आणि राजकीय हस्तकांचे प्रवक्ते बनले आहेत का? असा थेट सवाल शिवसेना (ठाकरे गट) शहरप्रमुख किरण काळे यांनी पत्रकार परिषदेत उपस्थित केला. भ्रष्ट लोकांना वाचवण्याचे काम आयुक्त डांगे करत असून, त्यांच्या वक्तव्यांनी हे सिद्ध होत आहे, असा घणाघात काळे यांनी केला. त्यांनी यावेळी पुराव्यांची कागदपत्रे दाखवत आपण सादर केलेल्या तक्रारींबाबत सविस्तर माहिती दिली. आयुक्त डांगे, आमदार जगताप, ठेकेदार यांची नार्को टेस्ट करा, सगळा काळा पैसा बाहेर येईल, अशी मागणीही त्यांनी यावेळी केली. मुख्यमंत्री यांना पत्र, फडणवीस यांच्याकडे फाईल काळे यांनी उघड केलेल्या घोटाळ्याच्या पार्श्वभूमीवर शिवसेना खासदार संजय राऊत यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना यासंदर्भात पत्र पाठवून या प्रकरणात गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. या पत्रासोबत घोटाळ्याच्या साक्षांकित पुराव्यांची फाईलही दिल्याचे काळे यांनी स्पष्ट केले. त्यावर लगेचच आयुक्त यशवंत डांगे यांनी पत्रकार परिषद घेऊन स्पष्टीकरण दिले. त्यांच्या म्हणण्यानुसार चौकशी झाली असून भ्रष्टाचाराचा आरोप खोटा आहे. या पार्श्वभूमीवर आमदार संग्राम जगताप यांनी देखील डांगे यांच्या बाजूने भूमिका घेत कोणताही घोटाळा झालेला नाही असे म्हणत शिवसेनेवर टीका केली.

# घरफोडी करणारी टोळी जेरबंद

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर व भिंगार परिसरात घरफोडी करणाऱ्या सराईत टोळीला स्थानिक गुन्हे शाखेने अटक केली आहे. धुळे जिल्ह्यातून या टोळीतील दोघांना पकडण्यात यश आले असून, त्यांच्या सांगण्यावरून चोरी केलेले सोन्याचे दागिने खरेदी करणाऱ्या व्यक्तींसह आणखी दोघांनाही पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. या कारवाईमुळे एकूण ४ घरफोडीचे गुन्हे उघडकीस आले आहेत. घटनेचा तपशील फिर्यादी केवळकुमार भगवानदास गांधी (वय ५७, रा. सारसनगर, अहिल्यानगर) हे ३ जुलै रोजी बाहेरगावी गेले असताना अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या घराचे कुलूप तोडून आत प्रवेश करत सोन्याचे दागिने व रोख रक्कम चोरी केली होती. याबाबत भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता (गु.र.क्र. ३७९/२०२५, कलम ३०५, ३३१(३) भा.दं.वि.). या घरफोडी प्रकरणाच्या तपासासाठी पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी स्थानिक गुन्हे शाखेला समांतर तपासाचे आदेश दिले होते. त्यानुसार पोनि. दिनेश आहेर यांच्या मार्गदर्शनाखाली पथक तयार करून तपास सुरु करण्यात आला. धुळे येथे शोधमोहीम यशस्वी १७ जुलै रोजी तपास पथकाला गोपनीय माहिती मिळाली की, या घरफोडीमागे कैलास चिंतामण मोरे (वय ४४, रा. सोनगीर, ता. धुळे) व जयप्रकाश राजाराम यादव (वय ३८, हल्ली रा. सोनगीर, मुळ गाव वाराणसी, उत्तरप्रदेश) यांचा सहभाग आहे व ते धुळे शहरात आहेत. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने धुळे येथे छापा टाकून या दोघांना अटक केली. गुन्ह्याची कबुली ; साथीदार फरार तपासात आरोपींनी ३ जुलै रोजी स्विफ्ट कारमधून अहिल्यानगर येथे येऊन ही घरफोडी केल्याचे कबूल केले. त्यांच्या सांगण्यानुसार या गुन्ह्यात त्यांचे साथीदार विरेंद्रसिंग रामकेवलसिंग ठाकूर (रा. प्रतापगड, उत्तरप्रदेश) व सोपान पाटील (रा. वणी, धुळे) सहभागी होते. या दोघांचा सध्या शोध सुरू आहे.

सोन्याच्या दागिन्यांची विक्री उघडकीस या गुन्ह्यातील

# गाव स्वच्छ व सुजल ठेवण्यासाठी 'सरपंच संवाद' ॲप्लिकेशनचा उपक्रम

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** गावांना स्वच्छ व सुजल ठेवण्याच्या दृष्टीने 'सरपंच संवाद' हे नाविन्यपूर्ण मोबाईल ॲप्लिकेशन सुरु करण्यात आले आहे. गावागावात सरपंच, ग्रामपंचायतींना थेट संवादाचे नवे माध्यम मिळावे, यासाठी केंद्र शासनाच्या वतीने क्वालिटी कौन्सिल ऑफ इंडिया यांच्या सहकार्याने हे ॲप तयार करण्यात आले असून जिल्ह्यातील सर्व सरपंचांनी ते डाऊनलोड करून प्रभावीपणे वापरावे, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी केले आहे. स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा-२ अंतर्गत गावे हागणदारीमुक्त ठेवत त्यांना अधिक आदर्श व टिकाऊ बनविण्याचा प्रयत्न केंद्र व राज्य शासन करत आहे. या पार्श्वभूमीवर गावपातळीवर जनसहभाग वाढवणे, चांगल्या उपक्रमांची देवाण-घेवाण करणे, व एकमेकांकडून शिकणे या हेतूने 'सरपंच संवाद' हे ॲप्लिकेशन विकसित करण्यात आले आहे. या ॲपद्वारे प्रत्येक सरपंच आपल्या गावातील स्वच्छता व ग्रामविकासाचे उपक्रम फोटो किंवा पोस्ट स्वरूपात शेअर करू शकतो. याशिवाय, इतर गावांतील उत्तम कामांची उदाहरणे पाहण्याचीही सुविधा यात आहे. पाणी व स्वच्छतेसंदर्भातील ताज्या बातम्या, यशोगाथा व अनुभव या माध्यमातून थेट सरपंचांपर्यंत पोहोचणार आहेत. तसेच या ॲपच्या माध्यमातून ऑनलाईन प्रशिक्षण घेता येते व त्यासाठी प्रमाणपत्रही मिळते. सरपंच संवाद हे मोबाईल ॲप केवळ तांत्रिक सुविधा नसून, गावच्या स्वच्छता व विकास विषयक चांगल्या उपक्रमांसाठी एकमेकांशी थेट संपर्क आणि प्रेरणा देणारे व्यासपीठ आहे. हा उपक्रम ग्रामपातळीवर सर्वांगीण, शाश्वत व लोकसहभागातून होणाऱ्या विकासासाठी निश्चितच उपयुक्त ठरेल, असा विश्वासही सीईओ आनंद भंडारी यांनी व्यक्त केला.

# सह्याद्री मल्टीसिटी निधीप्रकरणी संदीप थोरात आणखी गोत्यात, ठेवीदार आक्रमक; आंदोलनाचा इशारा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** क्लासिक ब्रीज, मनीमॅक्स यांसारख्या आर्थिक फसवणूक प्रकरणांनंतर आता सह्याद्री मल्टीसिटी निधी लि. या संस्थेमार्फत ठेवीदारांची फसवणूक झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. संस्थेचे चेअरमन संदीप थोरात आणि संचालक मंडळाविरोधात गुन्हा दाखल झाला असून, फसवणुकीची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे आता ठेवीदारांनी आक्रमक पवित्रा घेतला असून, सह्याद्री ठेवीदार बचाव कृती समितीने आंदोलनाचा इशारा दिला आहे. या पार्श्वभूमीवर कृती समितीच्या वतीने पत्रकार परिषद घेण्यात आली. यावेळी डॉ. श्रीधर दरेकर, संतोष लांडगे, प्रमोद साठे यांच्यासह फसवणूक झालेल्या ठेवीदारांची उपस्थिती होती. डॉ. दरेकर यांनी सांगितले की, गेल्या तीन वर्षांपासून अहिल्यानगरसह विविध भागांमध्ये सह्याद्री मल्टीसिटी निधी लि.च्या शाखांद्वारे मोठ्या प्रमाणावर ठेवी स्वीकारण्यात आल्या. ठेवींची मुदत संपल्यानंतरही पैसे परत मिळत नसल्याने ठेवीदार आता संतप्त झाले आहेत. सुरुवातीच्या काळात काहींना १० ते २० टक्के रक्कम परत करण्यात आली. मात्र, आता कोणालाही पैसे दिले जात नाहीत. संदीप थोरात याने ठरावीक टक्केवारीत रक्कम परत करताना आणखी ठेवी गोळा करण्याचा डाव आखला आणि अखेर अनेकांची फसवणूक केली. हा प्रकार केवळ आर्थिक नव्हे, तर संघटित स्वरूपाचा गुन्हा असल्याचा आरोप कृती समितीने केला आहे. संचालक मंडळाने संगनमताने हा प्रकार केला असून संघटित गुन्हेगारीच्या कलमान्वये गुन्हा दाखल करावा, अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देण्यात आलेल्या निवेदनात करण्यात आली आहे. या पत्रकार परिषदेत कोट्यवधी रुपयांची फसवणूक झालेल्या ठेवीदारांची यादीही सादर करण्यात आली. सध्या अनेक ठेवीदार न्यायासाठी दरवाजे ठोठावत आहेत. मात्र पोलिस यंत्रणा व प्रशासनाकडून अद्याप ठोस कारवाई झाली नसल्याचा आरोप कृती समितीने केला आहे. कृती समितीचा आंदोलनाचा इशारा या फसवणुकीच्या विरोधात सह्याद्री ठेवीदार बचाव कृती समितीने लवकरच तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. ठेवीदारांचे पैसे वसूल होईपर्यंत हे आंदोलन थांबणार नाही, असा इशाराही डॉ. दरेकर यांनी दिला.

# तडजोड न करता थेट घर ताब्यात

## छावा संघटनेची फायनान्स कंपनीवर गुन्ह्याची मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** सावेडी परिसरातील एका फायनान्स कंपनीने थकबाकीच्या कारणावरून कोणतीही तडजोड न करता थेट एका मागासवर्गीय कुटुंबाच्या घराचा ताबा घेतल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या घटनेनंतर सदर फायनान्स कंपनीवर फसवणुकीचा गुन्हा दाखल करावा व बेघर झालेल्या कुटुंबाला न्याय द्यावा, अशी मागणी सह्याद्री छावा संघटनेच्या वतीने निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गीते यांच्याकडे करण्यात आली आहे.

यासंदर्भात छावा संघटनेचे जिल्हाध्यक्ष विनोद साळवे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. यावेळी धडक कामगार संघटनेचे श्रीधर शेलार, सहादू दोंदे, आम आदमी पार्टीच्या महिला जिल्हाध्यक्षा विद्या शिंदे, उमेद सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष अनिल साळवे, सचिव सचिन साळवी, तक्रारदार विजय लोंढे, अंबादास जाधव, राहुल सोनकांबळे, रवी सातपुते आदी उपस्थित होते. नोंदवलेला आरोप काय? विजय लोंढे यांनी २०१७ मध्ये सावेडी येथील संबंधित फायनान्स कंपनीकडून १४ लाख ४७ हजार रुपयांचे गृहकर्ज घेतले होते. विशेष म्हणजे सदर फ्लॅट अद्याप पूर्णत्वास गेला नसतानाच ही रक्कम थेट बिल्डरकडे सुपूर्द करण्यात आली होती. त्यामुळे लोंढे यांच्याकडून हप्ते भरण्यास सुरुवात झाली. पंतप्रधान आवास योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी वारंवार अर्ज करूनही हेतुपुरस्सर त्यांना हा लाभ दिला गेला नाही, असा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

तसेच, लोंढे यांचा पगार ज्या बँकेत जमा होत होता, त्या बँकेतून हप्ता वजा करण्यास सांगितले असतानाही फायनान्स कंपनीने जुन्याच खात्यावरून जबरदस्तीने चेक टाकून हप्ते वसूल करण्याचा प्रयत्न केला. कोरोनाकाळात देखील कोणतीही सवलत न देता उलट अधिक व्याज व दंड आकारण्यात आला, असेही निवेदनात म्हटले आहे. एनपीएच्या नावाखाली जबरदस्ती? कोंडीत सापडलेल्या लोंढे यांनी उर्वरित रक्कम भरण्यास तयारी दर्शवूनही फायनान्स कर्मचाऱ्यांनी त्यांची कोणतीही दखल घेतली नाही. त्यांच्या खात्याची जबरदस्तीने एनपीए (Non PeA°foA°ming Asset) यादीत नोंद घेऊन २३ सप्टेंबर २०२४ रोजी एमआयडीसी पोलीस ठाण्यात ६ लाख १२ हजार रुपयांची थकबाकी व ७ लाख ३६ हजार रुपयांचे व्याज असे एकूण थकबाकीचे लेखी पत्र दिले.विशेष बाब म्हणजे सदर फ्लॅटचा सातबारा उताऱ्यावर कोणतेही मॉरगेज नसताना फायनान्स कंपनीने बेकायदेशीररीत्या घराचा ताबा घेतला असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. संघटनेची मागणी आणि इशारा छावा संघटनेच्या वतीने या प्रकरणात तातडीने हस्तक्षेप करून फायनान्स कंपनीवर फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच बेघर झालेल्या कुटुंबाला त्वरित घर मिळवून द्यावे, अन्यथा ७ ऑगस्टपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे. यावेळी उपस्थित मान्यवरांमध्ये जिल्हाध्यक्ष विनोद साळवे, श्रीधर शेलार, सहादू दोंदे, विद्या शिंदे, अनिल साळवे, सचिन साळवी, तक्रारदार विजय लोंढे, अंबादास जाधव, राहुल सोनकांबळे, रवी सातपुते यांचा समावेश होता.

# पाथर्डीत अतिक्रमण हद्द निश्चित सोमवारपासून अतिक्रमण हटवणार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पाथर्डी:** शहरात सार्वजनिक रस्ते, नाले, तसेच फूटपाथवरील अनधिकृत टपऱ्या व हातगाड्यांमुळे नागरिकांना होणाऱ्या अडथळ्याच्या पार्श्वभूमीवर नगरपरिषदेकडून गुरुवारपासून पुन्हा अतिक्रमण हटविण्याची मोहीम हाती घेण्यात आली आहे.ही कारवाई सोमवारपासून अधिक तीव्र करण्यात




येणार असल्याची माहिती नगरपरिषदेचे मुख्याधिकारी संतोष लांडगे यांनी दिली. शहरात राबवण्यात येणारी अतिक्रमण विरोधी मोहीम टप्प्याटप्प्याने राबवली जाणार असून, सुरुवातीला नागरिकांना व व्यापाऱ्यांना सूचना देऊन स्वयंस्फूर्तीने अतिक्रमण काढण्याचे आवाहन करण्यात आले आहे. मात्र, नंतर पाथर्डी नगरपरिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग व राष्ट्रीय महामार्ग विभागाकडून संयुक्त विद्यमाने प्रत्यक्ष कारवाई करण्यात येणार आहे. मुख्याधिकारी लांडगे म्हणाले, शहराच्या स्वच्छता, सुरक्षितता आणि वाहतूक व्यवस्थेच्या दृष्टीने अतिक्रमण ही गंभीर अडचण निर्माण करत आहे. सर्व नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने अतिक्रमण हटवावे नागरिकांच्या सुविधेसाठी अतिक्रमण काढले जात आहे. पाथर्डी शहरातील शेवगाव रोड, कोरडगाव रोड, अहिल्यानगर रोड, चिंचपूर रोड या ठिकाणची हद्द अतिक्रमणासाठी निश्चित करण्यात आली आहे. दरम्यान, काही व्यापाऱ्यांनी व नागरिकांनी नगरपरिषदेच्या प्रशासनाकडे अतिक्रमण हटवण्यासाठी काही दिवसांची मुदत देण्याची विनंती केली आहे. त्यास अनुसरून येत्या सोमवारपासून प्रत्यक्ष कारवाई करण्यात येणार आहे.

ही मोहीम केवळ कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीनेच नव्हे, तर सामान्य पाथर्डीकर नागरिकांच्या हितासाठी राबवली जात आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग व राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने त्यांच्या संबंधित रस्त्यांच्या हद्दी निश्चित करून दिल्या असून, रविवारपर्यंत हद्दीच्या पुढे असणारे अतिक्रमण नागरिकांनी स्वयंप्रेरणेने हटवावे, अन्यथा ते प्रशासनाकडून हटवले जाईल, असेही आवाहन करण्यात आले आहे. शहराच्या सौंदर्यीकरणासाठी, वाहतूक सुरळीत करण्यासाठी व नागरी सेवा-सुविधा चांगली ठेवण्यासाठी हे पाऊल आवश्यक असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात येत असून, पाथर्डीकर नागरिकांनी व व्यापाऱ्यांनी या मोहिमेत सहकार्य करावे, असे आवाहन लांडगे यांनी केले.

# मंगरूळ खुर्द ते चव्हाणवस्ती रस्त्यावरील अतिक्रमण हटवा; ग्रामस्थांचे तहसीलदारांना निवेदन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शेवगाव :** तालुक्यातील मौजे मंगरूळ खुर्द येथील मंगरूळ खुर्द ते चव्हाणवस्ती रस्त्यावर दोन्ही बाजूतील ग्रामस्थांनी व शेतकऱ्यांनी अतिक्रमणे केले असल्याने शेतकऱ्यांना व चव्हाणवस्तीवरील ग्रामस्थांना ये जा करण्यास अडचण निर्माण होत आहे. तरी सदरचे अतिक्रमण हटवून रस्ता खुला करून मिळावा अशा आशयाचे निवेदन जनशक्ती विकास आघाडीचे महासचिव जगन्नाथ गावडे यांच्या अध्यक्षतेखाली मंगरूळ खु येथील ग्रामस्थांनी शेवगावचे तहसीलदार ए.आर. दहादडे यांना निवेदन दिले.

निवेदनात पुढे म्हंटले आहे की, तालुक्यातील मौजे मंगरूळ खुर्द ते चव्हाणवस्ती हा सुमारे दिड कि.मी. अंतराचा रस्ता जिल्हा परिषद अंतर्गत करण्यात आलेला आहे. येथील चव्हाणवस्तीवर सुमारे २० ते ३० कुटुंब वास्तव्यास आहेत. तसेच मंगरूळ खुर्द गावातील बहुतांश शेतकऱ्यांच्या जमिनी याच रस्त्यालगत आहेत. त्यामुळे चव्हाण वस्तीचा व शेतकऱ्यांचा दळणवळणासाठी हाच एकमेव रस्ता आहे. परंतु गावातून निघाल्या पासून रस्त्याचे दोन्ही बाजूने मोठे अतिक्रमण झालेले आहे. रस्त्याच्या लगतच्या लोकांनी रस्त्यावर अतिक्रमणे करण्याची स्पर्धा चालू केली आहे. काहींनी नारळ झाडे लावली तर काहींनी दगडे टाकली तर काहींनी गटारी खोदल्या आहेत. ज्यावेळी जि.प. मार्फत सदरचा रस्ता झाला त्यावेळी या रस्त्याने मोठाली वाहने येत जात होती, परंतु आज रोजी साधी बैलगाडी देखील या रस्त्याने जाणे अशक्य झाले आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूने अतिक्रमण झाले असल्याने वस्तीवर लोकांना मोठी वाहने घेऊन जाता येत नाही. मागच्या आठवड्यात दोन जणांच्या बैलगाड्या रस्ता अतिक्रमण करून अरुंद केल्यामुळे साईटगटारामध्ये पलटी झाल्या. सुदैवाने मोठा अनर्थ टळला आहे. सदरच्या रस्त्याने शाळेतील मुले, वृद्ध माणसे, ये जा करतात. त्यांनाही याचा नहाक त्रास सहन करावा लागत आहे. तसेच चव्हाण वस्तीवरील शेतकऱ्यांना शेतातील पिके, शेती मशागती करण्यासाठी वाहने नेहता येत नाही. येथील बहुतांश शेतकऱ्यांकडे कांडे विक्रीसाठी असून रस्त्याअभावी टेम्पो सुद्धा आता वस्तीवर घेऊन जाणे शक्य नाही. त्यामूळे मंगरूळ खुर्द ते चव्हाणवाडी रस्त्यावरील दोन्ही बाजूने इतर शेतकऱ्यांनी केलेले अतिक्रमण काढून रस्ता वाहतुकीसाठी खुला करून द्यावा अशी मागणी यावेळी करण्यात आली आहे.

निवेदन देतेवेळी भागवत चव्हाण, जानकीराम चव्हाण, कुंडलिक काकडे, मच्छिंद्र काकडे, चांगदेव काकडे, संतोष काकडे, भाऊसाहेब काकडे, पांडुरंग काकडे, श्रीमंत चव्हाण, विक्रम काकडे, कानिफनाथ काकडे आदि शेतकरी व ग्रामस्थ प्रमुख उपस्थितीत होते.

## माळीवाडा येथे श्री संत सावता महाराज पुण्यतिथीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ

# सप्ताहाच्या माध्यमातून समाजात धार्मिकतेची जपणूक आवश्यक: सचिन जगताप

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. संतांच्या विचारांतून समाजोद्धाराचा मार्ग तयार होतो. संत सावता महाराज पुण्यतिथी निमित्त माळीवाडा येथे अखंड हरिनाम सप्ताहास सोमवारी प्रारंभ झाला. या निमित्ताने समाजात आध्यात्मिकतेचा जागर व्हावा, समाज प्रबोधन व्हावे यासाठी उत्सव समिती गेल्या अनेक वर्षांपासून हा उपक्रम राबवत आहे. या सप्ताहाचे उद्घाटन आयुर्वेद शास्त्र सेवा मंडळाचे अध्यक्ष सचिन जगताप यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी बोलताना सचिन जगताप म्हणाले, आजच्या धकाधकीच्या युगात संतांच्या विचारांची खरी गरज आहे. आध्यात्मिक विचारांतूनच जीवन सार्थकी लागते. संत सावता महाराज यांचे कार्य समाजाला दिशा देणारे आहे. त्यांच्या




विचारांचा वारसा पिढ्यानपिढ्या टिकणे गरजेचे आहे. अशा धार्मिक सप्ताहातून समाजात एकात्मता व बंधुभाव वाढतो. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री विशाल गणेश मंदिराचे महंत संगमनाथ महाराज होते. यावेळी हभप विश्वनाथ आण्णा राऊत, उत्सव समितीचे प्रमुख छबुनाना जाधव, माजी महापौर भगवान फुलसौंदर, डॉ. संभाजी मिस्किन, पंडितराव खरपुडे, बाळासाहेब बोराटे, अविनाश घुले, दत्ता जाधव, माणिकराव विधाते, मंगलताई लोखंडे, सुवर्णा जाधव, सोमनाथ गाडळकर आदी मान्यवर उपस्थित होते. छबूनाना जाधव म्हणाले, या सप्ताहाच्या निमित्ताने माळीवाडा परिसरात धार्मिकतेचे वातावरण तयार होते. समाज प्रबोधनासाठी हे उपक्रम आवश्यक आहेत. समितीच्या कार्यकर्त्यांच्या तन-मन-धनाच्या सहभागामुळेच हा सप्ताह यशस्वीपणे पार पडतो. २४ जुलैपर्यंत अखंड सप्ताह या सप्ताहात महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकार आपल्या कीर्तनातून समाजाला मार्गदर्शन करणार आहेत. प्रतिदिन हरिपाठ, प्रवचन, कीर्तन, हरिनाम सत्संगासह धार्मिक कार्यक्रम होणार असून परिसरातील नागरिकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल भगवान फुलसौंदर, दत्ता जाधव, अविनाश घुले, बाळकृष्ण महाराज खेसे आदींनी उत्सव समितीचे कौतुक केले. या कार्यक्रमासाठी वाहतूक शाखेचे पोलिस निरीक्षक बोरसे, संजय गवळी, बजरंग भुतारे, परेश लोखंडे, गणेश नन्नवरे, विष्णु फुलसौंदर, डॉ. अमोल जाधव, हभप बाळकृष्ण महाराज खेसे, सुरेश आंबेकर, प्रभाताई भोंग, बापूसाहेब शिंदे, दत्ता गाडळकर, कैलास खरपुडे, सतीश डागवाले, सुभाष राऊत, बाळासाहेब पुंड, नितीन शेरकर, रमेश बनकर, हर्षल म्हस्के, अमोल धाडगे, अशोक जाधव, विकास पटवेकर, विष्णूपंत म्हस्के, शकिल शेख, अनिल चेडे, अशोकराव कापरे, सुनील पडोळे, भाऊसाहेब पुंड, चंद्रकांत ताठे, अशोकराव कानडे यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. प्रारंभी कलश पूजन, प्रतिमा पूजन, ग्रंथपूजन, विणा पूजन, तुळशी पूजन आदी विधी पार पडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अभिषेक घटमाळ यांनी केले, तर आभार कैलास खरपुडे यांनी मानले. सप्ताहाच्या यशस्वीतेसाठी उत्सव समितीचे कार्यकर्ते व पदाधिकारी सातत्याने परिश्रम घेत आहेत.

# 'आपले सरकार' सेवा केंद्रांवरील अभिप्रायासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात विशेष कक्ष सुरू

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत मिळणाऱ्या सेवा नागरिकांना दिलेल्या निकषांनुसार मिळतात का याबाबत थेट नागरिकांकडून अभिप्राय घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर येथे विशेष 'अभिप्राय कक्ष' सुरू करण्यात आला आहे. या कक्षाची सुरुवात १ जुलै २०२५ पासून करण्यात आली असून नागरिकांना त्यांच्या अनुभवाची माहिती थेट सांगता येणार आहे. 'आपले सरकार' सेवा केंद्रांमधून नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवा वेळेत मिळतात का, केंद्र चालकांकडून चांगल्या वागणुकीचा अनुभव येतो का, ठरवलेल्या शुल्कापेक्षा अधिक पैसे घेतले जातात का, या सर्व बाबींचा थेट नागरिकांकडून अभिप्राय घेण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी हा उपक्रम राबविण्याचे आदेश दिले होते.सध्या या कक्षामार्फत




महसूल विभागाच्या अधिसूचित सेवांबाबत नागरिकांचा अभिप्राय गोळा केला जात आहे. लवकरच या कक्षाच्या माध्यमातून जिल्हा निबंधक व मुद्रांक विभाग, महानगरपालिका तसेच भू-अभिलेख विभागाच्या सेवांचा देखील समावेश करण्यात येणार असल्याची माहिती तहसीलदार शरद घोरपडे यांनी दिली.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या पाचव्या मजल्यावर सुरू करण्यात आलेल्या या कक्षात १० ग्राहक सेवा प्रतिनिधी नियुक्त करण्यात आले असून ते ०२४१-२३१००६१ या दूरध्वनी क्रमांकावर नागरिकांशी थेट संपर्क साधून त्यांचा अभिप्राय नोंदवत आहेत. नागरिकांना आवाहन : थेट कळवा सेवा केंद्राचा अनुभव जिल्हाधिकारी कार्यालयाच्या या विशेष उपक्रमांतर्गत 'आपले सरकार' सेवा केंद्राच्या अनुभवासंबंधी कोणतीही तक्रार, सूचना अथवा अभिप्राय असल्यास नागरिकांनी ०२४१-२३१००६१ या क्रमांकावर थेट संपर्क साधावा किंवा कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेला क्यूआर कोड स्कॅन करूनही अभिप्राय नोंदवता येईल, असे आवाहन तहसीलदार शरद घोरपडे यांनी केले आहे. या उपक्रमामुळे नागरिकांच्या अडचणी, त्रासदायक अनुभव तसेच सेवा केंद्रांच्या कामकाजाबाबत प्रशासन थेट माहिती घेऊन आवश्यक ती कारवाई करणार आहे. सेवांचा दर्जा सुधारण्यासाठी व भ्रष्टाचार रोखण्यासाठी या अभिप्राय कक्षाचा मोठा उपयोग होईल, असा विश्वास अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

# शेवगाव ग्रामीण रुग्णालयात दिव्यांगांना कृत्रिम अवयव वाटप

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शेवगाव :** शेवगाव ग्रामीण रुग्णालयात दिव्यांग बांधवांसाठी आयोजित करण्यात आलेल्या एकदिवसीय कृत्रिम अवयव प्रत्यारोपण मोफत शिबिरास शेवगाव तालुक्यातील दिव्यांगांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या शिबिरात ८१ दिव्यांगांच्या तपासणी करण्यात आल्या त्यापैकी ४९ लाभार्थ्यांना कृत्रिम हात, पाय, कॅलिपर्स यांचे मोजमाप करून तात्काळ मोफत वितरण करण्यात आले. शिबिराचे आगळे वेगळे वैशिष्ट्य म्हणजे दिव्यांगांना एका ठिकाणीच आवश्यक सर्व साहित्य उपलब्ध झाल्यामुळे त्यांचा वेळ, पैसा आणि मानसिक त्रास टळला. या शिबिराचे आयोजन डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशन संचलित जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण कार्यालय, जिल्हा परिषद, जिल्हा रुग्णालय अहिल्यानगर, एलिम्को कानपूर आणि एस. आर. ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. शेवगाव ग्रामीण रुग्णालयात आयोजित झालेले दिव्यांगांसाठीचे पहिलेच व्यापक शिबिर होते. शिबिराचे उद्घाटन शेवगाव तालुक्यातील तहसीलदार आकाश दहाडदे यांच्या हस्ते झाले.पंचायत समिती शेवगाव गटविकास अधिकारी सोनल शहा मॅडम तसेच शेवगाव ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. दर्शना धोंडे, गौरी कट्टे नायबतहसीलदार यांच्या प्रमुख उपस्थितीत शिबीर संपन्न झाले. सावली दिव्यांग संघटनेचे शेवगाव तालुका अध्यक्ष चांद शेख, सावली दिव्यांग संघटनेचे शहर अध्यक्ष गणेश महाजन, सावली दिव्यांग संघटनेचे सचिव नवनाथ औटी, प्रहार दिव्यांग संघटनेचे हरिभाऊ रकटे,गणेश हनवते, संजय नाचन, बाबासाहेब गडाख, मतिमंद विद्यालयाचे मुख्याध्यापक सचिन तरवडे व त्यांचे सहकारी , प्रवीण कांबळे व त्यांचे सहकारी आदी मान्यवर उपस्थित होते. शेवगाव तालुक्याचे तहसीलदार म्हणाले, दिव्यांगाना आजच शिबिरात मोजमाप घेऊन काही तासांत कृत्रिम हात, पाय, कॅलिपर्स यांचे वितरण करण्यात आले.त्याच बरोबर शेवगाव तहसील अंतर्गत दिव्यांगांच्या रेशनकार्ड बाबत व इतर अडचणी प्रधान्याने सोडवू. शेवगाव ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी दर्शना धोंडे




म्हणाल्या की दिव्यांगांच्या गरजा ओळखून तत्काळ सेवा देणे हेच आमचे उद्दिष्ट असून कृत्रिम अवयव बरोबरच शिबिरात आलेल्या दिव्यांग बांधवांची बी पी, शुगर, रक्त असी आरोग्य विषयक तपासणी करण्याचे तसेच दिव्यांग बांधवांची आरोग्य सेवा करण्याची आम्हांला संधी उपलब्ध झाली.= गटविकास अधिकारी सोनल शहा यांनी मनोगत व्यक्त करतांना ग्रामीण भागातील दिव्यांगांसाठी अश्या उपक्रमांची सातत्याने गरज आहे. त्याच बरोबर घरकुल योजनेत दिव्यांगांना प्राधान्य देऊन दिव्यांगांचा घरकुलाचा प्रश्न प्रधान्याने सोडवू. सावली दिव्यांग संघटनेचे शेवगाव तालुका अध्यक्ष चांद शेख मनोगत व्यक्त करतांना म्हणाले अधिकारी, पदाधिकारी, सेवा भावी संस्था तसेच संघटना, स्वयंसेवक आणि वैद्यकीय पथक यांच्या संयुक्त प्रयत्नातून हे दिव्यांग बांधवांना मोफत अवयव वितरण शिबीर शक्य झाले आहे त्याच बरोबर हालकीची व गरिबीची परिस्थिती असलेल्याने स्वखर्चाने कृत्रिम अवयव तयार करुन घेणे दिव्यांगांना शक्य नाही त्यामुळे झालेले शिबीर हे दिव्यांग बांधवासाठी वरदान ठरत आहे.शेवगाव तालुक्यातील ग्रामीण भागातील नागरिकांसाठी तहसीलदार तसेच गटविकास अधिकारी दोन्ही अधिकारी अत्यंत महत्वाचे आहेत. शेवगाव तालुक्यातील दिव्यांगांना रेशनकार्ड तसेच अंत्योदय योजने प्रमाणे धान्याचा लाभ देणेबाबत कार्यवाही करावी.दिव्यांग बांधवावर व दिव्यांग संघटनेवर आंदोलनाची वेळ येऊ देऊ नये. अशी मागणी तहसीलदार शेवगाव यांना तसेच दिव्यांग व्यक्तींना घरकुल मध्ये शासन निर्णयाप्रमाणे प्राधान्य देण्यात यावे अशी गटविकास अधिकारी पंचायत समिती शेवगाव यांच्याकडे मागणी सावली दिव्यांग संघटनेचे अध्यक्ष चांद शेख यांनी केली आहे. शिबिरात सहभागी झालेल्या अनेक लाभार्थ्यांनी समाधान व्यक्त करताना सांगितले की, या शिबिरात आम्हांला सर्व काही एकाच दिवशी, एकाच ठिकाणी मिळाले. एलिम्को ही कानपूर संस्थेच्या तज्ञांनी प्रत्येक दिव्यांगाचे मोजमाप घेऊन त्यांच्या शरीरयष्टीस अनुरूप कृत्रिम अवयव बनवले आणि लगेचच त्यांचे प्रत्यक्ष प्रत्यारोपण केले. त्यामुळे दिव्यांग बांधवांनी प्रत्यक्ष चालून पाहत समाधान व्यक्त केले. शिबिर यशस्वी करण्यासाठी महेश अडसूळ, दिनेश गरड, धोंडीबा नवघरे, अतुल धुमाळ, मुस्ताफ शेख, ज्ञानदेव शिरसाट, अतुल ससे, बाप्पू गायकवाड, गौरव खताळ, भारत बर्डे, स्नेहल निऱ्हाळी, सावलीचे चांद शेख व सर्व सावली संघटनेचे पदाधिकारी तसेच प्रहारच्या राज्य महिला अध्यक्षा लक्ष्मीताई देशमुख आदींनी योगदान दिले. प्रास्ताविक आदिनाथ शिरसाठ सूत्रसंचालन आप्पासाहेब गायकवाड तर आभार प्रदर्शन नितेश मेघनार यांनी केले.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री
शुक्रवार, दि.१८ जुलै २०२५ । अहिल्यानगर । पान नं. ८

# अहिल्यानगरला स्वच्छतेचा बहुमान


## देशात ५ वा, राज्यात ४ था क्रमांक

### ३ ते १० लाख लोकसंख्येच्या गटात कामगिरी उल्लेखनीय

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत मिशन (शहरी) २०२४ अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षणाचे निकाल जाहीर झाले असून, ३ ते १० लाख लोकसंख्या असलेल्या शहरांच्या गटात अहिल्यानगर शहराने देशभरात ५वा क्रमांक पटकावला आहे. तसेच महाराष्ट्रात चौथा क्रमांक मिळवत महापालिकेने मोठी कामगिरी केली आहे.

जलस्रोत, निवासी व मार्केट परिसर, शौचालयांची स्वच्छता यामध्ये अहिल्यानगर महापालिकेला विशेष गुणांकन मिळाले आहे. तसेच यंदाही शहराला 'थ्री स्टार स्वच्छ शहर' मानांकन बहाल करण्यात आले आहे. या यशानंतर महापालिका आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी सर्व सफाई कामगार, अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांचे विशेष अभिनंदन करताना सांगितले की, हे यश केवळ प्रशासनाचे नव्हे, तर नागरिकांच्या सहभागामुळे मिळाले आहे. सर्वांनी मिळून स्वच्छतेचा दर्जा टिकवून ठेवण्यासाठी प्रयत्न करावेत.




### मागील वर्षभर केलेल्या कामांची दखल

गेल्या वर्षअखेरीस झालेल्या सर्वेक्षणामध्ये शहरातील स्वच्छतागृहे, कचरा डेपो, डम्पिंग साईट, दैनंदिन सफाई व्यवस्था, जलस्रोतांची स्वच्छता, सेप्टिक टँक व्यवस्थापन, त्यावर प्रक्रिया व त्यातून मिळणाऱ्या पाण्याचा पुनर्वापर, कचरा संकलन, कचरा वर्गीकरण या बाबींची काटेकोर तपासणी करण्यात आली.महापालिकेच्या वतीने गेल्या वर्षभरात कचऱ्यावर प्रक्रिया, विविध मोहिमा, नागरिक सहभागातून राबवलेल्या उपक्रमांमुळे शहरात स्वच्छतेची स्थिती सुधारली. याचाच परिपाक म्हणून देशपातळीवर पाचवा आणि राज्यात चौथा क्रमांक मिळाला, असे प्रशासनाने स्पष्ट केले.

### त्रुटी दूर करण्याचे आश्वासन

महापालिकेने नेहमीच स्वच्छतेच्या बाबतीत आग्रही भूमिका घेतली आहे. मात्र गेल्या काही महिन्यांपासून घरोघरी कचरा संकलनाच्या सेवेतील त्रुटी, ठेकेदार संस्थेकडून वाहनांची संख्या न वाढवणे यामुळे काही भागात समस्या निर्माण झाली आहे.यासंदर्भात आयुक्त डांगे म्हणाले, सध्याच्या ठेकेदार संस्थेला मुदतवाढ न देता लवकरच नवीन संस्थेकडून सेवा सुरू करण्यात येणार आहे. नागरिकांना दर्जेदार सेवा मिळावी यासाठी उपाययोजना सुरू आहेत. महापालिकेच्या या यशामुळे अहिल्यानगरचा स्वच्छ व हरित शहर म्हणून लौकिक अधिक बळकट झाला आहे.

## सोन्याचे दागिने व रोख रक्कम लुटणाऱ्या आरोपींना अटक



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** तालुक्यातील वांबोरी येथे घरातील मारहाण करून सोन्याचे दागिने व रोख रक्कम लंपास करणाऱ्या चोरट्यांना पोलिसांनी अटक केली आहे. अजय मिरीलाल काळे (वय २५ वर्षे, रा.मक्तापूर ता. नेवासा) उमेश हारसिंग भोसले (वय २५ वर्षे, रा.डिगी, ता.नेवासा) अशी आरोपींची नावे आहेत. त्यांना न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्यांना पोलीस कोठडी सुनावली होती. त्यादरम्यान सदर गुन्हयातील मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे.

**वांबोरी :** येथे १९ जून रोजी रात्री एक वाजण्याच्या सुमाराला या गुन्ह्यातील फिर्यादी व साक्षीदार यांना मारहाण करून त्यांच्या घरातील ८०,००० रुपये किमतीचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम ११,००० हजार व त्यांच्याच घराशेजारील दुसऱ्या घराचा कडीकोंडा तोडून ६८,९८५ रुपये किमतीचे सोन्याचे दागिने व २० हजार रुपये रोख रक्कम व घरातील १९ हजचार रुपयांचे साहित्य असा मुद्देमाल चोरून नेल्याची फिर्याद राहुरी पोलिसात देण्यात आली होती त्या फिर्यादीवरून गुन्हा आला होता. गोपनीय माहितीच्या आधारे पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांनी या गुन्ह्यातील आरोपी निष्पन्न करुन त्यांना अटक केली. या गुन्हयाचा अधिक तपास सुरु असून इतर आरोपींना अटक करण्यासाठी पोलीस त्यांच्या मागावर आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. बसवराज शिवपुजे यांच्या मार्गदर्शनाखाली राहुरीचे पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरिक्षक समाधान फडोळ, राजू जाधव, पोहेकॉ संजय राठोड, सुरज गायकवाड, राहुल यादव, सुनील निकम, रविंद्र कांबळे, प्रमोद ढाकणे, नदीम शेख, अंकुश भोसले, सतीश कुऱ्हाडे यांच्या पथकाने केली.

## शेतीच्या वादातून वृध्द महिलेस मारहाण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनई :** नेवासा तालुक्यातील पानसवाडी येथे शेतीच्या वादातून महिलेस मारहाण करण्यात आल्याची घटना घडली आहे. याबाबतची माहिती अशी की फिर्यादी नलिनी अरुण जोगदे (वय ७२) यांची पानसवाडी येथे शेती आहे. त्यामध्ये त्यांनी ऊस पीक घेतले आहे. त्यामध्ये आरोपी काशीनाथ यशवंत गडाख, शिवाजी काशीनाथ गडाख (दोघे राहणार पानसवाडी) यांनी त्या उसाच्या शेतात रोटा मारला. तुम्ही आमच्या शेतात रोटा का मारला असे विचारले असता त्यांनी जोगदे यांना विळ्याने हातावर मारहाण केली व पतीस लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तुम्ही परत जर शेतात आले तर तुम्हाला जिवे ठार मारु अशी धमकी दिली असल्याचे दाखल फिर्यादीत फिर्यादीवरूनसोनई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सहाय्यक फौजदार काकासाहेब राख करत आहेत.

## मुलीवर अत्याचार करणाऱ्यास अटक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** अल्पवयीन मुलीस आमिष दाखवून तिला पळवून नेऊन तिच्यावर अत्याचार करणाऱ्या आरोपीला राहुरी पोलिसांनी अटक केली असून, आरोपीला न्यायालयाने दोन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे.

पाच जूनला सकाळी पावणेअकराच्या सुमारास ही अल्पवयीन मुलगी नवीन घराचे काम पाहून येते असे म्हणून घरातून गेली. पण ती परत आली नाही. त्यामुळे तिच्या घरच्यांना आपल्या मुलीचे कुणीतरी अपहरण केले असल्याचा संशय आला. नातेवाईकांनी पोलिसात तक्रार दाखल केल्यानंतर पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली. गुप्त बातमीदाराकडून समजलेल्या माहितीनुसार तालुक्यातील कनगर येथील प्रमोद उर्फ सनी शंकर साळवे (वय, २१ वर्षे) या आरोपीने मुलीस शिर्डी येथे अपहरण करून नेले होते व तेथून राहुरी येथे मजुरी काम करण्यासाठी घेऊन जाणार असल्याची खबर मिळाल्याने राहुरीचे पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांनी ताबडतोब वरील गुन्ह्यातील तपास पथकाला व अधिकाऱ्यांना रवाना करून आरोपीस काल ( दि.१६) अहिल्यानगर-मनमाड रोड वर दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास त्या आरोपीला अल्पवयीन मुलीसह ताब्यात घेतले. तिला तिच्या नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले आहे. आरोपीस अटक करून न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने दोन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे.ही कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. बसवराज शिवपुजे यांच्या मार्गदर्शनाखाली राहुरीचे पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या नेतृत्वाखाली गणेश वाघमारे, शेळके, प्रविण बागुल, इफतेखार सय्यद,सचिन धनाड, संतोष दरेकर यांनी केली आहे तपास सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक गणेश वाघमारे करीत आहेत.

## कुंभमेळ्यापूर्वी शिर्डी विमानतळाची प्रस्तावित कामे पूर्ण करावीत

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश, मुंबईत आढावा बैठक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर :** आगामी काळात होणाऱ्या नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळ्याच्या दृष्टीने शिर्डी विमानतळ हे महत्त्वाचे विमानतळ असणार आहे. त्यामुळे हे विमानतळ पूर्ण क्षमतेने सुरू करण्यासाठी नूतनीकरण व विस्तारीकरणाची कामे तातडीने पूर्ण करावीत, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.



शिर्डी विमानतळाच्या कामाचा आढावा काल फडणवीस यांच्या अध्यक्षतेखालील विधानभवनातील बैठकीत घेण्यात आला. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, परिवहन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी वेलरासू, पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी जितेंद्र दुडी, अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, महाराष्ट्र विमानतळ विकास प्राधिकरणचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक स्वाती पांड्ये, मुख्य वित्त अधिकारी अनिशा गोदानी आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, शिर्डीतील विमानतळावरील नवीन एटीसी इमारत, नवीन एकात्मिक मालवाहतूक इमारत, नवीन टर्मिनल इमारतीची कामे प्रस्तावित आहेत. ही कामे आगामी कुंभमेळा सुरू होण्यापूर्वी पूर्ण होणे आवश्यक आहे. मात्र ही कामे संथगतीने सुरू आहेत. ही कामे वेळेत पूर्ण होणे आवश्यक असून त्यासाठी आवश्यक वाटल्यास अतिरिक्त मनुष्यबळ वापरावे. तसेच विमानतळासाठी आवश्यक असणारी खरेदी व स्ट्रक्चरल डिझाईनची कामे येत्या आठवड्यात पूर्ण करावीत. शिर्डी विमानतळ हे मुंबई व नवी मुंबई विमानतळाच्या जवळचे विमानतळ आहे. येथील लहान विमाने पार्किंगसाठी शिर्डी विमानतळाचा वापर होऊ शकतो. त्यादृष्टीने आतापासूनच शिर्डी विमानतळावर सुविधा निर्माण करण्यासाठी आवश्यक असल्यास आणखी जमीन संपादीत करावी, असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.उपमुख्यमंत्री पवार यांनी पुरंदर विमानतळाचे काम लवकर सुरू व्हावे, यासाठी तातडीने कार्यवाही करण्यात यावी. तसेच त्याठिकाणी मोठी विमाने उतरण्याची सोय असावी, त्यासाठी आतापासूनच आवश्यक ती काळजी घ्यावी. या विमानतळावर विमानांच्या हँगरचीही व्यवस्था असावी, असे सांगितले. महाराष्ट्र विमानतळ विकास प्राधिकरणाच्या उपाध्यक्ष पांड्ये यांनी सादरीकरणाद्वारे शिर्डी व पुरंदर विमानतळाच्या कामांची माहिती दिली.

## 'येरे येरे पैसा-३' च्या टीमचे साईबाबांना साकडे



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** आगामी येणाऱ्या बहुचर्चित मराठी चित्रपट येरे येरे पैसा ३ च्या यशस्वठतेसाठी निर्माते अमेय खोपकर, दिग्दर्शक संजय जाधव, अभिनेते उमेश कामत, सिद्धार्थ जाधव, आणि अभिनेत्री तेजस्विनी पंडित यांच्यासह चित्रपटाच्या संपूर्ण टीमने श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतले. हा चित्रपट येरे येरे पैसा मालिकेतील तिसरा भाग आहे. चित्रपट १८ जुलैला प्रदर्शित होणार आहे. दर्शनानंतर श्री साईबाबा संस्थानच्यावतीने मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी त्यांचा सत्कार केला. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी भीमराज दराडे, प्रशासकीय अधिकारी संदीपकुमार भोसले आदी उपस्थित होते.

## वैजापूर येथील वखार महामंडळातून सव्वासात लाख रुपयांचा ऐवज चोरीस

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** येथील वखार महामंडळाच्या गोदामातून डीपी ऑइल, कॉपर (तांबे), सिलीकॉन स्टील व वीज साहित्य असा सुमारे सात लाख २५ हजार रुपये किमतीचा ऐवज लंपास केल्याची घटना गुरुवारी (१७ जुलै) उघडकीस आली आहे. याप्रकरणी शैलेश रावसाहेब गाडे यांच्या तक्रारीवरून अज्ञात व्यक्तीविरुद्ध वैजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. आठ ते पंधरा जुलै या कालावधीत ही चोरी झाल्याचे तक्रारीत म्हटले आहे. तीन लाख ९० हजार रुपये किमतीचे



६०० किलो तांबे, ८४ हजार रुपये किंमतीचे ७०० लिटर डीपी ऑइल, ५१ हजार रुपये किंमतीचे एक हजार २० किलो स्टील व दोन लाख रुपयांचे वीसाहित्य असा ऐवज चोरट्यांनी लांबवला आहे. या प्रकरणाचा अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक पाडळे हे करीत आहेत.

## चेंगराचेंगरीला विराट कोहली जबाबदार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बंगळूरू :** बंगळुरूमध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या विजयाच्या जल्लोषादरम्यान झालेल्या चेंगराचेंगरीबाबत कर्नाटक सरकारने उच्च न्यायालयात आपला अहवाल सादर केला आहे. ३ जून रोजी आयपीएल २०२५ चॅम्पियन झाल्यानंतर ४ जूनला अतिशय घाईघाईने आणि कसलेही नियोजन न करता विजयी परेड आयोजित केली. या अपघातात ११ जणांचा मृत्यू झाला, तर ४७ जण जखमी झाले. सरकारने उच्च न्यायालयात सादर केलेल्या या अहवालात अनेक प्रकारच्या गंभीर चुकांचा उल्लेख आहे. महत्त्वाची बाब म्हणजे, या संपूर्ण घटनेत विराट कोहलीचे नावही समोर आले आहे.



या अहवालात विराट कोहलीचे नाव देण्यामागे एक विशेष कारण देखील समोर येत आहे. ४ जून रोजी बंगळुरूमधील चिन्नास्वामी स्टेडियमबाहेर झालेल्या चेंगराचेंगरीसाठी केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरणाने आरसीबीला जबाबदार धरले.

आरसीबीने अचानक सोशल मीडियावर पोलिसांच्या परवानगीशिवाय विजय परेडची घोषणा केली, ज्यामुळे लाखो लोकांची गर्दी झाली. चेंगराचेंगरीत ११ लोकांचा मृत्यू झाला. याच अहवालात म्हटले आहे की, विराट कोहलीने एका व्हीडीओमध्ये चाहत्यांना विजय परेडमध्ये मोफत येण्याचे आवाहन केले. विराटचा चाहता वर्ग मोठा असल्याची त्यालाही कल्पना आहे. त्यामुळे त्याने याचे भान राखणे अपेक्षित होते.

## आंद्रे रसेलची आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**जमैका:** वेस्ट इंडिजचा ऑलराऊंडर क्रिकेटर आंद्रे रसेलने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली आहे. ऑस्ट्रेलिया आणि वेस्ट इंडिज यांच्यात घरच्या मैदानावर टी-२० मालिकेतील सुरूवातीचे दोन सामने हे त्याचे शेवटचे सामने असतील. ३७ वर्षीय रसेला पाच सामन्यांच्या मालिकेसाठी विंडीज संघात सामील करण्यात आले आहे. या मालिकेचे सुरूवातीचे दोन सामने जमैकाच्या सबीना पार्क मैदानात खेळवण्यात येतील. या ऑलराऊंडर क्रिकेटरचे हे घरचे मैदान आहे. आपल्या होम ग्राऊंडवरून तो क्रिकेटला अलविदा म्हणणार आहे.



विंडीज क्रिकेटने सोशल मिडिया पोस्टच्या माध्यमातून त्याच्या निवृत्तीची बातमी दिली आहे.

आंद्रे रसेलने एका विधानात म्हटले, शब्दांमध्ये व्यक्त करता येत नाही याचा अर्थ काय होता. वेस्ट इंडिजचे प्रतिनिधित्व करणे माझ्या आयुष्यातील सर्वात गौरवाचा क्षण आहे. जेव्हा मी मुलगा होतो तेव्हा इथपर्यंत पोहोचेन याची आशा नव्हती. मात्र जसे जसे तुम्ही खेळणे सुरू करता आणि या खेळावर प्रेम करू लागता तेव्हा आपल्याला समजते की तुम्ही काय मिळवू शकता. यामुळे मला चांगले बनण्याची प्रेरणा मिळाली.

तो पुढे म्हणाला, मला वेस्ट इंडिजसाठी खेळायला आवडते. तसेच माझ्या कुटुंबियांसमोर आणि मित्रांसमोर खेळणेही मला आवडते.

येथे मला माझी प्रतिभा दाखवण्याची संधी मिळते. मला माझ्या आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या प्रवासाचा शेवट अतिशय शानदार पद्धतीने करायचा आहे. सोबतच कॅरेबियन क्रिकेटर्सच्या पुढील पिढीसाठी आदर्श बनायचे आहे.

रसेल २०१९ पासून वेस्ट इंडिजसाठी टी-२० क्रिकेट खेळत आहे. त्याने वेस्ट इंडिजसाठी ८४ टी-२० सामने खेळलेत. त्यात त्याने २२.००च्या सरासरीने आणि १६३.०८च्या स्ट्राईक रेटने १०७८ धावा केल्यात. त्याने या दरम्यान तीन अर्धशतकी खेळी केल्या आहेत. त्याने आपल्या करिअरमध्ये केवळ एक कसोटी सामना खेळला. तर ५६ वनडे सामने खेळलेत. यात त्याने १०३४ धावा केल्या.